# ॥ शिवछत्रपती ॥

## इयत्ता चौथी

(परिसर अभ्यास – भाग २)



# भारताचे संविधान

### भाग ४ क

## नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

शिक्षणखात्याचा मंजुरी क्रमांक
प्राशिसं/२०१४-१५/२१०२/मंजुरी/ड - ५०५/७५५ दिनांक ४.२.२०१४

# शिवछत्रपती

## (परिसर अभ्यास - भाग २)

## इयत्ता चौथी

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA App द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q. R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व प्रत्येक पाठामध्ये असलेल्या Q. R. Code द्वारे त्या पाठासंबंधित अध्ययन अध्यापनासाठी उपयुक्त दृकश्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

**प्रथमावृत्ती : २०१४**
**सुधारित आवृत्ती : सप्टेंबर २०१६**
**पुनर्मुद्रण : जुलै २०२०**

**© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४११००४.**

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे या पुस्तकाचे सर्व हक्क राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**इतिहास विषय समिती :**
डॉ. आ. ह. साळुंखे, अध्यक्ष
डॉ. सोमनाथ रोडे, सदस्य
डॉ. नीरज साळुंखे, सदस्य
श्री. बापूसाहेब शिंदे, सदस्य
श्री. मोगल जाधव, सदस्य-सचिव

**संयोजक :**
श्री. मोगल जाधव
विशेषाधिकारी, इतिहास व नागरिकशास्त्र

**चित्रे व सजावट :**
प्रा. दिलीप कदम, श्री. देवदत्त बलकवडे,
श्री. संजय शेलार

**छायाचित्रे :**
श्री. प्रवीण भोसले

**नकाशाकार :**
श्री. रविकिरण जाधव
डॉ. नीरज साळुंखे

**निर्मिती :**
श्री. सच्चितानंद आफळे, मुख्य निर्मिती अधिकारी
श्री. प्रभाकर परब, निर्मिती अधिकारी
श्री. शशांक कणिकदळे, साहाय्यक निर्मिती अधिकारी

**अक्षरजुळणी :**
विजय आर्ट प्रिंटर्स, पुणे.

**कागद :** ७० जी.एस.एम., क्रिमवोव्ह

**मुद्रणादेश :** N/PB/2021-22/Qty.- 40,000

**मुद्रक :** M/s. Prabhat Printing Worka, Pune

**प्रकाशक :**
श्री. विवेक उत्तम गोसावी,
नियंत्रक, पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई-२५.

## प्रस्तावना

'बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम-२००९' आणि 'राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५' अनुसार महाराष्ट्र राज्यात 'प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २०१२' अन्वये शालेय अभ्यासक्रम तयार करण्यात आला. या अभ्यासक्रमाची कार्यवाही २०१३-२०१४ या शालेय वर्षापासून क्रमश: सुरू झाली आहे. अभ्यासक्रमात इयत्ता तिसरी ते पाचवीपर्यंत सामान्य विज्ञान, नागरिकशास्त्र व भूगोल हे विषय एकत्रितरीत्या परिसर अभ्यास भाग-१ मध्ये समाविष्ट राहतील. इतिहास हा विषय परिसर अभ्यास भाग-२ मध्ये स्वतंत्र राहील, असे नमूद केले आहे.

शासनमान्य अभ्यासक्रमानुसार पाठ्यपुस्तक मंडळाने इयत्ता चौथीचे प्रस्तुत पाठ्यपुस्तक तयार केले आहे.

अध्ययन-अध्यापन प्रक्रिया बालकेंद्रित असावी, स्वयंअध्ययनावर भर दिला जावा, प्राथमिक शिक्षणाच्या अखेरीस विद्यार्थ्यांनी 'विहित क्षमता' प्राप्त कराव्या, अध्ययन व अध्यापन प्रक्रिया आनंददायी व्हावी, असा व्यापक दृष्टिकोन समोर ठेवून हे पुस्तक तयार केले आहे.

प्रस्तुत पाठ्यपुस्तकात छत्रपती शिवाजी महाराजांचा प्रेरणादायी इतिहास सुलभ आणि परिणामकारक शैलीत गोष्टीरूपाने विद्यार्थ्यांसमोर ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. शिवाजी महाराजांचे चरित्र आणि कामगिरी ही घटना संपूर्ण महाराष्ट्रासाठी व देशासाठी एक प्रेरणास्रोत मानली जाते. पाठ्यपुस्तकात शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वामधील विविध स्फूर्तिदायी घटना दिलेल्या आहेत. या पाठ्यपुस्तकाच्या संदर्भात विविध सामाजिक संघटना, संस्था यांच्याकडून आणि व्यक्तिगत पातळीवर आलेल्या तक्रारींची व सूचनांची समितीने योग्य पद्धतीने छाननी करून प्रस्तुत पुस्तकाचे पुनर्लेखन केले आहे. तसेच आवश्यक तेथे काही अनुरूप अशा दुरुस्त्याही करण्यात आलेल्या आहेत.

पाठ्यपुस्तक जास्तीत जास्त निर्दोष व दर्जेदार व्हावे, या दृष्टीने महाराष्ट्रातील काही शिक्षणतज्ज्ञ व विषयतज्ज्ञ यांच्याकडून या पुस्तकाचे समीक्षण करण्यात आले. आलेल्या सूचना व अभिप्राय यांचा काळजीपूर्वक विचार करून या पुस्तकाला अंतिम स्वरूप देण्यात आले आहे. इतिहास विषय समिती, चित्रकार, छायाचित्रकार यांनी अतिशय आस्थेने आणि परिश्रमपूर्वक हे पुस्तक तयार केले आहे. मंडळ या सर्वांचे मन:पूर्वक आभारी आहे.

विद्यार्थी, शिक्षक व पालक या पुस्तकाचे स्वागत करतील, अशी आशा आहे.

**(चं. रा. बोरकर)**
**संचालक**
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

**पुणे**
**दिनांक : १९.०२.२०१४**

# भारताचे संविधान

## उद्‌देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्‌धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्‌वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# परिसर अभ्यास भाग-२ इयत्ता चौथी

| अध्ययनात सुचवलेली शैक्षणिक प्रक्रिया | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|
| **अध्ययनार्थ्यांनी अध्ययन अनुभवाच्या संधी गटात/जोडीजोडीने वैयक्तिक देऊन पुढील गोष्टींसाठी प्रोत्साहित करावे.**<br>• कुटुंबातील ज्येष्ठांशी / सदस्यांशी चर्चा करणे व प्रश्न विचारणे जसे की कुटुंबातील काही लोक एकत्र राहतात. चर्चा करतात व काही दूर राहतात, हे समजून घेणे. दूर राहणारे नातेवाईक, स्नेही यांच्याशी संवाद साधून त्यांची घरे, दळणवळणाची साधने व त्यांच्या ठिकाणचे लोकजीवन याविषयी जाणून घेणे.<br>• भीती न बाळगता किंवा न संकोचता अनुभवावर प्रश्न तयार करणे व मनन करणे.<br>• आईवडिल/पालक/आजी-आजोबा, शेजारील वडीलधारे यांच्याशी चर्चा करणे आणि त्यांच्या आयुष्यातील, भूतकाळातील व सध्याच्या दैनंदिन वापराच्या वस्तू उदा. कपडे, भांडी, कामाचे स्वरूप, खेळ यांची तुलना करणे,विशेष गरजा असणाऱ्या बालकांचे समावेशन.<br>• शिवचरित्रातील घटनांवर आधारित भूमिकापालन करणे.<br>• गटचर्चेच्या माध्यमातून धैर्य, परिश्रम, प्रसंगावधान यांच्या मदतीने संकटावर कशी मात करता येते, याचा शोध घेणे.<br>• शिवचरित्रातील उदाहरणांवरून पर्यावरण रक्षण, जलसाक्षरता, समता, न्याय इत्यादीबाबत जाणीवा विकसित करणे.<br>• घरी/शाळेत/समाजात आयोजित केलेल्या विविध सांस्कृतिक/राष्ट्रीय/पर्यावरणाच्या, उत्सव/विविध प्रसंगांमध्ये भाग घेणे. उदा. सकाळच्या किंवा विशेष सभा/प्रदर्शन/दिवाळी/ओणम/वसुंधरा दिन/ ईद इत्यादी तसेच समारंभांमध्ये, नृत्य, नाट्य, अभिनय, सर्जनशील लेखन व कृती करणे. (उदा. पणत्या/रांगोळी/पतंग बनवणे, इमारतींच्या प्रतिकृती, नद्यांवरील पुलांच्या प्रतिकृती बनवणे इत्यादी) कथा, कविता, घोषवाक्ये, घटनांच्या अहवालांचे कथन, सर्जनशील लेखन किंवा एखाद्या सर्जनशील कृतीतून सादर करणे.<br>• पाठ्यपुस्तकाच्या बरोबर इतर संसाधने वाचणे / शोधणे जसे, वृत्तपत्रांमधील कात्रणे, श्राव्य साधने/ गोष्टी/ कविता/चित्रे/ चित्रफिती/स्पर्शाने जाणवणारे उठावदार साहित्य, आंतरजाल/ ग्रंथालय तत्सम अन्य कोणतेही संसाधन.<br>• पारंपरिक व आधुनिक पोशाखातील फरक समजणे.<br>• राज्यातील भाषा, बोलीभाषा, सण व उत्सव यांची माहिती जमा करणे. | **अध्ययनार्थी –**<br>04.95B.01 विस्तारित कुटुंबातील सदस्यांचे एकमेकांशी असलेले नातेसंबंध ओळखतात.<br>04.95B.02 कुटुंब/ शाळा / शेजार या ठिकाणी निरीक्षण केलेल्या / अनुभवलेल्या समस्यांवर स्वतःचे मत मांडतात, (उदा. साचेबद्धपणा/ भेदभाव/ बालहक्क)<br>04.95B.03 गटात एकत्र काम करत असताना एकमेकांविषयी आस्था, समानानुभूती व नेतृत्वगुण या बाबींमध्ये पुढाकार घेतात व सक्रिय सहभाग घेतात. उदा. वर्गातील (Indoor)/ वर्गाबाहेरील (Outdoor)/स्थानिक/समकालीन उपक्रम आणि खेळ तसेच वनस्पतींची काळजी घेणे, पशु-पक्ष्यांना खायला देणे, भोवतालच्या वस्तू/वडीलधारे / दिव्यांग यांच्यासाठी प्रकल्प करणे / भूमिका करतात.<br>04.95B.04 छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्वामधील विविध स्फूर्तीदायी घटना सांगतात.<br>04.95B.05 चातुर्य, धैर्य आणि विवेक यांच्यामुळे संकटावर मात करता येते. हे शिवचरित्रातून आत्मसात करतात.<br>04.95B.06 भौगोलिक व सांस्कृतिक कारणामुळे वस्त्रांमधील विविधता सांगतात. |

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | पाठाचे नाव | पृष्ठ क्र. |
| --- | --- | --- |
| १. | शिवजन्मापूर्वीचा महाराष्ट्र | १ |
| २. | संतांची कामगिरी | ३ |
| ३. | मराठा सरदार–भोसल्यांचे कर्तबगार घराणे | ८ |
| ४. | शिवरायांचे बालपण | १२ |
| ५. | शिवरायांचे शिक्षण | १७ |
| ६. | स्वराज्यस्थापनेची प्रतिज्ञा | २१ |
| ७. | स्वराज्याचे तोरण बांधले | २५ |
| ८. | स्वकीय शत्रूंचा बंदोबस्त | २९ |
| ९. | प्रतापगडावरील पराक्रम | ३२ |
| १०. | शर्थीने खिंड लढवली | ३७ |
| ११. | शायिस्ताखानाची फजिती | ४२ |
| १२. | पुरंदरचा वेढा व तह | ४५ |
| १३. | बादशाहाच्या हातावर तुरी दिल्या | ५० |
| १४. | गड आला, पण सिंह गेला | ५३ |
| १५. | एक अपूर्व सोहळा | ५७ |
| १६. | दक्षिणेतील मोहीम | ६० |
| १७. | गडकोटांचे आणि आरमाराचे व्यवस्थापन | ६५ |
| १८. | लोककल्याणकारी स्वराज्याचे व्यवस्थापन | ७० |

‘शिवाजी महाराज हे केवळ महाराष्ट्राचेच नव्हते तर ते साऱ्या राष्ट्राचे होते. त्यांनी थोर तत्त्ववेत्त्यांच्या शिकवणुकीतून स्फूर्ती घेतली होती. वैयक्तिक महत्त्वाकांक्षेतून केवळ स्वतःसाठी राज्य स्थापन करण्याची त्यांना इच्छा नव्हती. तत्कालीन राज्यपद्धतींच्या गुणावगुणांचा त्यांनी अभ्यास केला आणि त्यातून आपले विशिष्ट धोरण व राज्यव्यवस्था यांची आखणी केली. महाराज स्वतः धर्मनिष्ठ हिंदू होते, तसेच इतर धर्मांविषयीची त्यांची भावना सहिष्णुतेची होती. इतर धर्मीयांच्या पूज्य स्थानांसाठी त्यांनी इनामे दिली. शिवाजी महाराज एक थोर सेनानी होते. स्वातंत्र्यरक्षणासाठी आरमाराची आवश्यकता आणि महत्त्व त्यांना पटले होते. इंग्रज व डच यांच्या आक्रमणापासून संरक्षण करण्यासाठी त्यांनी प्रबळ आरमार उभारले. प्रतापगड किल्ल्याच्या बांधणीत त्यांची युद्धशास्त्रातील निपुणता दिसून येते. शिवाजी महाराजांचे आपल्या देशावर फार प्रेम होते आणि मानवी सद्गुणांचे तर ते साक्षात प्रतीक होते.’

**– पंडित जवाहरलाल नेहरू**



**मीर महंमद या शिवकालीन चित्रकाराने काढलेले शिवाजी महाराजांचे चित्र**

(मूळ चित्र पॅरीस येथील संग्रहालयात आहे.)

# १. शिवजन्मापूर्वीचा महाराष्ट्र

शिवाजी महाराज थोर पुरुष होते. आपण दरसाल त्यांची जयंती मोठ्या समारंभाने आणि आदराने साजरी करतो. तुम्ही मुले तर त्या दिवशी किती आनंदात असता. महाराजांवर सुंदर सुंदर गाणी म्हणता, पोवाडे म्हणता, त्यांच्या तसबिरीला हार घालता. मोठ्या उत्साहाने 'शिवाजी महाराज की जय' असा महाराजांच्या नावाचा जयजयकार करता. कोण बरे हे शिवाजी महाराज? अशी कोणती मोठी कामगिरी त्यांनी केली?

शिवाजी महाराज ज्या काळात होऊन गेले, तो काळ मध्ययुगाचा होता. त्या काळी सर्वत्र राजेशाह्यांचा अंमल असे. बरेच राजे प्रजेच्या हिताऐवजी आपल्याच चैनविलासात मग्न असत; पण त्या काळातही असे काही राजे होऊन गेले, की ज्यांनी प्रजेच्या कल्याणासाठी राज्य केले. उत्तरेतील मुघल सम्राट अकबर, दक्षिणेतील विजयनगरचा सम्राट कृष्णदेवराय हे आपल्या कल्याणकारी राजवटींबद्दल इतिहासात प्रसिद्ध आहेत. त्यांच्याबरोबरच शिवाजी महाराजांचेही नाव गौरवाने घेतले जाते.

शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रात स्वराज्य निर्माण केले. स्वराज्य म्हणजे स्वत:चे राज्य. महाराजांपूर्वी सुमारे चारशे वर्षे महाराष्ट्रात स्वराज्य नव्हते. महाराष्ट्राचा बराचसा भाग अहमदनगरचा निजामशाहा आणि विजापूरचा आदिलशाहा या दोन सुलतानांनी आपसात वाटून घेतला होता. ते मनाने उदार नव्हते. ते प्रजेवर जुलूम करत होते. या दोघांचे एकमेकांशी हाडवैर होते. त्यांच्यात नेहमी लढाया होत. त्यात रयतेचे हाल होत. रयत सुखी नव्हती. उघडउघड उत्सव करणे, पूजा करणे धोक्याचे झाले होते. रयतेला पोटभर अन्न मिळत नव्हते. राहायला सुरक्षित निवाराही नव्हता. सगळीकडे अन्याय माजला होता. महाराष्ट्रात ठिकठिकाणी देशमुख, देशपांडे इत्यादी वतनदार होते, पण रयतेकडे त्यांचे लक्ष नव्हते. देशावर त्यांचे प्रेम नव्हते. प्रेम होते फक्त वतनावर, जहागिरीवर. वतनासाठी ते एकमेकांशी भांडत. आपापसात लढत. त्यात रयतेचे खूप हाल होत. या साऱ्या गोष्टींमुळे रयत त्रासून गेली होती. सगळीकडे अंदाधुंदी माजली होती.

शिवाजी महाराजांनी हे सारे पाहिले. रयतेला सुखी करण्यासाठी स्वराज्य स्थापण्याचे पवित्र कार्य त्यांनी हाती घेतले. भांडखोर वतनदारांना त्यांनी वठणीवर आणले. स्वराज्याच्या कामी त्यांचा उपयोग करून घेतला. तसेच रयतेवर अन्याय करणाऱ्या सत्तांशी शिवाजी महाराजांनी झुंज दिली. जुलमी राजवटींचा पराभव केला. न्यायाचे हिंदवी स्वराज्य त्यांनी स्थापन केले. हे स्वराज्य सर्व जातिधर्मांच्या लोकांचे होते. स्वराज्यात कोणताही भेदभाव नव्हता. शिवाजी महाराजांनी स्वराज्यात हिंदू, मुसलमान असा कोणताच भेदभाव केला नाही. सर्व धर्मांतील साधुसंतांचा त्यांनी सन्मान केला. अशी ही महाराजांची थोर कामगिरी पाहिली, की आपल्याला प्रेरणा मिळते, स्फूर्ती मिळते.

शिवाजी महाराजांपूर्वी सुमारे तीन-चारशे वर्षे महाराष्ट्रामध्ये अनेक संत होऊन गेले. त्यांनी केलेल्या कामगिरीचा शिवाजी महाराजांना स्वराज्यस्थापनेच्या कामी उपयोग झाला. संतांची ती कामगिरी आपण पुढील पाठात पाहू.

## स्वाध्याय

**१. रिकाम्या जागी कंसातील योग्य पर्याय लिहा.**

(अ) शिवाजी महाराज ज्या काळात होऊन गेले तो काळ ............ युगाचा होता.

(प्राचीन, मध्य, आधुनिक)

(आ) शिवाजी महाराजांनी ............... स्वराज्य निर्माण केले.

(महाराष्ट्रात, मध्यप्रदेशात, उत्तर प्रदेशात)

**२. 'अ' गट व 'ब' गट यांच्या जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
| --- | --- |
| (अ) विजयनगरचा सम्राट | (१) निजामशाहा |
| (आ) अहमदनगरचा सुलतान | (२) आदिलशाहा |
| (इ) विजापूरचा सुलतान | (३) कृष्णदेवराय |
| | (४) सम्राट अकबर |

**३. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) प्रजेच्या कल्याणासाठी राज्य करणाऱ्या राजांची नावे लिहा.

(आ) शिवाजी महाराजांनी कोणते कार्य हाती घेतले?

(इ) शिवाजी महाराजांनी कोणाशी झुंज दिली ?

**४. वेगळा शब्द ओळखा.**

(अ) स्वराज्य, गुलामगिरी, स्वातंत्र्य.

(आ) रयत, प्रजा, राजा.

**उपक्रम**

(अ) तुमच्या वर्गात शिवजयंती साजरी करा.

(आ) शाळेच्या सांस्कृतिक कार्यक्रमात ऐतिहासिक गीते, पोवाडे यांचे सादरीकरण करा.

CJY07P



# २. संतांची कामगिरी

महाराष्ट्रात श्रीचक्रधर, संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, संत चोखामेळा या संतांपासून सुरू झालेली संतपरंपरा समाजाच्या विविध स्तरांमधून आलेल्या संतांनी पुढे चालविली. या संत मंडळींमध्ये संत गोरोबा, संत सावता, संत नरहरी, संत एकनाथ, संत शेख महंमद, संत तुकाराम, संत निळोबा इत्यादी संतांचा अंतर्भाव होतो. त्याचप्रमाणे संत जनाबाई, संत सोयराबाई, संत निर्मळाबाई, संत मुक्ताबाई, संत कान्होपात्रा आणि संत बहिणाबाई शिऊरकर यांचाही अंतर्भाव होतो.


त्यांनी लोकांना दया, अहिंसा, परोपकार, सेवा, समता, बंधुभाव इत्यादी गुणांची शिकवण दिली. कोणी लहान नाही, कोणी मोठा नाही, सगळे सारखे अशी समतेची भावना संतांनी लोकांच्या मनांत निर्माण केली. तसेच महाराष्ट्रात समर्थ रामदासांनी आपले कार्य केले.



श्रीचक्रधर स्वामी

**श्रीचक्रधर स्वामी :** श्रीचक्रधर स्वामी मूळ गुजरातमधील एक राजपुत्र. वैराग्यवृत्ती धारण करून ते महाराष्ट्रात आले. येथे भ्रमण करत असता त्यांनी समतेचा उपदेश केला. त्यांना स्त्री-पुरुष, जातीपाती हे भेदभाव मान्य नव्हते.त्यामुळे त्यांना अनेक स्त्री-पुरुष अनुयायी मिळाले. त्यांनी स्थापन केलेल्या पंथास 'महानुभाव पंथ' असे म्हणतात. श्रीचक्रधर स्वामींच्या आठवणींचा संग्रह म्हणजे 'लीळाचरित्र' हा ग्रंथ होय.

**संत नामदेव :** संत नामदेव विठ्ठलाचे निस्सीम भक्त होते. ते नरसी गावचे राहणारे. त्यांनी अनेक अभंग रचले, कीर्तने केली व जनतेत



संत नामदेव

जागृती निर्माण केली. त्यांनी भागवत धर्माच्या प्रसारासाठी महाराष्ट्रभर संचार केला. त्यांनी लोकांना भक्तीची शिकवण दिली. धर्मरक्षणाचा व भक्तिमार्गाचा खंबीर निर्धार लोकांच्या मनांत निर्माण केला. संत नामदेवांनी पुढे भारतभर प्रवास करून मानवधर्माचा संदेश पोचवला. ते पंजाबात गेले. तेथील लोकांनाही त्यांनी समतेचा संदेश दिला. हिंदी भाषेत पदे लिहिली. त्यांची काही पदे आजही शीख लोकांच्या 'गुरुग्रंथसाहिब' या धर्मग्रंथात समाविष्ट आहेत. महाराष्ट्रात तर त्यांचे अभंग घराघरांतून मोठ्या भक्तीने गायले जातात.

**संत ज्ञानेश्वर :** संत ज्ञानेश्वर आपेगावचे राहणारे. निवृत्तिनाथ व सोपानदेव हे त्यांचे बंधू. मुक्ताबाई ही त्यांची बहीण. त्या वेळचे कर्मठ लोक या मुलांना संन्याशाची मुले म्हणून नावे ठेवत, त्याचे कारण असे- त्यांच्या वडिलांनी संन्यास घेतलेला होता. घर सोडले होते, पण पुढे गुरूच्या आज्ञेवरून ते परत घरी आले आणि संसार करू लागले. पुढे त्यांना ही चार मुले झाली. हे त्या वेळच्या कर्मठ लोकांना मान्य नव्हते. लोकांनी त्यांना वाळीत टाकले होते. लोक त्या मुलांचा छळ करत होते.

ज्ञानेश्वर एकदा भिक्षेची झोळी घेऊन गावात गेले; पण कोणी त्यांना भिक्षा घातली नाही. सगळीकडे त्यांना वेडेवाकडे बोल ऐकावे लागले. त्यांच्या बालमनाला खूप दु:ख झाले. ते आपल्या झोपडीत आले. झोपडीचे दार बंद करून आत दु:ख करत बसले. इतक्यात तेथे मुक्ता आली. गवताच्या ताटीवर टिचक्या मारत ती ज्ञानेश्वरांना म्हणाली, ''ताटी उघडा ज्ञानेश्वरा. अहो, आपण दु:खीकष्टी होऊन कसे चालेल? जगाचे कल्याण कोण करील?'' बहिणीच्या उपदेशाने ज्ञानेश्वरांना हुरूप आला. दु:ख विसरून ते कामाला लागले. ठिकठिकाणी गोरगरिबांचा, मागासलेल्या लोकांचा धर्माच्या नावाखाली छळ होत होता. तेव्हा ज्ञानेश्वरांनी लोकांना कळकळीचा उपदेश केला, ''ईश्वरावर श्रद्धा ठेवा. सगळ्यांशी समतेने वागा. दु:खी माणसांना मदत करा, त्यांचे दु:ख नाहीसे करा.'' त्यांचा उपदेश गेली सातशे वर्षे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत एकसारखा घुमत आहे.

त्या काळात धर्माचे ज्ञान संस्कृत ग्रंथांमध्ये बंदिस्त झाले होते. सर्वसामान्य लोकांची बोलण्याची व व्यवहाराची भाषा मात्र मराठी होती. ज्ञानेश्वरांनी मराठी भाषेतून 'ज्ञानेश्वरी' हा फार मोठा ग्रंथ लिहिला. धर्माच्या ज्ञानाचे भांडार त्यांनी लोकांना खुले करून दिले. लोकांना बंधुभावाची शिकवण दिली. ज्ञानेश्वरांनी तरुण वयात पुण्याजवळ आळंदी येथे जिवंत समाधी



**संत ज्ञानेश्वर**

घेतली. आजही लाखो लोक मोठ्या भक्तिभावाने दरसाल आषाढी – कार्तिकीला आळंदी – पंढरीला जातात.

**संत एकनाथ :** संत नामदेव व संत ज्ञानेश्वर यांच्या कार्याची परंपरा संत एकनाथांनी



संत एकनाथ

पुढे चालवली. ते पैठणचे राहणारे. त्यांनी भक्तिमार्गाचा प्रसार केला. त्यांनी अनेक अभंग, ओव्या व भारुडे लिहिली. कोणताही उच्चनीच भेदभाव मानू नका, असा त्यांनी लोकांना उपदेश केला. भक्तीचा मोठेपणा त्यांनी लोकांना पटवला. गोरगरिबांना, मागासलेल्या लोकांना त्यांनी जवळ केले. इतकेच नाही, तर मुक्या प्राण्यांवरदेखील त्यांनी दया केली. प्राणिमात्रांवर दया करा, असा लोकांनाही उपदेश केला. संत एकनाथ जसे बोलत तसे वागत.

एके दिवशी ते गोदावरी नदीवर स्नानाला निघाले होते. दुपारची वेळ होती. ऊन रखरखत होते. वाळवंट तापले होते. त्या तापलेल्या वाळवंटावर एक पोरके पोर रडत बसले होते. त्याच्या रडण्याचा आवाज नाथांच्या कानी आला. त्यांनी त्याचे आईबाप जवळ आहेत का यासाठी इकडेतिकडे पाहिले. धावत ते त्या मुलाजवळ गेले. त्यांनी ते पोर उचलून कडेवर घेतले. त्याचे डोळे पुसले. त्याला त्याच्या घरी पोहोचते केले.

अशा रीतीने स्वत:च्या आचरणातून एकनाथांनी समतेची व ममतेची भावना लोकांच्या मनावर बिंबवली.

**संत तुकाराम :** शिवाजी महाराजांच्या काळात तुकाराम व रामदास हे संत होऊन गेले. संत तुकाराम हे पुण्याजवळील




संत तुकाराम

देहू गावचे राहणारे. त्यांच्या घरी शेतीभाती होती. त्यांचे किराणा मालाचे दुकानही होते. त्यांचे वाडवडील अडल्यानडल्यांना कर्ज देत; पण तुकारामांनी आपल्या वाटणीची कर्जखते इंद्रायणी नदीमध्ये बुडवली आणि अनेकांना कर्जमुक्त केले. जवळच्या डोंगरावर जाऊन ते विठ्ठलाचे भजन करत. आषाढी-कार्तिकीला पंढरीला जात. कीर्तन करत, अभंग रचत आणि ते अभंग लोकांना म्हणून दाखवत. हजारो लोक त्यांच्या कीर्तनाला येत. शिवरायसुद्धा त्यांच्या कीर्तनाला जात असत. संत तुकाराम लोकांना दया, क्षमा, शांती यांची शिकवण देत, समतेचा उपदेश करत –

'जे का रंजले गांजले । त्यांसी म्हणे जो आपुले
तोचि साधु ओळखावा । देव तेथेचि जाणावा ।'

हा संदेश त्यांनी लोकांच्या मनावर बिंबवला. लोकांच्या मनात विचार जागे केले. लोक संत तुकारामांचा जयजयकार करू लागले. आजही महाराष्ट्रभर आपल्याला 'ग्यानबा-तुकाराम' हा जयघोष ऐकू येतो. ज्ञानेश्वरांनाच 'ग्यानबा' असे म्हणतात. 'तुकारामगाथा' आजही घरोघरी वाचली जाते.

**समर्थ रामदास :** त्याच काळात महाराष्ट्राच्या कडेकपारीत 'जय जय रघुवीर समर्थ' अशी रामदासांची गर्जना घुमत होती. त्यांचा जन्म मराठवाड्यात गोदावरीच्या काठी जांब या गावी रामनवमीच्या दिवशी झाला. रामदासांचे



समर्थ रामदास

मूळ नाव नारायण, पण ते स्वत:ला 'रामाचा दास' म्हणू लागले. 'दासबोध' या त्यांच्या ग्रंथातून त्यांनी लोकांना मोलाचा उपदेश केला. तसेच त्यांच्या मनाच्या श्लोकांतून त्यांनी लोकांना सद्विचार व सद्वर्तन यांची शिकवण दिली. बलोपासनेसाठी त्यांनी ठिकठिकाणी हनुमानाची मंदिरे उभारली. लोकांना शक्तीची उपासना करण्यास शिकवले. 'सामर्थ्य आहे चळवळीचे, जो जो करील तयाचे', हा संदेश त्यांनी लोकांना दिला. रामदासांनी लोकांना संघटना करण्याची व अन्यायाविरुद्ध प्रतिकार करण्याची स्फूर्ती दिली. त्यामुळे त्या काळच्या लोकांना धीर आला.

साधुसंतांच्या कार्यामुळे लोकजागृती झाली. धर्माबद्दल आदर वाढला. लोकांच्या मनांत आत्मविश्वास निर्माण झाला. संतांच्या कामगिरीचा शिवरायांनी स्वराज्यस्थापनेसाठी उपयोग करून घेतला.

## स्वाध्याय

**१. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) संत नामदेव ........... निस्सीम भक्त होते.

(आ) ज्ञानेश्वरांनी तरुण वयात पुण्याजवळ ........... येथे जिवंत समाधी घेतली.

(इ) संत तुकारामांनी आपल्या वाटणीची कर्जखते ............ नदीमध्ये बुडवली.

(ई) समर्थ रामदासांनी बलोपासनेसाठी ठिकठिकाणी ........... मंदिरे उभारली.

## २. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.

(अ) श्रीचक्रधर स्वामींना कोणते भेदभाव मान्य नव्हते ?

(आ) संत नामदेवांनी लोकांच्या मनांत कोणता निर्धार निर्माण केला ?

(इ) संत एकनाथांनी लोकांना कोणता उपदेश केला ?

(ई) समर्थ रामदासांनी कोणता संदेश दिला ?

## ३. दोन-तीन वाक्यांत उत्तरे लिहा.

(अ) संत ज्ञानेश्वर झोपडीत दार बंद करून का बसले ?

(आ) संत तुकारामांनी लोकांच्या मनावर कोणता संदेश बिंबवला ?

## उपक्रम

पाठात आलेल्या संतांशिवाय अन्य संतांची चित्रे मिळवून त्याखाली त्यांचे विचार लिहा.

# ३. मराठा सरदार – भोसल्यांचे कर्तबगार घराणे

**धामधुमीचा काळ :** संतांनी लोकांच्या मनांत भक्तिभाव निर्माण केला, तर शूर मराठा सरदारांनी महाराष्ट्रात शौर्याची परंपरा निर्माण केली.

तो काळच मोठा धामधुमीचा होता. विजापूरचा आदिलशाहा आणि अहमदनगरचा निजामशाहा या सुलतानांमध्ये महाराष्ट्रात नेहमी लढाया होत. लढाईसाठी त्यांना फौज लागे. या कामी ते मराठा सरदारांचा उपयोग करून घेत.

**शूर मराठा सरदार :** मराठे काटक व शूर होते. तसेच ते धाडसी होते, स्वामिनिष्ठ होते. लढाईवर मोठमोठे पराक्रम गाजवण्यात त्यांना मोठा अभिमान वाटे. हातात भाला, कमरेला तलवार असे हे धाडसी मराठा जवान घोड्यावर मांड घालून सरदारांच्या फौजेत दाखल होत. मराठे सरदार फौजबंद असत. कोणताही फौजबंद मराठा सरदार सुलतानाकडे गेला, की सुलतान त्याला आपल्या चाकरीस ठेवी. त्याला सरदारकी देई. कधीकधी जहागीरही देई. जहागीर मिळालेले सरदार स्वत:ला आपल्या जहागिरीचे राजे समजत.

विजापूर व अहमदनगर येथील सुलतानांच्या पदरी अनेक मोठमोठे मराठे सरदार होते. त्यांत सिंदखेडचे जाधव, फलटणचे निंबाळकर, मुधोळचे घोरपडे, जावळीचे मोरे, वेरूळचे भोसले हे प्रमुख होते. सिंदखेडचे जाधव हे देवगिरीच्या यादवांचे वंशज. शिवरायांच्या मातोश्री जिजाबाई या सिंदखेडच्या लखुजी जाधवांच्या कन्या होत.

**शौर्याची परंपरा :** हे सारे सरदार शूर वीर होते, पण त्यांच्यापैकी अनेकांचे आपापसात हाडवैर असे. स्वकीयांसाठी एक होऊन काहीतरी करावे अशी दृष्टी त्यांना नव्हती. त्यामुळे त्यांचे शौर्य त्या वेळी परक्यांच्या उपयोगी पडत असे; पण असे असले तरी, महाराष्ट्रातील हजारो तरुणांना त्यांनी पराक्रमाची गोडी लावली. त्यांनी अनेक पराक्रमी वीर निर्माण केले. मराठे सरदारांनी महाराष्ट्रात शौर्य जिवंत ठेवले. महाराष्ट्रातील शूर घराण्यांपैकी वेरूळचे भोसले घराणे मोठे पराक्रमी निघाले.

**घृष्णेश्वराचे मंदिर :** सुमारे चारशे वर्षांपूर्वीची गोष्ट. वेरूळच्या लेण्यांजवळील घृष्णेश्वराचे सुंदर मंदिर मोडकळीस आले होते. त्याच्या भिंतींना भेगा पडल्या होत्या. मंदिरातील पुजारीही मंदिर सोडून निघून गेला होता. एवढे महान दैवत ! पण कोण अवकळा आली होती त्या मंदिरावर. त्या मंदिराकडे पाहून भक्तांना हळहळ वाटे. येणारे-जाणारेही हळहळत, उसासे सोडत, पण त्याच्या दुरुस्तीचा विचार कोण करतो ?

त्या पडक्या मंदिरात एक शिवभक्त नित्य नियमाने येत असे. शिवाच्या पिंडीवर बेलफूल वाहत असे. हात जोडून आपल्या मनातले श्रीशिवाला सांगत असे. एक दिवस त्याने गडीमाणसे आणली. मंदिराच्या पडक्या भिंती नीट केल्या. मंदिराची सारी व्यवस्था लावली. घृष्णेश्वराचा जीर्णोद्धार केला. मंदिराच्या आतबाहेर दिवे लावले. घृष्णेश्वराचे गेलेले वैभव



शहाजीराजे

परतले. हे कोणी केले ? कोण होते हे शिवभक्त ? ते होते मालोजीराजे भोसले.

**वेरूळचे भोसले :** वेरूळ गावचे पाटील मालोजीराजे भोसले हे थोर शिवभक्त होते. विठोजीराजे त्यांचे धाकटे भाऊ. वेरूळच्या बाबाजीराजे भोसल्यांची ही मुले. वेरूळ गावची पाटिलकी बाबाजीराजे भोसल्यांकडे होती.

मालोजीराजे व विठोजीराजे मोठे कर्तबगार होते, तसेच ते शूर होते. त्यांच्या पदरी पुष्कळ हत्यारबंद मराठे होते. तो काळ फार धामधुमीचा होता. निजामशाहीवर उत्तरेच्या मुघल बादशाहाने स्वारी केली होती. त्या वेळी दौलताबाद ही निजामशाहाची राजधानी होती. तेथे मलिक अंबर नावाचा त्याचा वजीर होता. तो मोठा कर्तबगार व हुशार होता. त्याने दौलताबादजवळील वेरूळच्या भोसले बंधूंची कर्तबगारी पाहिली. त्याने निजामशाहाजवळ त्यांच्या कर्तबगारीची वाखाणणी केली. निजामशाहाने मालोजीराजांना पुणे व सुपे परगण्यांची जहागीर दिली.

भोसल्यांच्या घरी वैभव आले. उमाबाई ही मालोजीराजांची पत्नी. ती फलटणच्या निंबाळकर घराण्यातील होती. या उभयतांना दोन मुलगे होते. एकाचे नाव शहाजी आणि दुसऱ्याचे नाव शरीफजी. शहाजी पाच वर्षांचा असताना मालोजीराजे इंदापूरच्या लढाईत मारले गेले. विठोजीराजांनी आपल्या पुतण्यांचा आणि जहागिरीचा सांभाळ केला. पुढे त्यांनी शहाजीसाठी लखुजीराव जाधवांच्या मुलीला मागणी घातली. जाधवांची लेक जिजाबाई मोठी सुलक्षणी होती. जिजाबाईसाठी विठोजीराजांनी घातलेली मागणी लखुजीरावांनी स्वीकारली. लखुजीराव म्हणजे निजामशाहीतील एक शूर व पराक्रमी सरदार होते. ते मोठा फौजफाटा बाळगून होते. निजामशाहाच्या दरबारातही त्यांची मोठी प्रतिष्ठा होती. त्यांनी शहाजीराजे आणि जिजाबाई यांचा विवाह मोठ्या थाटात साजरा केला. जिजाबाई भोसले कुळाची लक्ष्मी झाली.

**शहाजीराजे :** निजामशाहाने मालोजीराजांची जहागीर शहाजीराजांना दिली. शहाजीराजे पराक्रमी होते. निजामशाही दरबारात त्यांना मोठा मान होता. मुघल बादशाहाने ती निजामशाही जिंकायचा बेत केला. विजापूरचा आदिलशाहाही त्याला मिळाला, तेव्हा निजामशाही वाचवण्यासाठी मलिक अंबर व शहाजीराजे निकराने लढले. दोन्ही फौजांचा त्यांनी पराभव केला. अहमदनगरजवळ भातवडी येथे ही प्रसिद्ध लढाई झाली. या लढाईत शरीफजी मारले गेले, पण शहाजीराजांनी मोठा पराक्रम गाजवला. त्यामुळे शूर सेनानी म्हणून त्यांचा सर्वत्र लौकिक झाला. दरबारात त्यांची प्रतिष्ठा वाढली. इतकी की खुद्द मलिक अंबरला त्यांच्याबद्दल असूया वाटू लागली. त्यातून उभयतांत वितुष्ट निर्माण होऊन शहाजीराजांनी निजामशाही सोडली आणि ते विजापूरच्या आदिलशाहीला जाऊन मिळाले. आदिलशाहाने त्यांना 'सरलष्कर' हा किताब देऊन त्यांचा सन्मान केला. पुढे निजामशाहीत बऱ्याच घडामोडी झाल्या. वजीर मलिक अंबर मृत्यू पावला. त्याचा पुत्र फत्तेखान हा मोठा कारस्थानी होता. तो आता निजामशाहीचा वजीर झाला. त्याच्या काळात निजामशाहीला उतरती कळा लागली. मुघलांच्या स्वारीचा धोका निर्माण झाला. त्यातून निजामशाही सावरण्यासाठी निजामशाहाच्या आईने शहाजीराजांकडे परत येण्यासाठी साकडे घातले, तेव्हा शहाजीराजे आदिलशाही सोडून निजामशाहीत परत आले.

## १. रिकाम्या जागी कंसातील योग्य पर्याय लिहा.

(अ) महाराष्ट्रातील शूर घराण्यांपैकी वेरूळचे ............ घराणे मोठे पराक्रमी निघाले.

(मोरे, घोरपडे, भोसले)

(आ) बाबाजीराजे भोसल्यांना मालोजी व ........ ही दोन मुले होती.

(विठोजी, शहाजी, शरीफजी)

(इ) निजामशाहाचा ............ हा कर्तबगार वजीर होता.

(मलिक अंबर, फत्तेखान, शरीफजी)

## २. नातेसंबंध लिहा.

(अ) मालोजीराजे – विठोजीराजे ................

(आ) शहाजीराजे – लखुजीराव जाधव ...........

(इ) शहाजीराजे – शरीफजी ....................

(ई) बाबाजीराजे – विठोजीराजे .................

## ३. 'अ' गट व 'ब' गट यांच्या जोड्या लावा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (अ) सिंदखेडचे | (१) निंबाळकर |
| (आ) फलटणचे | (२) घोरपडे |
| (इ) जावळीचे | (३) भोसले |
| (ई) मुधोळचे | (४) मोरे |
| | (५) जाधव |

## ४. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.

(अ) घृष्णेश्वराच्या मंदिराचा जीर्णोद्‌धार कोणी केला ?

(आ) निजामशाहाने मालोजीराजांना कोणत्या परगण्यांची जहागीर दिली ?

(इ) निजामशाही वाचवण्यासाठी कोण निकराने लढले ?

(ई) आदिलशाहाने शहाजीराजांना कोणता किताब दिला ?

(उ) शहाजीराजे आदिलशाही सोडून निजामशाहीत परत का आले ?

## उपक्रम

महाराष्ट्राच्या नकाशात अहमदनगर, फलटण, वेरूळ, पुणे, सुपे ही ठिकाणे दाखवा.

**टीप :** येथील 'मराठा' हा शब्द 'विशिष्ट जातीमधील व्यक्ती' या अर्थाचा नसून 'मराठी भाषा बोलणारे' वा 'महाराष्ट्रीय' या अर्थाचा आहे.

CKHHAZ

# ४. शिवरायांचे बालपण



**शिवनेरी किल्ल्यावरील शिवरायांचे जन्मस्थान**

**शिवजन्म :** ते दिवस फार धामधुमीचे होते. उत्तरेकडून मुघल बादशाहा शाहजहान याने दख्खन सर करण्यासाठी मोठे सैन्य रवाना केले होते. शहाजीराजांच्या जहागिरीचे गाव पुणे. विजापूरच्या आदिलशाहाने ते बेचिराख करून टाकले होते. शहाजीराजे अडचणीत सापडले होते. इकडे आड तिकडे विहीर ! शहाजीराजांच्या वाट्याला धावपळीचे आयुष्य आले.

अशात जिजाबाई गरोदर होत्या, तेव्हा या धामधुमीत आणि धावपळीत त्यांना ठेवायचे कुठे, हा प्रश्न उभा राहिला. शहाजीराजांना शिवनेरी किल्ल्याची आठवण झाली. जिजाबाईंना त्यांनी शिवनेरीवर ठेवायचे ठरवले. शिवनेरी हा पुणे जिल्ह्यातील जुन्नरजवळील किल्ला. त्याच्या चारी बाजूंना उंच कडे, भक्कम तटबंदी आणि बळकट दरवाजे होते. किल्ला मोठा मजबूत होता. विजयराज हे त्याचे किल्लेदार होते. ते भोसल्यांच्या नात्यातलेच होते. जिजाबाईंच्या

रक्षणाची जबाबदारी त्यांनी स्वीकारली. तेव्हा शहाजीराजांनी जिजाबाईंना शिवनेरीवर ठेवले व ते मुघलांवर चालून गेले.


.... आणि तो सोन्याचा दिवस उजाडला. फाल्गुन वद्य तृतीया शके १५५१ म्हणजेच इंग्रजी वर्षाप्रमाणे १९ फेब्रुवारी १६३०. शिवनेरीच्या नगारखान्यात सनई, चौघडा वाजत होता. अशा मंगल क्षणी जिजाबाईंच्या पोटी पुत्र जन्मला. किल्ल्यावर आनंदीआनंद झाला. बाळाचे बारसे झाले. शिवनेरी किल्ल्यावर जन्म झाला म्हणून बाळाचे नाव 'शिवाजी' ठेवले.

**शिवरायांचे बालपण :** शिवरायांच्या वयाची पहिली सहा वर्षे फार धावपळीत गेली; पण या धावपळीतही जिजाबाईंनी शिवरायांना उत्तम शिक्षण दिले. सायंकाळी त्या सांजवात लावत. शिवबांना जवळ घेत, मायेने कुरवाळत, त्यांना रामाच्या नि कृष्णाच्या, भीमाच्या नि अभिमन्यूच्या गोष्टी सांगत. तसेच कधी नामदेवांचे, कधी ज्ञानेश्वरांचे तर कधी एकनाथांचे अभंग म्हणून दाखवत. शिवरायांना शूर पुरुषांच्या गोष्टी आवडत. मोठे झाल्यावर त्यांच्यासारखे पराक्रम करावे असे त्यांना वाटे. जिजाबाई साधुसंतांच्या चरित्रांतील गोष्टीही सांगत. त्यातून त्यांच्या ठिकाणी साधुसंतांविषयी आदरबुद्धी निर्माण झाली.

गरीब मावळ्यांची मुले शिवरायांबरोबर खेळायला येत. कधीकधी शिवबाही त्यांच्या झोपडीत जात. त्यांची कांदाभाकर आवडीने खात. त्यांच्याशी गमतीदार खेळ खेळत. मावळ्यांची मुले म्हणजे जणू रानातील पाखरे ! ती पोपट, कोकीळ, वाघ यांचे हुबेहूब आवाज काढत. मातीचे हत्ती व घोडे बनवणे, मातीचे किल्ले



वीरमाता जिजाबाई शिवरायांना गोष्टी सांगताना



**सवंगड्यांसोबत शिवराय**

रचणे हे त्यांचे छंद ! लपंडाव, चेंडू, भोवरा हे त्यांचे नेहमीचे खेळ. शिवरायही त्या मुलांबरोबर हे खेळ खेळत. मावळ्यांच्या मुलांना शिवराय फारफार आवडायचे.

**शहाजीराजे मुघल बादशाहीकडे :** शहाजीराजे निजामशाहीत परतले खरे, पण त्यांना तिथे स्वास्थ्य मिळाले नाही, कारण खुद्द निजामशाहाच हलक्या कानाचा व धरसोड वृत्तीचा होता. त्यामुळे दरबारात कारस्थाने व हेवेदावे यांना ऊत आला होता. त्यातून निजाम-शाहाच्याच चिथावणीने लखुजीराव जाधवांची भर दरबारात हत्या करण्यात आली. या घटनेची चीड येऊन शहाजीराजांनी निजामशाहीचा त्याग केला आणि ते मुघलांच्या सेवेत रुजू झाले. मुघल बादशाहा शाहजहानने त्यांना आपली सरदारकी बहाल केली.

दरम्यान वजीर फत्तेखानाने मुघलांशी आतून हातमिळवणी करून निजामशाहाचीच हत्या केली. निजामशाहीत अंदाधुंदी माजली. फत्तेखान फितुरीने निजामशाही मुघलांच्या घशात घालणार हे स्पष्ट झाले. एवढेच नव्हे, तर त्याची बक्षिसी म्हणून शहाजीराजांच्या ताब्यात असणारा मुलूख मुघलांनी त्याला परस्पर देऊन टाकला, तेव्हा शहाजीराजांनी संतापून मुघलांची बाजू सोडली आणि आपल्या सामर्थ्याच्या जोरावर मुघलांना धडा शिकवण्याचा निश्चय केला.

**नव्या निजामशाहीची स्थापना :** वजीर फत्तेखानास व मुघल बादशाहास शह देण्यासाठी शहाजीराजांनी निजामाच्या वंशातील एक मूल शोधून काढले आणि जुन्नरजवळच्या पेमगिरी

किल्ल्यावर त्याला निजामशाहा म्हणून जाहीर केले. अशा प्रकारे त्यांनी एक नवे राज्यच स्थापन केले. या राज्यात गोदावरी ते नीरा या दरम्यानचा प्रदेश मोडत होता. आपल्या या राज्याचे संरक्षण करण्यासाठी शहाजीराजे मोठ्या शर्थीने लढले. या कामी आदिलशाहाने प्रथम त्यांना साथ दिली, पण पुढे खुद्द मुघल बादशाहा शाहजहान दक्षिणेत शहाजीराजांवर चालून आला आणि त्याने आदिलशाहास तंबी दिली, तेव्हा आदिलशाहाने शहाजीराजांच्या विरोधात त्याच्याशी मैत्रीचा तह केला.

आता मुघल व आदिलशाही यांच्या संयुक्त फौजांशी शहाजीराजे गनिमी काव्याने लढू लागले; परंतु एकटे शहाजीराजे त्यांच्याशी किती दिवस लढणार? त्यांची शक्ती अपुरी पडू लागली. तेव्हा नाइलाज होऊन १६३६ साली त्यांनी मुघलांशी तह केला. शहाजीराजांना काळ अनुकूल नव्हता, म्हणून त्यांचा स्वतंत्र राज्य स्थापण्याचा प्रयत्न तडीस गेला नाही; परंतु त्यांच्या या धाडसामुळे मराठी लोकांत आत्मविश्वास निर्माण झाला. शिवरायांना हा आत्मविश्वास पुढे स्वराज्य स्थापण्याच्या कार्यात उपयोगी ठरला.

**जिजाबाई व शिवराय कर्नाटकात:** शहाजीराजांची निजामशाही बुडाल्यानंतर तिचा प्रदेश मुघल व आदिलशाहा यांनी वाटून घेतला. शहाजीराजांची पुणे-सुप्याची पूर्वापार जहागीर आदिलशाही राज्यात आली, तेव्हा आदिलशाहाने ती जहागीर आपल्या वतीने त्यांना दिली. आता शहाजीराजांनी आदिलशाहीची सेवा स्वीकारली. आदिलशाहाने त्यांची पुण्यापासून दूर कर्नाटकातील प्रदेश जिंकण्याच्या कामावर नेमणूक केली. शहाजीराजे कर्नाटकात गेल्यानंतर काही काळाने जिजाबाई आणि शिवरायही त्यांच्याकडे गेले.

शिवरायांचे महाराष्ट्रातील बालपण धामधुमीत गेले होते. आज या किल्ल्यावर, तर उद्या त्या किल्ल्यावर अशी जिजाऊ-शिवबांची धावपळ चालू असायची. त्या वेळी वडिलांच्या पराक्रमाच्या गोष्टी लहानग्या शिवबांच्या कानी पडत असत. पुढे कर्नाटकात आल्यावर या मायलेकरांना थोडा स्वस्थपणा मिळाला. कर्नाटकातील अनेक राजांना शहाजीराजांनी जिंकले, तेव्हा आदिलशाहाने त्यांना बंगळूरची जहागीर बक्षीस दिली. आता बंगळूर हे शहाजीराजांनी आपले मुख्य ठाणे केले आणि तेथे ते एखाद्या राजासारखे वैभवात राहू लागले. दरबार भरवू लागले.

## स्वाध्याय

**१. रिकाम्या जागी कंसातील योग्य पर्याय लिहा.**

(अ) शिवरायांचा जन्म ......... किल्ल्यावर झाला.
(पुरंदर, शिवनेरी, पन्हाळा)

(आ) आदिलशाहाने शहाजीराजांची ............ प्रदेश जिंकण्याच्या कामावर नेमणूक केली.
(कर्नाटकातील, खानदेशातील, कोकणातील)

**२. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) जिजामातेच्या उपदेशाने शिवरायांच्या मनात कोणते विचार घोळू लागले ?

(आ) शिवराय मावळ्यांच्या मुलांबरोबर कोणते खेळ खेळत असत ?

(इ) शहाजीराजांनी निजामशाहीचा त्याग का केला?

## ३. दोन-तीन वाक्यांत उत्तरे लिहा.

(अ) जिजाबाई शिवरायांना कोणाकोणाच्या गोष्टी सांगत ?

(आ) शहाजीराजांनी निजामशाहाच्या वंशातील मुलाला निजामशाहा म्हणून जाहीर का केले ?

## उपक्रम

(अ) शिवनेरी किल्ल्याची सहल करा. तेथील शिवजन्म-स्थळाची माहिती मिळवा.

(आ) तुम्ही खेळत असलेल्या पारंपरिक खेळांची नावे लिहा. त्यांपैकी एका खेळाविषयी १० ओळींत माहिती लिहा.



**शिवनेरी किल्ला - महादरवाजा**

# ५. शिवरायांचे शिक्षण

**शिवरायांच्या शिक्षणास प्रारंभ :** स्वत: शहाजीराजे हे संस्कृतचे गाढे पंडित होते. त्यांनी आपल्या बंगळूरच्या दरबारात अनेक भाषांच्या पंडितांना आणि कलावंतांना आश्रय दिला होता. शिवरायांसाठी त्यांनी हुशार शिक्षकांची नेमणूक केली होती. तेथे वयाला सात वर्षे झाल्यानंतर त्यांच्या शिक्षणाला प्रारंभ झाला. थोड्याच काळात शिवराय लिहिण्या-वाचण्याच्या कलेत पारंगत झाले. रामायण, महाभारत, भागवत यांतील गोष्टी ते स्वत: वाचू लागले. शहाजीराजांनी शिवरायांना युद्धकला शिकवण्यासाठी काही शिक्षकांची नेमणूक केली होती. त्यांनी शिवरायांस घोड्यावर बसणे, कुस्ती खेळणे, दांडपट्टा फिरवणे, तलवार चालवणे इत्यादी विद्या शिकवण्यास प्रारंभ केला. अशा प्रकारे वयाच्या बाराव्या वर्षापर्यंत शिवरायांना विविध विद्या व कला यांचा परिचय झाला.

लवकरच आदिलशाहाने शहाजीराजांना कर्नाटकातील नायकांची राज्ये जिंकण्याच्या मोहिमेवर पाठवले. या मोहिमेवर जाण्यापूर्वी शहाजीराजांनी जिजाऊ व शिवराय यांची पुणे जहागिरीकडे रवानगी केली. त्या वेळी त्यांच्याबरोबर शहाजीराजांनी हत्ती, घोडे, पायदळ, खजिना, ध्वज, तसेच विश्वासू प्रधान, शूर सेनानी आणि विख्यात शिक्षक यांना धाडले.



शहाजीराजांच्या देखरेखीखाली शिवरायांचे शिक्षण

**पुण्याचा कायापालट :** जिजाऊ आणि शिवराय पुण्याला आले. शिवरायांना बालपणचे दिवस आठवले. बालपणी शिवनेरीच्या मातीत ते खेळले होते. सह्याद्रीची उंचउंच शिखरे त्यांना पुन्हा दिसली. त्यांना खूपखूप आनंद झाला. त्या वेळचे पुणे आजच्याइतके मोठे नव्हते. शहाजीराजांच्या शत्रूंनी हे टुमदार गाव उजाड करून टाकले होते. गावातील मालमत्तेची नासधूस झाली होती. घरे मोडली होती, देवळे पडली होती. शत्रूच्या भीतीने लोक गाव सोडून पळून गेले होते. शेते ओसाड झाली होती. जंगले वाढली होती. रानात लांडगे माजले होते. अशी पुण्याची दैन्यावस्था झाली होती.

जिजाबाई शिवरायांसह पुण्यात राहू लागल्या, हे आसपासच्या गावांतील लोकांना समजले, तेव्हा लोकांना मोठा धीर आला. जिजाबाईंनी त्यांना जवळ बोलावून दिलासा दिला. लोक पुण्याला येऊन राहू लागले. शेतावर जाऊ लागले. जिजाबाईंनी पडकी देवळे दुरुस्त करून घेतली. देवळांत सकाळ-संध्याकाळ पूजा होऊ लागली. गाव लोकांनी गजबजू लागले. त्यामुळे पुण्याचे रूप पालटले.

**दादाजी कोंडदेवांची कामगिरी :** जिजाऊ व शिवराय कर्नाटकात असताना इकडे पुणे जहागिरीची व्यवस्था दादाजी कोंडदेव पाहत होते. ते कोंढाण्याचे सुभेदारही होते. ते मोठे इमानी सेवक होते. कारभारात चोख होते, तसेच ते न्यायी होते. त्यांची शिस्त कडक होती. ते निष्ठावंत होते. या काळात शहाजीराजांच्या आदेशाने पुण्यात एक मोठा वाडा बांधण्यात आला. त्याचे नाव लाल महाल. शेतकऱ्यांनी शेतांत लागवड करावी, म्हणून दादाजींनी त्यांना काही वर्षे शेतसाऱ्याची सूट दिली. त्यामुळे शेते लागवडीस आली. माजलेले लांडगे शेतकऱ्यांना त्रास देत, म्हणून लांडगे मारण्यासाठी त्यांनी बक्षिसे लावली. त्यामुळे बरेच लांडगे मारले गेले. चोरांचा सुळसुळाट झाला होता. दादाजींनी शेतकऱ्यांची पथके उभारली व त्यांचा पहारा बसवला. चोरांचा बंदोबस्त केला. जमिनीची प्रतवारी ठरवून तिच्यावर सारा आकारला. त्यामुळे लोकांना आनंद झाला. दादाजी कोंडदेव आणि निजामशाहीचा वजीर मलिक अंबर यांचे कार्य शेती सुधारणा आणि सारावसुली या क्षेत्रांत मोलाचे व पायाभूत मानले जाते.

**शिवरायांचे शिक्षण :** शिवराय पुणे जहागिरीत आले, तरी जिजाबाईंच्या देखरेखीखाली त्यांचे शिक्षण चालूच राहिले. बंगळूरहून येताना शहाजीराजांनी सोबत दिलेल्या नामवंत शिक्षकांनी शिवरायांना अनेक शास्त्रे, विद्या व भाषा शिकवल्या.

उत्तम राज्यकारभार कसा करावा, शत्रूशी युद्ध कसे करावे, किल्ले कसे बांधावे, घोडे व हत्ती यांची परीक्षा कशी करावी, शत्रूच्या दुर्गम प्रदेशातून निसटून कसे जावे इत्यादी अनेक विद्या शिवरायांना अवगत झाल्या. शिवरायांची शिक्षणातील ही प्रगती पाहून जिजाऊंना मोठा आनंद झाला.

**वीरमाता जिजाबाईंची शिवरायांस शिकवण :** जिजाबाई ही काही सामान्य स्त्री नव्हती. ती लखुजीराव जाधवांसारख्या बलाढ्य सरदाराची कन्या आणि शहाजीराजांसारख्या पराक्रमी पुरुषाची पत्नी होती. राजकारणाचे व युद्धनीतीचे बाळकडू जिजाबाईंना

लहानपणापासूनच मिळाले होते. जाधव व भोसले या दोन्ही प्रसिद्ध घराण्यांची लढाऊ परंपरा त्यांच्या ठिकाणी एकत्र आली होती. जिजाबाई मोठ्या स्वाभिमानी व स्वातंत्र्यप्रिय होत्या. मराठा सरदाराने कितीही पराक्रम केला, तरी सुलतानांच्या दरबारात त्याचे चीज होत नाही, याचा त्यांना वाईट अनुभव आला होता. निजामशाहाने भर दरबारात त्यांच्या पित्याची हत्या केली होती. त्याचे दु:ख त्यांनी पचवले होते. जिजाबाईंनी आता निश्चय केला होता, की त्यांचा शिवबा अशी परक्यांची चाकरी करणार नाही. तो स्वत:च आपल्या लोकांचे राज्य म्हणजे स्वराज्य स्थापन करील. या विचाराने त्या शिवरायांना घडवत होत्या.

मावळात राहणाऱ्या लोकांना मावळे म्हणत. मावळे इमानी, कष्टाळू व चपळ होते. काटकपणात त्यांचा हात कोणी धरत नसे, पण ते सुलतानी राजवटीने गांजले होते. सुलतानांच्या लष्कराकडून गावेच्या गावे लुटली जात. रयत परागंदा होई. तिला कोणी वाली नसे. अशा दु:खी-कष्टी लोकांसाठी आपण काहीतरी करावे, असे शिवरायांना वाटे.

घरी आल्यावर शिवराय जिजाबाईंपाशी हितगुज करत. जिजाबाई म्हणत, "शिवबा, भोसल्यांचा पूर्वज श्रीरामचंद्र. श्रीरामचंद्राने दुष्ट रावणाला मारले आणि प्रजेला सुखी केले. जाधवांचा पूर्वज श्रीकृष्ण. त्याने दुष्ट कंसाला ठार केले आणि प्रजेला सुखी केले. श्रीराम आणि श्रीकृष्ण यांच्या वंशात तुझा जन्म झाला आहे. अरे, तूसुद्धा दुष्टांचा संहार करू शकशील. तूसुद्धा गरीब लोकांना खूप सुखी करू शकशील."



वीरमाता जिजाबाई

आईच्या या उपदेशाने शिवरायांना हुरूप येई. राम, कृष्ण, भीम, अर्जुन या वीरांच्या गोष्टी त्यांना आठवत. हे वीरपुरुष शिवरायांना सतत ध्यानी, मनी, स्वप्नी दिसत. हे वीर अन्यायाविरुद्ध जसे लढले, तसे आपण लढावे. त्यांनी दुष्टांचा नाश केला, तसा आपण करावा. त्यांनी प्रजेला सुखी केले, तसे आपण करावे. आपण न्यायी व्हावे, धाडसी व्हावे, पराक्रमी व्हावे, असे शिवरायांना सतत वाटू लागले.

**शिवरायांचा नवा अंमल :** पुणे जहागिरीत आता जिजाबाईंच्या मार्गदर्शनाखाली शिवरायांचा नवा अंमल सुरू झाला. या कामासाठी

शहाजीराजांनी पूर्वतयारी करून दिली होती. त्यांनी शिवरायांना बंगळूरहून पुण्याला पाठवताना सामराज नीळकंठ पेशवे, बाळकृष्ण हनमंते मुजुमदार, माणकोजी दहातोंडे सरनोबत, रघुनाथ बल्लाळ सबनीस, सोनोपंत डबीर अशी मातब्बर मंडळी त्यांच्याबरोबर दिली होती. जणू हे सर्व स्वतंत्र राजाचे अधिकारीच. शिवरायांनी आपल्या जहागिरीचा कारभार उत्तम रीतीने पाहावा, म्हणूनच शहाजीराजांनी हे अधिकारी पुण्यास पाठवले होते. त्यांच्या मदतीने शिवराय जहागिरीचा कारभार पाहू लागले. लोकांच्या सुखदु:खाच्या गोष्टींकडे लक्ष देऊ लागले. रयतेवर अन्याय करणाऱ्यांना शिक्षा होऊ लागल्या. एक प्रकारे शहाजीराजांच्या जहागिरीचा कायापालटच होत होता. पुढे होऊ घातलेल्या स्वराज्याचा नमुनाच मावळ्यांना पाहायला मिळत होता. जणू तो स्वराज्याचा अरुणोदयच होता !

**शिवरायांचा विवाह :** त्या काळात अगदी लहानपणीच लग्न करण्याची पद्धत होती, तेव्हा जिजामाता म्हणाल्या, ''आता शिवबाचे दोहोंचे चार हात करायला पाहिजेत.'' मग शिवबाकरिता मुली पाहणे सुरू झाले. एक मुलगी त्यांना पसंत पडली. तिचे नाव सईबाई. फलटणच्या नाईक निंबाळकर घराण्यातील ती मुलगी. हा विवाह मोठ्या थाटामाटाने साजरा झाला.

## स्वाध्याय

### १. रिकाम्या जागी कंसातील योग्य पर्याय लिहा.

(अ) शहाजीराजे ......... गाढे पंडित होते.

(संस्कृतचे, कन्नडचे, तमीळचे)

(आ) मावळात राहणाऱ्या लोकांना ........... म्हणतात.

(शेतकरी, सैनिक, मावळे)

### २. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.

(अ) शिवरायांना शिकवण्यासाठी शिक्षकांची नेमणूक कोणी व कोठे केली ?

(आ) शिवरायांना शिक्षकांनी कोणत्या विद्या शिकवण्यास प्रारंभ केला ?

(इ) दादाजी कोंडदेवांनी शेतकऱ्यांना शेतसाऱ्याची सूट का दिली ?

### ३. दोन-तीन वाक्यांत उत्तरे लिहा.

(अ) पुण्याचे रूप कसे पालटले ?

(आ) शिवरायांना कोणत्या विद्या अवगत झाल्या ?

(इ) जिजाबाईंनी कोणता निश्चय केला होता ?

### उपक्रम

(अ) जिजाबाई व शिवराय यांच्यामधील संवादाचे नाट्यीकरण करा.

(आ) वीरमाता जिजाबाईंचे चरित्र वाचा.

CHVQRJ

# ६. स्वराज्यस्थापनेची प्रतिज्ञा

**रायरेश्वराचे देवालय :** पुण्याच्या नैर्ऋत्येला असलेले रायरेश्वराचे देवालय हे मोठे रमणीय स्थान होते. तेथे १६४५ साली एक विलक्षण घटना घडली. शिवराय व आजूबाजूच्या खोऱ्यांमधील काही मावळे मंडळी मसलतीसाठी तिथे जमली होती. त्या किर्र अरण्यात झाडाझुडपांत लपलेल्या रायरेश्वराच्या देवालयात शिवरायांबरोबर कसले खलबत ते मावळे करत होते ? श्रीशंकरापाशी कोणते मागणे मागत होते ?

**बालशिवबाची तेजस्वी वाणी :** शिवराय अजून वयाने कितीतरी लहान होते, पण त्यांच्या मनाची भरारी मोठी होती. त्यांनी एक मोठा घाट घातला होता. त्या देवालयात जमलेल्या सवंगड्यांना ते कळकळीने म्हणाले, ‘‘गड्यांनो, मी आज तुम्हांला माझ्या मनातील एक गोष्ट सांगू का? आमचे वडील शहाजीराजे विजापूरचे सरदार आहेत. त्यांनीच आम्हांला येथल्या जहागिरीचा अधिकार दिला आहे. सर्व कसे छान चालले आहे, पण गड्यांनो, मला यात मुळीच आनंद वाटत नाही. सुलतानांच्या वतनदारीवर आपण संतुष्ट राहावे का? दुसऱ्याच्या ओंजळीनेच आपण पाणी प्यावे का? आपल्या चारी बाजूंना अनेक परकीय राजवटी आहेत. त्यांच्यामध्ये सारखी युद्धे चालू असतात. आपली माणसे या युद्धात नाहक मरतात. कुटुंबेच्या कुटुंबे देशोधडीला लागतात. आपल्या मुलखाची धूळधाण होते आणि इतके सोसूनही आपल्या पदरी काय ? तर गुलामगिरी ! आपण हे किती दिवस सहन करायचे? दुसऱ्यासाठी आपण किती काळ खपायचे ? सांगा, तुम्हीच सांगा ! वतनांच्या लोभाने आपण हे असेच चालू द्यायचे का ?’’

शिवराय आवेशाने बोलत होते. त्यांचा चेहरा रागाने लाल झाला होता. बोलता बोलता ते थांबले. त्या तरुण सवंगड्यांकडे पाहू लागले. रायरेश्वराच्या गाभाऱ्यात जमलेले ते तरुण मावळे शिवरायांच्या बोलण्याने थरारून गेले. नवीच दृष्टी त्यांना मिळाली. त्यांच्यापैकी एकजण म्हणाला, ‘‘बोला बालराजे, बोला. आपला मनोदय सांगा आम्हांला. तुम्ही जे सांगाल ते करण्यासाठी आम्ही एका पायावर तयार आहोत.’’ ‘‘हो राजे, तुम्ही जे सांगाल ते आम्ही करू ! आमचे प्राणही देऊ !’’ ते सारे तेजस्वी तरुण वीर एका आवाजात बोलले.

**स्वराज्याची शपथ :** मावळ्यांच्या या शब्दांनी शिवरायांना स्फुरण चढले. एकेकाकडे पाहत ते आनंदाने म्हणाले,‘‘गड्यांनो ! आपला मार्ग ठरला. आपल्या ध्येयासाठी आपण सर्वांनी झटायचे, सर्वांनी खपायचे, सर्वांनी प्राण अर्पण करायलाही तयार व्हायचे. आपले हे ध्येय म्हणजे ‘हिंदवी स्वराज्य’! तुमचे, माझे साऱ्यांचे स्वतंत्र राज्य स्थापन करायचे. परक्यांची गुलामी आता नको. उठा, या रायरेश्वराला साक्ष ठेवून आपण प्रतिज्ञा करू. स्वराज्यस्थापनेसाठी आता आम्ही आमचे सर्वस्व वाहणार.’’

सारे मंदिर शिवरायांच्या शब्दांनी घुमू लागले. ‘‘हिंदवी स्वराज्याच्या रूपाने हे राज्य



स्वराज्यस्थापनेची प्रतिज्ञा

व्हावे, असे श्रींच्या मनात आहे. श्रींचे मनोरथ आपण पूर्ण करूया.'' शिवराय शेवटी निश्चयाने बोलले.

रायरेश्वराच्या देवालयातून सारे मावळे बाहेर पडले, ते स्वराज्याच्या आणाभाका घेऊनच. शिवरायांचे मन उचंबळून आले. ते पुण्यास येताच तडक लाल महालात मातोश्रींकडे गेले. घडलेला प्रसंग त्यांनी जिजाबाईंना सांगितला. त्या माउलीला धन्यधन्य वाटले. आपण मनी जे धरले ते बालराजे पूर्ण करणार अशी आशा, असा विश्वास त्यांना वाटू लागला.

**मावळ खोऱ्यातील जमवाजमव :** शिवराय आपल्या नव्या उद्योगाला लागले. मावळ्यांना घेऊन ते तलवारीचे हात करू लागले. घोडदौड करावी, डोंगरांतील आडमार्ग शोधावे, खिंडी, घाट, चोरवाटा निरखाव्या, असा त्यांचा नित्यक्रम सुरू झाला. शिवरायांनी मावळ्यांची अंत:करणे जिंकून घेतली. तरुण मावळे शिवरायांसाठी वेडे झाले. शिवरायांसाठी जगायचे, शिवरायांसाठी मरायचे, असे ते मानू लागले. आता शिवरायांच्या हालचालींना उधाण आले, समुद्राला भरती यावी तसे. शिवरायांनी पुण्याभोवतीचे सर्व कोट, किल्ले आपल्या सवंगड्यांसह बारीक नजरेने न्याहाळले. चोरवाटा, भुयारे, तळघरे, दारूगोळा, हत्यारे आणि शत्रूंच्या फौजांची ठाणी यांची खडान्‌खडा माहिती मिळवली.

**मावळांतील सोबती :** बारा मावळांत ठिकठिकाणी काही देशमुख मंडळी आपली वतने सांभाळत बसली होती. त्यांना आपल्या वतनाचा विलक्षण लोभ होता. वतनासाठी ते आपापसात भांडत. या भांडणात मराठ्यांची शक्ती उगाच वाया जात आहे, हे शिवरायांनी ओळखले. त्याला आळा घालायचे त्यांनी ठरवले. शिवराय देशमुखांच्या गावांना भेटी देत. त्यांची समजूत घालत. स्वराज्याच्या ध्येयाने त्यांना भारून टाकत. शिवरायांनी त्यांना गोड शब्दांनी आपलेसे केले, पण काहींनी दांडगाई केली. त्यांनाही शिवरायांनी वठणीवर आणले. मराठ्यांचे आपापसातील झगडे त्यांनी थांबवले. जो तो त्यांना धन्यवाद देऊ लागला. मावळ खोऱ्यातील झुंजारराव मरळ, हैबतराव शिळमकर, बाजी पासलकर, विठोजी शितोळे, जेधे, पायगुडे, बांदल इत्यादी देशमुख मंडळी शिवरायांचा शब्द मानू लागली. मावळांत स्वराज्याची घोडदौड सुरू झाली.

**शिवरायांची राजमुद्रा :** शिवरायांच्या नावाने जहागिरीचा कारभार सुरू झाला होता. शहाजीराजांनी शिवरायांची स्वतंत्र राजमुद्रा तयार केली होती. ती मुद्रा अशी –

प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता ।।

शाहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते ।।

प्रतिपदेच्या चंद्रकलेप्रमाणे वाढत जाणारी आणि साऱ्या विश्वाला वंद्य होणारी अशी शहाजीराजांचा पुत्र शिवाजीराजे यांची राजमुद्रा लोकांच्या कल्याणासाठी आहे; असे सांगणारी



राजमुद्रा

ती राजमुद्रा म्हणजे स्वराज्याच्या स्थापनेचा संकेतच होता.

त्या काळात राजमुद्रा बहुधा फार्सी भाषेत कोरलेल्या असत, पण शिवरायांची मुद्रा संस्कृत भाषेत होती. स्वराज्य हवे तशी स्वभाषा हवी, स्वधर्म हवा. त्याबरोबरच दुसऱ्या धर्मांचा द्‌वेषही नको. शिवरायांनी आपला कारभार लोककल्याणासाठीच सुरू केला आहे, हे साऱ्या मावळ्यांच्या चटकन लक्षात आले.

## स्वाध्याय

**१. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) पुण्याच्या नैर्ऋत्येला असलेले ........... देवालय मोठे रमणीय स्थान होते.

(आ) मावळांत ठिकठिकाणी काही ........... मंडळी आपली वतने सांभाळत बसली होती.

(इ) शहाजीराजांनी शिवरायांची स्वतंत्र ......... तयार केली होती.

**२. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) रायरेश्वराच्या देवालयात शिवराय शेवटी निश्चयाने काय बोलले ?

(आ) जिजाबाईंना कोणता विश्वास वाटू लागला ?

(इ) शिवरायांनी कोणत्या गोष्टींची खडान्‌खडा माहिती मिळवली ?

(ई) शिवरायांनी कोणत्या गोष्टींना आळा घालायचे ठरवले ?

**३. दोन-तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) शिवरायांचे ध्येय कोणते होते ?

(आ) शिवरायांचा कोणता नित्यक्रम सुरू झाला ?

**उपक्रम**

शिक्षकांच्या मदतीने स्वराज्यस्थापनेच्या प्रसंगाचे चित्र तयार करा.

CX5LT7

# ७. स्वराज्याचे तोरण बांधले

रायरेश्वराच्या देवालयात शिवरायांनी आपल्या सवंगड्यांसह स्वराज्यस्थापनेची प्रतिज्ञा केली, पण केवढे अवघड कार्य होते ते ! दिल्लीचा मुघल बादशाह, विजापूरचा आदिलशाही सुलतान, गोव्याचे पोर्तुगीज आणि जंजिऱ्याचा सिद्दी अशा चार सत्ता त्या वेळी महाराष्ट्रावर हुकमत गाजवत होत्या. या सत्तांचा दरारा मोठा होता. त्यांच्याविरुद्ध ब्र काढायची कुणाची हिंमत नव्हती. अशा बिकट परिस्थितीत शिवरायांनी स्वराज्याचा मंत्र उच्चारला होता. कुठे शत्रूच्या फौजांचे अफाट बळ आणि कुठे शिवरायांच्या सवंगड्यांचे अल्प बळ ! पण शिवरायांचा निश्चय अढळ होता. त्यातूनच बळ निर्माण झाले.

**तोरणगड :** शिवरायांकडे पुणे, सुपे, चाकण व इंदापूर या परगण्यांची जहागीर होती. जहागिरीतील किल्ले विजापूर दरबारातील अधिकाऱ्यांच्या ताब्यात होते. किल्ल्यांशिवाय कसले आहे स्वराज्य ! ज्याचे किल्ले त्याचे राज्य ! किल्ला ताब्यात असला, की आजूबाजूच्या प्रदेशावर सत्ता चालते. डोंगरी किल्ला म्हणजे राज्याचा एक मुख्य आधार. तेव्हा एखादा भक्कम किल्ला लवकर हस्तगत केला पाहिजे, असे शिवरायांनी मनाशी ठरवले. तोरणा किल्ला शिवरायांच्या डोळ्यांपुढे होता. पुण्याच्या नैर्ऋत्येस चौसष्ट किलोमीटरवर कानद खोऱ्यात हा किल्ला आहे. डोंगरी किल्ल्यात तोरणा किल्ला मोठा बाका. त्या किल्ल्यावर दोन भक्कम माच्या होत्या. एक झुंजार माची आणि दुसरी बुधला माची. माची म्हणजे किल्ल्याच्या चढणीवर नैसर्गिकरीत्या सपाट झालेल्या भागाची तटबंदी. झुंजार माची नावाप्रमाणेच झुंजार आहे, लढाऊ आहे.



**तोरणा किल्ला (झुंजार माची)**

किल्ल्यावरून खाली उतरण्यासाठी एकच वाट आहे. ती आहे झुंजार माचीवरून. ही वाट अतिशय अवघड आहे. वाटेवरून चालताना जरासा तोल गेला तरी चालणारा खाली दरीत कोसळून पडणार! महाराष्ट्रातील बळकट किल्ल्यांत तोरणा किल्ला गणला जातो. किल्ल्यावर तोरणजाई देवीचे देऊळ आहे. त्यावरून त्या किल्ल्याला 'तोरणा' हे नाव पडले. एवढा प्रचंड किल्ला ! पण आदिलशाहाचे या किल्ल्याकडे फारसे लक्ष नव्हते. किल्ल्यावर पुरेसे पहारेकरी नव्हते, की दारूगोळा नव्हता. शिवरायांनी हे हेरले. शिवरायांना नेमके हेच हवे होते. तोरणा जिंकून स्वराज्याचे तोरण बांधायचे, असे त्यांनी ठरवले.

**स्वराज्याची नौबत झडली :** निवडक मावळ्यांच्या तुकड्या घेऊन शिवराय कानद खोऱ्यात उतरले. साऱ्या मावळ्यांसह ते सिंहाच्या छातीने व हरणाच्या वेगाने झपझप तोरणा चढून गेले. मावळ्यांनी भराभर मोक्याच्या जागा ताब्यात घेतल्या. तानाजी मालुसरे या वीराने दरवाजावर मराठ्यांचे निशाण उभारले. येसाजी कंक हा शिवरायांचा विश्वासू आणि निष्ठावान सहकारी. त्याने चौकीवर पहारे बसवले. किल्ला ताब्यात आला. सर्वांनी शिवरायांचा जयजयकार केला. हिंदवी स्वराज्याची नौबत झडली. नगाऱ्यांचा आणि शिंगांचा आवाज सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांत घुमला. शिवरायांनी या किल्ल्याला 'प्रचंडगड' असे नाव दिले.

**भवानीमातेचा आशीर्वाद :** तोरणा किल्ल्यावर शिवरायांचा कारभार सुरू झाला. त्यांनी किल्ल्याची बारीक पाहणी केली. किल्ल्यावर मराठा किल्लेदार, ब्राम्हण सबनीस, प्रभू कारखानीस इत्यादी अधिकाऱ्यांच्या नेमणुका केल्या. शिबंदीत मावळे, कोळी, रामोशी, महार इत्यादी जातीजमातींतील शूर माणसे नेमली. स्वराज्याच्या सैन्यात जातिभेद, वर्णभेद असा कोणताही भेदभाव नव्हता. किल्ल्याची दुरुस्ती सुरू झाली आणि काय आश्चर्य ! मोहरांनी गच्च भरलेल्या चार घागरी, काम चालू असताना किल्ल्यावर सापडल्या ! कामकऱ्यांना आनंदीआनंद झाला. 'शिवरायांना देवी भवानी प्रसन्न आहे, तिनेच धन दिले', असे जो तो म्हणू लागला. कामकऱ्यांनी मोठ्या आनंदाने धनाच्या घागरी शिवरायांजवळ आणून दिल्या. एका मोहरेलाही कुणी हात लावला नाही. स्वराज्याचे धन होते ते ! ते त्यांनी आपल्या धन्याच्या स्वाधीन केले. स्वराज्याच्या कार्यासाठी एवढे धन एकाएकी सापडले म्हणून शिवरायांना हुरूप आला. आपल्या कार्याला आईभवानीचा आशीर्वाद आहे, असे त्यांना वाटले.

हे धन स्वराज्याच्या कामी आले. या धनातून शिवरायांनी शस्त्रे विकत घेतली. दारूगोळा जमा केला. उरलेल्या धनातून त्यांनी एक बेत सिद्धीस नेण्याचे ठरवले. तो बेत असा. तोरण्यापासून पंधरा किलोमीटरवर पूर्वेला मुरुंबदेवाचा डोंगर आहे. शिवरायांनी तो हेरून ठेवला होता. हा डोंगर खूप उंच, अवघड आणि मोक्याचा होता. आदिलशाहाने या डोंगरावर एक किल्ला अर्धवट बांधून सोडून दिला होता. या किल्ल्यावरही पहारा ढिलाच होता, तेव्हा स्वराज्याच्या राजधानीसाठी हा किल्ला ताब्यात घ्यायचा, असे शिवरायांनी ठरवले.

**स्वराज्याची पहिली राजधानी :** एक दिवस शिवराय आपल्या निवडक सवंगड्यांसह या किल्ल्यावर चढले आणि त्यांनी किल्ला



**राजगड – पाली दरवाजा**

ताब्यात घेतला. तोरण्यावर सापडलेले काही धन मुरुंबदेवाच्या डागडुजीसाठी खर्च झाले. शिवरायांनी या किल्ल्याला नाव दिले 'राजगड'. गडावर पाथरवटांनी दगड घडवले. लोहाराने भाता फुंकला. सुतार, गवंडी, मजूर, भिस्ती अशी सारी माणसे कामाला लागली. राजवाडा, बारा महाल, अठरा कारखाने आणि राजगादी तयार झाली. राजगड ही स्वराज्याची पहिली राजधानी सजली.

**स्वराज्याची घोडदौड :** शिवरायांची घोडदौड सुरू झाली. बारा मावळांतील किल्ल्यांमागून किल्ले त्यांनी ताब्यात घेतले. बारा मावळांत आनंद आणि उत्साह यांना पूर आला. गावोगावचे पाटील, देशमुख शिवरायांच्या मुजऱ्याला येऊ लागले; परंतु तांदळात जसे काही खडे असतात, तसेच मावळांतही काही दुष्ट लोक होते. शिवरायांचा उत्कर्ष बघून त्यांच्या पोटात दुखू लागले. शिरवळच्या आदिलशाही ठाणेदाराकडे शिवरायांविरुद्ध तक्रारी गेल्या. ठाणेदाराने विजापूरला सांडणीस्वार पाठवून शिवरायांच्या या घोडदौडीची हकीकत आदिलशाहाच्या कानी घातली.

**शिवरायांचे चातुर्य :** आदिलशाहा चकित झाला. त्याने शहाजीराजांना जाब विचारला. शहाजीराजांना मोठा पेच पडला, पण त्यांनी वेळ निभावून नेली. 'जहागिरीचे रक्षण करण्यासाठी स्वत:कडे एकही किल्ला नाही, म्हणून शिवाजीराजांनी किल्ला घेतला असावा,' असे शहाजीराजांनी आदिलशाहास कळवले. शिवरायांनीही आदिलशाहाकडे जासूद पाठवला. 'जहागिरीचा कारभार व्यवस्थित चालावा म्हणून आम्ही किल्ला घेतला. आदिलशाहाच्या हितासाठीच किल्ला घेतला. यात दुसरा काहीही हेतू नाही.' असे धूर्तपणाचे उत्तर शिवरायांनी पाठवले.

कोंढाणा आणि पुरंदर हे दोन किल्लेही मोक्याचे होते. शिवरायांनी तेही युक्तीने काबीज केले. त्यानंतर रोहिडा ताब्यात घेतला. स्वराज्याची घोडदौड अशी जोरात सुरू झाली.

**१. रिकाम्या जागी कंसातील योग्य पर्याय लिहा.**

(अ) शिवरायांकडे पुणे, सुपे, चाकण व ........ या परगण्यांची जहागीर होती.

(इंदापूर, सासवड, वेल्हे)

(आ) शिवरायांनी .......... जिंकून स्वराज्याचे तोरण बांधायचे, असे ठरवले.

(सिंहगड, शिवनेरी, तोरणा)

(इ) स्वराज्याची पहिली राजधानी ......... ही सजली.

(राजगड, रायगड, प्रतापगड)

**२. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) महाराष्ट्रावर कोणत्या चार सत्ता हुकमत गाजवत होत्या ?

(आ) शिवरायांनी तोरणा किल्ल्यावर कोणत्या अधिकाऱ्यांच्या नेमणुका केल्या ?

(इ) शिवरायांनी आदिलशाहाला कोणते उत्तर पाठवले ?

**३. कारणे लिहा.**

(अ) स्वराज्याचे तोरण बांधण्यासाठी शिवरायांनी तोरणा किल्ल्याची निवड केली.

(आ) तोरणा किल्ल्यावर सापडलेल्या धनाच्या घागरी कामगारांनी शिवरायांजवळ आणून दिल्या.

**उपक्रम**

शिक्षकांच्या मदतीने तुमच्या परिसरातील किल्ल्यावर सहल आयोजित करा.

# ८. स्वकीय शत्रूंचा बंदोबस्त

**जरब बसवली :** शिवरायांच्या अवतीभोवती बारा मावळांतील मावळे गोळा झाले. शिवराय सांगतील ती कामगिरी ते बजावत होते. स्वराज्यासाठी जगायचे आणि स्वराज्यासाठी मरायचे, असे ते मानत होते. साधी-भोळी मराठमोळी माणसे ती ! त्यांना शिवराय म्हणजे जीव की प्राण वाटत; पण काही मंडळींना शिवरायांच्या कर्तृत्वाचा हेवा वाटे. अशांचा बंदोबस्त करणे शिवरायांना भाग पडले.

खंडोजी आणि बाजी घोरपडे हे सरदार आदिलशाहाच्या चाकरीत होते. आदिलशाहाने त्यांना शिवरायांच्या विरुद्ध चिथावले. कोंढाणा भागात त्यांनी धुमाकूळ माजवला; परंतु शिवरायांनी त्यांची डाळ शिजू दिली नाही. शिवरायांनी त्यांना पिटाळून लावले.

तसेच फलटणचे बजाजी नाईक निंबाळकर, हे तर शिवरायांचे मेहुणे. शिवरायांना त्यांच्या विरोधात जाऊनही लढाया कराव्या लागल्या; तथापि पुढे या घराण्यातील व्यक्ती शिवरायांच्या बरोबर राहिल्या.

शिवरायांचा जवळचा नातलग संभाजी मोहिते. हा त्यांच्या सुपे परगण्यात होता. त्यानेही शिवरायांविरुद्ध कारवाया सुरू केल्या. शिवरायांनी सुप्याला जाऊन त्याला पकडले आणि त्याची रवानगी कर्नाटक प्रांतात केली. कर्तव्यापुढे शिवराय नातेगोते मानत नसत.

**जावळीचे चंद्रराव मोरे :** शिवरायांच्या कार्याची थोरवी साऱ्या मावळ्यांना पटली. त्यांचे नाव सर्वत्र दुमदुमले. शिवराय लोकांचे राजे झाले, पण ते काही लोकांच्या डोळ्यांत खुपले. जावळीचे मोरे असेच होते. मोरे हे जावळीचे जहागीरदार. त्यांची जहागीर रायगडापासून कोयना खोऱ्यापर्यंत होती. ते विजापूरच्या आदिलशाहाचे जहागीरदार होते. आदिलशाहाने त्यांना 'चंद्रराव' हा किताब दिला होता. जावळीचे जंगल अत्यंत दाट होते. भरदिवसा सूर्यकिरणांनाही तेथे शिरकाव नव्हता. त्यात वाघ, लांडगे, अस्वले इत्यादी श्वापदे संचार करत. मोऱ्यांची जावळी म्हणजे जणू वाघाची जाळीच होती! त्यामुळे मोऱ्यांच्या वाटेला कोणी जात नसे, पण ती हिंमत केली शूर शिवरायांनी.

त्याला कारण असे - दौलतराव मोरे १६४५ साली मरण पावला. त्याच्या वारसांमध्ये तंटे सुरू झाले. शिवरायांनी यशवंतराव मोरे याला मदत केली. त्यांच्या मदतीनेच यशवंतराव जावळीच्या गादीवर चंद्रराव म्हणून बसला. त्या वेळी यशवंतरावाने शिवरायांना खंडणी देण्याचे कबूल केले. त्यांच्या कार्यात मदत करण्याचेही कबूल केले, पण गादीवर बसल्यावर मात्र तो सारे विसरला. कुठला शिवाजी आणि कुठला करार ! तो बेपर्वाईने वागू लागला. स्वराज्यातील मुलखावर स्वाऱ्या कर, प्रजेला त्रास दे, अशी दांडगाई यशवंतराव करू लागला. वेळीच त्याचा बंदोबस्त केला नाही तर स्वराज्याला धक्का पोहोचेल, हे शिवरायांनी ओळखले.

**'बंड केलिया मारले जाल' :** शिवरायांनी यशवंतराव मोरे याला प्रथम एक खरमरीत पत्र धाडले. 'तुम्ही राजे म्हणविता. राजे आम्ही.

आम्हांस श्रीशंभूने राज्य दिधले आहे, तर तुम्ही राजे न म्हणावे.'

यशवंतराव मोऱ्याने उद्धटपणे उत्तर लिहिले, 'तुम्ही काल राजे जाहला. तुम्हांस राज्य कोणी दिधले? येता जावळी, जाता गोवली....आम्हांस श्रींचे कृपेने आदिलशाहाने राजे हा किताब, छत्रचामर, सिंहासन मेहेरबान होऊन दिधले. येथे उपाय कराल तर अपाय होईल.'

शिवरायांनी उलट टोला दिला, 'जावळी खाली करून, राजे न म्हणोन, छत्रचामर दूर करून, हात रुमाले बांधून, भेटीस येऊन, हुजुराची चाकरी करणे. इतकियावर बंडखोरी केलिया, मारले जाल.'

जावळीभोवती घनदाट जंगल होते. रायरीचा किल्ला अजिंक्य होता. मोरे मंडळीही पुष्कळ होती. जावळी जिंकणे सोपे नव्हते. भरपूर तयारी करून शिवरायांनी जावळीवर स्वारी केली. सुमारे महिनाभर यशवंतरावाने झुंज दिली, पण त्याचे खूप सैन्य मारले गेले. अखेरीस आपल्या मुलांना घेऊन यशवंतराव रायरीवर पळाला. शिवरायांनी जावळी घेतली. नंतर शिवराय रायरीवर चालून गेले. त्यांनी रायरीच्या किल्ल्याला भक्कम वेढा दिला. यशवंतराव तीन महिने निकराने लढला, पण अखेरीस त्याला माघार घ्यावी लागली.

**किल्ले रायगड :** जावळीचा विजय फार महत्त्वाचा होता. त्या विजयामुळे शिवरायांचे स्वराज्य पूर्वीपेक्षा दुप्पट झाले. यशवंतरावाचे सैन्यही शिवरायांना येऊन मिळाले. रायरीचा प्रचंड किल्ला स्वराज्यात आला. हा किल्ला बघून शिवरायांना धन्य वाटले. त्यांनी या किल्ल्याचे नाव 'रायगड' ठेवले. त्यानंतर त्यांनी जवळच असलेल्या भोरप्या डोंगरावर एक नवीन किल्ला बांधला. त्याचे नाव ठेवले प्रतापगड.



**किल्ले रायगड**

१. चुकीची जोडी ओळखा.

(अ) फलटण - निंबाळकर

(आ) जावळी - मोरे

(इ) सुपे - जाधव

२. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.

(अ) जावळीच्या मोऱ्यांना आदिलशाहाने कोणता किताब दिला होता ?

(आ) जावळीचा विजय फार महत्त्वाचा का होता?

३. दोन-तीन वाक्यांत उत्तरे लिहा.

(अ) जावळीच्या मोऱ्यांच्या वाटेला कोणी का जात नसे ?

(आ) शिवरायांनी यशवंतराव मोरे याला कोणते पत्र धाडले ?

उपक्रम

(अ) रायगडाची चित्रे संग्रहित करा.

(आ) दिवाळीच्या सुट्टीत तुमच्या मित्रांसह रायगडाची प्रतिकृती तयार करा.

CXNDHH

## ९. प्रतापगडावरील पराक्रम

**आदिलशाही हादरली :** विजापूरच्या दरबारातील गोष्ट. शिवरायांच्या वाढत्या हालचाली ऐकून आदिलशाही दरबार काळजीत पडला. दरबारात झाडून सारे सरदार गोळा झाले. एकेक गाजलेले समशेरबहाद्दर दरबारात हजर होते. आदिलशाही कारभार बघणारी बडी साहेबीण जातीने दरबारात हजर होती. दरबारापुढे महत्त्वाचा प्रश्न होता– 'शिवाजीचा बीमोड कसा करायचा ?'

बडी साहेबीण हिने दरबारातील सरदारांना खडा सवाल केला, "सांगा, कोण तयार आहे शिवाजीचा बंदोबस्त करायला ?"

दरबारात शांतता पसरली. जो तो आपल्या जागी चूप! शिवरायांशी मुकाबला करण्याचे धाडस कोण दाखवणार? जो तो एकमेकांकडे बघू लागला. एवढ्यात धिप्पाड देहाचा एक सरदार लवून मुजरा करत पुढे आला. त्याचे नाव होते अफजलखान.

**खानाने विडा उचलला :** तबकातील विडा उचलत अफजलखान म्हणाला, "शिवाजी ? कुठला शिवाजी ? त्याला मी जिवंत कैद करून येथे पकडून घेऊन येतो आणि तसा न सापडला तर त्याला ठार मारून विजापुरी आणतोच आणतो."

अफजलखान म्हणजे विजापूर दरबारचा भारी सरदार. तुफान ताकदीचा ! पोलादी पहार हातांनी वाकवणारा. भल्याबुऱ्या कोणत्याही मार्गाने आपले काम करण्यात त्याचा हातखंडा ! अशा अफजलखानाने शिवरायांना जिवंत पकडून किंवा मारून आणण्याचा विडा भर दरबारात उचलला. सारा दरबार खूश झाला. दरबारात हजर असलेल्या प्रत्येकाला वाटले, 'आता शिवाजी भोसला कसला जिवंत राहतो ! थोड्याच दिवसांत विजापूर दरबारात साखळदंडात बांधलेल्या अवस्थेत शिवाजी हजर होणार, नाहीतर त्याचे मुंडके तरी दरबारात सादर होणार.'

अफजलखान मोठ्या ऐटीने, थाटामाटाने विजापुरातून बाहेर पडला. त्याने आपल्याबरोबर प्रचंड फौज व लढाईचे सामान घेतले. यापूर्वी अफजलखान बारा वर्षे वाईचा सुभेदार होता. त्यामुळे त्याला त्या मुलखाची चांगली माहिती होती. मोठ्या घमेंडीने तो महाराष्ट्राची वाट चालू लागला.

**स्वराज्यावरील संकट :** शिवराय त्या वेळी राजगडावर होते. त्यांना अफजलखान चालून येत आहे ही बातमी कळली. स्वराज्यावर मोठे संकट आले, हे त्यांनी ओळखले, पण ते डगमगले नाहीत. त्यांनी विचार केला – खान कपटी, त्याची फौज मोठी. आपले राज्य लहान, आपले सैन्य लहान. उघड्या मैदानावर काही खानापुढे आपला निभाव लागणार नाही ! त्याच्याशी युक्तीनेच सामना दिला पाहिजे, असे शिवरायांनी ठरवले. ते जिजामातेशी सल्लामसलत करून, तसेच त्यांचा आशीर्वाद घेऊन राजगडावरून निघाले आणि त्यांनी प्रतापगडाकडे कूच केले.

**अफजलखानाचे डावपेच :** शिवराय प्रतापगडावर गेले, ही बातमी खानाला कळताच तो चिडला. त्याला माहीत होते, प्रतापगडावर

चालून जाणे सोपे नाही, कारण तो किल्ला होता डोंगरात. भोवताली घनदाट जंगल होते. वाटेत उंचउंच डोंगर होते. फौजेला जायला चांगली वाट नव्हती. तोफा चढवायला मार्ग नव्हता. शिवाय तेथे जंगली जनावरांचा तर भयंकर सुळसुळाट !

शिवरायांनी प्रतापगडावरून उतरून खाली यावे, म्हणून खानाने डावपेच खेळण्यास सुरुवात केली. तुळजापूर, पंढरपूर या देवस्थानांना उपद्रव दिला. रयतेचा खूप छळ केला. हे ऐकून तरी शिवराय प्रतापगड सोडतील व बाहेर येतील, असा खानाचा डाव होता. शिवरायांनी खानाचा डाव ओळखला. त्यांनी प्रतापगड सोडलाच नाही, तेव्हा खानाने दुसरा डाव टाकला. प्रेमळपणाचे सोंग घेऊन त्याने शिवरायांना निरोप पाठवला, 'तुम्ही माझ्या मुलासारखे. मला भेटायला या. आमचे किल्ले परत द्या. तुम्हांला मी आदिलशाहाकडून सरदारकी देववितो.'


**शेरास सव्वाशेर :** खान आपल्याशी कपटी डाव खेळतो आहे, हे शिवरायांनी झटकन ओळखले. ते सावधगिरीने वागत होते. त्यांनी खानालाच प्रतापगडाखाली खेचून आणण्याचा निर्धार केला. त्यांनी खानाला निरोप पाठवला, 'खानसाहेब, मी तुमचे किल्ले घेतले. मी अपराधी आहे. मला क्षमा करा. आपणच प्रतापगडाखाली भेटायला यावे. मला तिकडे येण्याची भीती वाटते.'

शिवरायांचा निरोप ऐकून अफजलखान हसला. 'वा ! बहोत खुशी!' आपली दाढी कुरवाळत तो म्हणाला. त्याला वाटले, या अफजलखानापुढे शिवाजीची काय बिशाद ! हा डरपोक माझ्याशी कसली लढाई खेळतो ! आपणच जावे आणि भेटीत त्याला चिरडून टाकावे. बस्स ! खान शिवरायांना प्रतापगडाखाली भेटायला तयार झाला.

**भेट ठरली :** प्रतापगडाखालच्या माचीवर भेटण्याची जागा ठरली. दिवस ठरला, वेळ



**किल्ले प्रतापगड**




ठरली. भेटीच्या वेळी दोघांनी आपल्याबरोबर एक-एक सेवक आणावा आणि आपले दहा अंगरक्षक ठरलेल्या ठिकाणी दूर ठेवावे, असे ठरले. महाराजांनी खानासाठी चांगली वाट तयार करवून घेतली. भेटीसाठी छानसा शामियाना उभारला.

शिवराय फार सावधगिरीने वागत होते. त्यांनी आपल्या सैन्याच्या निरनिराळ्या तुकड्या केल्या. जंगलात कोणी कोठे लपून राहायचे, काय करायचे, याबद्दल त्यांना सूचना दिल्या. कडेकोट बंदोबस्त केला. खान कपटी आहे, शिवरायांनी त्याची भेट घेऊ नये, असे त्यांना काही सल्लागारांनी सांगितले, पण शिवरायांनी खानाला भेटायचे नक्की ठरवले.

**भेटीची तयारी :** भेटीचा दिवस उजाडला. सकाळी शिवरायांनी भवानीदेवीचे दर्शन घेतले. थोड्या वेळाने त्यांनी पोशाख करण्यास सुरुवात केली. पायांत सुरवार चढवली. अंगात चिलखत घातले. त्यावर जरीचे कुडते व अंगरखा घातला. डोक्यास जिरेटोप घातला. त्यावर मंदील बांधला. डाव्या हाताच्या बोटांत वाघनखे चढवली. त्याच हाताच्या अस्तनीत बिचवा लपवला. सोबत पट्टा घेतला. शिवराय खानाच्या भेटीसाठी असे तयार झाले.

बाहेर सरदार उभे होते. शिवराय त्यांना म्हणाले, ‘‘गड्यांनो, आपापली कामे नीट करा. भवानीआई यश देणार आहे, पण समजा आमचे काही बरेवाईट झाले, तर तुम्ही धीर सोडू नका. संभाजीराजांना गादीवर बसवा. मासाहेबांच्या आज्ञेत वागा. स्वराज्य वाढवा. रयत सुखी करा. आम्ही निघालो !’’ शिवराय निघाले. बरोबर वकील पंताजी गोपीनाथ आणि जिवाजी महाला, संभाजी कावजी, येसाजी कंक, कृष्णाजी गायकवाड, सिद्दी इब्राहिम इत्यादी दहा अंगरक्षक होते.

खान शिवरायांच्या आधीच शामियान्यात येऊन बसला होता. मनोराज्य करत होता. त्याच्या शेजारी बडा सय्यद नावाचा त्याचा हत्यारबंद शिपाई उभा होता. तो पट्टा चालवण्यात मोठा पटाईत होता. शिवराय शामियान्याच्या दाराजवळ आले. बडा सय्यदकडे पाहताच ते तेथेच उभे राहिले. खानाने महाराजांच्या वकिलाला विचारले, ‘‘शिवाजीराजे आत का येत नाहीत ?’’

वकील म्हणाला, ‘‘ते बडा सय्यदला भितात. त्याला तेवढा दूर करा !’’बडा सय्यद दूर झाला. शिवराय आत गेले. खान उठून म्हणाला, ‘‘या, राजे, भेटा आम्हांला.’’



**शिवराय–अफजलखान भेट**

**अफजलखानाशी झटापट :** महाराज सावध होऊन पुढे झाले. खानाने शिवरायांना आलिंगन दिले. धिप्पाड खानापुढे शिवराय ठेंगणे होते. शिवरायांचे मस्तक खानाच्या छातीवर आले. त्यासरशी खानाने शिवरायांना ठार करण्यासाठी त्यांची मान आपल्या डाव्या बगलेत दाबली आणि दुसऱ्या हाताने शिवरायांच्या कुशीत कट्यारीचा वार केला. शिवरायांच्या अंगावरील अंगरखा टर्रकन फाटला. अंगरख्याखाली चिलखत असल्यामुळे शिवराय बचावले. त्यांनी खानाचा डाव ओळखला. अत्यंत चपळाईने त्यांनी खानाच्या पोटावर वाघनखांचा मारा केला. डाव्या हाताच्या अस्तनीत लपवलेला बिचवा उजव्या हाताने काढून त्यांनी तो खसकन खानाच्या पोटात खुपसला. खानाची आतडी बाहेर पडली. खान कोसळला. एवढ्यात त्याचा वकील कृष्णाजी भास्कर पुढे आला. त्याने शिवरायांवर तलवारीचा वार केला, पण शिवरायांनी पट्ट्याच्या एका घावात त्याला ठार केले. ही खणाखणी ऐकून बडा सय्यद शामियान्यात घुसला. तो शिवरायांवर वार करणार, एवढ्यात जिवाजी महाला धावून आला. बडा सय्यदचा वार आपल्या अंगावर घेऊन जिवाजी महालाने एका घावात त्यास जागच्या जागी ठार केले. 'होता जिवा म्हणून वाचला शिवा', अशी म्हणच पुढे रूढ झाली. या वेळी झालेल्या संघर्षात संभाजी कावजीने मोठा पराक्रम केला.

**अफजलखानाच्या फौजेची दाणादाण:** विजयी शिवराय गडावर गेले. इशाऱ्याची तोफ झाली. शिवरायांचे सैन्य इशाऱ्याची वाटच बघत होते. तोफ होताच झाडीत लपून राहिलेले शिवरायांचे सैन्य खानाच्या फौजेवर तुटून पडले. खानाच्या फौजा बेसावध होत्या. त्यांना पळायलाही वाट सापडेना. मराठ्यांनी जोराचा

पाठलाग केला आणि खानाच्या फौजेचा धुव्वा उडवला. अफजलखानाचा मुलगा फाजलखान कसाबसा निसटला व विजापूरला पोहोचला. त्याने सांगितलेली बातमी ऐकून विजापुरात हाहाकार उडाला.

विजापूरचा सर्वांत बलाढ्य सरदार शिवरायांनी हां हां म्हणता धुळीस मिळवला. शिवरायांचे नाव सगळीकडे दुमदुमले. त्यांच्या पराक्रमाचे पोवाडे सह्याद्रीच्या कडेकपारीतून घुमू लागले.

## स्वाध्याय

**१. दिलेल्या अक्षरांवरून योग्य शब्द तयार करा.**

(अ) ता ग प्र ड प ....................

(आ) व रा य शि ....................

(इ) खा अ ज न ल फ ....................

**२. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) अफजलखानाने कोणता विडा उचलला ?

(आ) प्रेमळपणाचे सोंग घेऊन अफजलखानाने शिवरायांना कोणता निरोप पाठवला ?

**३. दोन-तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) शिवरायांनी अफजलखानाशी युक्तीनेच सामना देण्याचे का ठरवले ?

(आ) अफजलखानाच्या भेटीला जाताना शिवराय आपल्या सरदारांना काय म्हणाले ?

**४. कारणे लिहा.**

(अ) शिवराय प्रतापगडावर गेले, ही बातमी खानाला कळताच तो चिडला.

(आ) विजापुरात हाहाकार उडाला.

**उपक्रम**

इतिहासाच्या संदर्भात म्हणींचे संकलन करा. उदा., ‘होता जिवा म्हणून वाचला शिवा’.

CXX9Y5

# १०. शर्थीने खिंड लढवली

**पन्हाळा जिंकला आणि आदिलशाहा चिडला :** अफजलखानाच्या वधामुळे विजापुरात हाहाकार उडाला. त्याच्या मागोमाग शिवरायांनी विजापूरकरांच्या ताब्यातील पन्हाळगड जिंकला. त्यामुळे आदिलशाहा भयंकर चिडला. त्याला अन्नपाणी गोड लागेना. शिवरायांचा नाश करण्यासाठी त्याने सिद्दी जौहर या सरदाराला पाठवले. फार मोठी फौज घेऊन सिद्दी जौहर निघाला. फाजलखानही बापाच्या वधाचा सूड घेण्यासाठी त्याच्याबरोबर निघाला.

**पन्हाळगडचा वेढा :** सिद्दी जौहर शूर पण क्रूर होता. त्याची शिस्त कडक होती. त्याने पन्हाळगडाला चौफेर वेढा घातला. शिवरायांना गडात कोंडले. पावसाळ्याचे दिवस जवळ आले होते. पावसाळा सुरू झाला, की सिद्दी जौहर वेढा उठवील असे शिवरायांना वाटले, पण पाऊस सुरू होताच त्याने वेढा अधिकच कडक केला. गडावरची शिदोरी संपत आली. आता काय करावे ? शक्तीचे काम नाही, तेव्हा युक्तीने सुटका करून घेण्याचे शिवरायांनी ठरवले. 'लवकरच किल्ला तुमच्या स्वाधीन करतो,'असा निरोप त्यांनी सिद्दीला पाठवला. तो खूश झाला. त्याने ते कबूल केले.

वेढ्याच्या कामाने सिद्दीचे सैनिक कंटाळले होते. शिवाजी शरण येत आहे, हे ऐकून त्यांना आनंद झाला. खाणे-पिणे, गाणे-बजावणे व हुक्कापाणी यांत ते दंग होऊन गेले.

**शिवराय वेढ्यातून बाहेर :** शिवरायांनी वेढ्यातून निसटून जाण्यासाठी एक युक्ती योजली. त्यांनी दोन पालख्या सज्ज केल्या. एकीतून शिवराय अवघड वाटेने बाहेर जाणार आणि दुसरीतून शिवरायांचा वेश धारण केलेली व्यक्ती राजदिंडी दरवाजातून बाहेर पडणार. दुसरी पालखी शत्रू सैन्याला सहज दिसणार असल्याने ती पकडली जाणार आणि शिवाजीराजाच पकडल्याचे समजून शत्रू जल्लोष करणार, एवढ्यात शिवराय अवघड वाटेने निसटून जाणार, अशी ती योजना होती. त्यासाठी एक बहादूर तरूण तयार झाला. तो दिसायला शिवरायांसारखाच होता. त्याचे नाव होते शिवा काशिद. शिवरायांच्या सेवेतील केशभूषा करणारा तो सेवक होता. तो मोठा धाडसी आणि चतुर होता.

ठरल्याप्रमाणे शिवाची पालखी राजदिंडीच्या बाहेर पडली. रात्रीची वेळ होती. धो धो पाऊस पडत होता, तरीही शत्रूचे काही सैनिक पहारा देत होते. त्यांनी ही पालखी पकडली. शिवाजीराजाच पकडला ! असे समजून त्यांनी ती पालखी सिद्दी जौहरच्या छावणीत नेली. तेथे जल्लोष सुरू झाला. दरम्यान शिवराय दुसऱ्या अवघड वाटेने गडाबाहेर पडले. सोबत बाजीप्रभू देशपांडे आणि त्यांचे निवडक सैनिक होते. सोबत बांदल देशमुख यांची फौजही होती. इकडे थोड्या वेळाने शिवा काशिदचा डाव उघडकीस आला. तेव्हा सिद्दीने संतापून त्याला तत्काळ ठार केले. शिवरायांसाठी, स्वराज्यासाठी शिवा काशिदने आत्मबलिदान केले. तो अमर झाला.

शिवराय हातावर तुरी देऊन निसटल्याचे लक्षात येताच सिद्दी चवताळून गेला. त्याने तातडीने सिद्दी मसऊद या आपल्या सरदाराला मोठ्या फौजेनिशी शिवरायांचा पाठलाग करण्यास पाठवले. पाठलाग चालू झाला. दिवस उजाडल्यावर त्यांनी शिवरायांना पांढरपाणी ओढ्यावर गाठले. शिवराय पेचात पडले. त्यांनी कशीबशी घोडखिंड ओलांडली.

**बाजीप्रभूचा बाणेदारपणा :** चवताळलेल्या सिद्दीचे सैनिक जोराने खिंडीकडे दौडत येत होते. शिवरायांना वाटले, आता विशाळगड गाठणे कठीण. ते बाजीप्रभूला म्हणाले,''बाजी, वेळ आणीबाणीची आहे. पुढील वाट चढणीची. मागे शत्रू पाठीवर. आता विशाळगड हाती लागत नाही. चला, शत्रूला उलटून तोंड देऊया !'' शिवरायांच्या मनातील घालमेल बाजीप्रभूने ओळखली. खिंडीच्या रोखाने शत्रू चवताळून येत होता. शिवरायांचे जीवित धोक्यात होते. सारे स्वराज्य धोक्यात होते. बाजीप्रभूने शिवरायांना कळकळीने सांगितले, '' महाराज, तुम्ही थोडे सैनिक घेऊन विशाळगडाकडे चला. उरलेल्या सैनिकांसह मी खिंडीत उभा राहतो. महाराज, मी मरेन पण शत्रूला खिंड चढू देणार नाही. एक बाजी गेला तर तुम्हांला दुसरा मिळेल, पण स्वराज्याला शिवाजी महाराजांची गरज आहे. गनिमांची संख्या अफाट आहे. आपण थोडे आहोत. येथे आपला निभाव लागणार नाही. तुम्ही येथे थांबू नका. आम्ही खिंड रोखून धरतो. गनिमाला आम्ही येथेच थोपवून धरू. तुम्ही गडावर पोहोचेपर्यंत आम्ही येथे शत्रूला अडवून धरू. तुम्ही निर्धास्तपणे जा.'' बाजीप्रभूची स्वामिभक्ती बघून शिवराय गहिवरले. बाजीसारखा मोहरा इरेला घालणे त्यांच्या जिवावर आले होते, पण त्यांना स्वराज्याचे ध्येय गाठायचे होते. त्यांनी मन आवरले. शिवराय बाजीला प्रेमाने भेटले व म्हणाले,''आम्ही गडावर जातो. तेथे पोहोचताच तोफांचे आवाज होतील; मग ताबडतोब खिंड सोडून तुम्ही निघून या.''

**बाजीने शत्रूला रोखले :** बाजीप्रभूला खिंडीत मागे ठेवून शिवराय विशाळगडाकडे निघाले. बाजीने शिवरायांच्या पाठमोऱ्या मूर्तीला लवून मुजरा केला. मग त्याने आपल्या हातात समशेर घेतली आणि तो खिंडीच्या तोंडाशी उभा राहिला. त्याने मावळ्यांच्या तुकड्या पाडल्या. त्यांना जागा नेमून दिल्या. मावळ्यांनी दगड-गोटे जमा केले आणि ते आपापल्या जागी तयारीने उभे राहिले. खिंडीच्या तोंडावर मावळ्यांची पोलादी फळी तयार झाली. इतक्यात शत्रूच्या युद्धगर्जना ऐकू आल्या. शत्रू खिंडीखाली आला होता. बाजी मावळ्यांना म्हणाला, ''बहादूर मर्दांनो, हुशार ! जीव गेला तरी जागा सोडू नका. गनिमांना खिंड चढू देऊ नका.'' बाजीप्रभू आणि त्याचे मावळे खिंडीच्या तोंडाशी पाय रोवून उभे ठाकले. खिंडीतली वाट बिकट व नागमोडी होती. एका वेळी तीन-चार माणसे कशीबशी वर चढू शकत.

तिकडे शिवराय विशाळगडाकडे वाऱ्यासारखे धावत होते. विशाळगडाचा पायथा अजून दूर होता. गडावर पोहोचण्यासाठी शिवरायांना दीड-दोन तास हवे होते. तेवढा वेळ बाजीने खिंड अडवून ठेवल्यास शिवरायांचे काम फत्ते होणार होते.

**खिंडीतील झुंज :** इकडे खिंडीत शर्थीची झुंज सुरू झाली. शत्रू खिंड चढू लागला.



घोडखिंडीत शिवराय व बाजीप्रभू देशपांडे

शत्रूची पहिली तुकडी खिंडीवर येऊन धडकली. मावळ्यांनी शत्रूवर दगडांचा वर्षाव सुरू केला. दगडधोंड्यांचा मारा करण्यात मावळे पटाईत. त्यांनी सराईतपणाने हाणामारी सुरू केली. शिवरायांच्या मावळ्यांनी कित्येक गनिमांना टिपले. कित्येकांची डोकी फुटली. पहिली तुकडी नामोहरम झाली. मागे हटली. पुन्हा दुसरी तुकडी नेटाने खिंड चढू लागली. बाजीप्रभू ओरडला, ''हाणा, मारा.'' मावळ्यांना स्फुरण चढले. 'हर हर महादेव' अशी गर्जना करत ते शत्रूवर तुटून पडले. पुन्हा दगडांचा वर्षाव सुरू झाला. शत्रू धडाधड कोसळू लागला. बाजी बेहोश होऊन ओरडला, ''शाब्बास माझ्या पठ्ठ्यांनो! फेका आणखी दगड. ठेचा गनिमांना. होऊ द्या जोराचा मारा ! शाब्बास तुमची.'' दुसऱ्या तुकडीचा निकाल लागला.

तिकडे शिवराय विशाळगडाकडे घोडदौड करत होते. गडाचा पायथा जवळ येत होता. प्रत्येक क्षण महत्त्वाचा होता. विशाळगडाच्या पायथ्याशीही शत्रूचा वेढा होता. शिवरायांनी आपल्या निवडक साथीदारांसह शत्रूच्या मोर्चावर हल्ला चढवला. शत्रूबरोबर झुंज देत शिवराय पुढे सरकले. ते आपल्या मावळ्यांसह शत्रूची कोंडी फोडून विशाळगडाच्या माथ्याकडे धाव घेत होते.

**बाजीचा पराक्रम :** इकडे घोडखिंडीत शर्थीची झुंज अजून चालू होती. सिद्दी मसऊद चिडला होता. त्याची तिसरी तुकडी खिंड चढू लागली. मराठ्यांनी शौर्याची शर्थ केली. शत्रूने बाजीप्रभूवर हल्ला चढवला. बाजीला घेरले. बाजी त्वेषाने लढू लागला. त्याने पराक्रमाची शर्थ केली. बाजीच्या अंगावर अनेक वार झाले. जागोजागी जखमा झाल्या. अंगातून रक्ताच्या धारा वाहू लागल्या. तरीही त्याने खिंडीचे तोंड सोडले नाही. त्याचा सारा देह रक्ताने न्हाऊन निघाला, पण तो मागे हटला नाही. त्याने मधेच ओरडून मावळ्यांना सूचना दिली. मावळ्यांनी शत्रूवर निकराचा मारा केला. शत्रू हटला. बाजीप्रभू घायाळ झाला होता, तरीही मावळ्यांना झुंज चालू ठेवण्यास तो बजावत होता. त्याचे सारे लक्ष तोफांच्या आवाजाकडे होते.

**ती पावनखिंड :** एवढ्यात तोफेचा आवाज कडाडला. तोफांचे आवाज धारातीर्थी कोसळलेल्या बाजीच्या कानी पडले. ''महाराज गडावर पोहोचले. मी माझी चाकरी बजावली. आता मी सुखाने मरतो,'' असे म्हणून त्या स्वामिभक्त बाजीप्रभूने प्राण सोडला. ही वार्ता विशाळगडावर महाराजांना समजली, तेव्हा त्यांना मोठे दु:ख झाले आणि ते म्हणाले, ''बाजीप्रभू देशपांडे स्वराज्यासाठी धारातीर्थी पडले. बांदलांच्या लोकांनी युद्धाची शर्थ केली!''

बाजीप्रभूसारखे देशभक्त होते, म्हणून स्वराज्याचे पाऊल पुढे पडले. त्या स्वामिनिष्ठांच्या रक्ताने घोडखिंड पावन झाली. 'पावनखिंड' या नावानेच इतिहासात ती अमर झाली. धन्य ते वीर आणि धन्य धन्य तो बाजीप्रभू!

## स्वाध्याय

**१. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) सिद्‌दी जौहरने ......... गडाला चौफेर वेढा घातला.

(आ) बाजीप्रभूची ......... बघून शिवराय गहिवरले.

(इ) घोडखिंड ........ या नावानेच इतिहासात अमर झाली.

## २. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.

(अ) शिवरायांनी पन्हाळगडाच्या वेढ्यातून सुटका करून घेण्यासाठी सिद्दीला कोणता निरोप पाठवला ?

(आ) सिद्दी जौहर का चवताळला ?

(इ) विशाळगडाकडे जाताना शिवराय बाजीप्रभूला काय म्हणाले ?

## ३. दोन-तीन वाक्यांत उत्तरे लिहा.

(अ) पन्हाळगडाच्या वेढ्यातून बाहेर पडण्यासाठी शिवरायांनी कोणती युक्ती योजली ?

(आ) बाजीप्रभूने शत्रूला घोडखिंडीत रोखण्यासाठी कोणती योजना आखली ?

## ४. कारणे लिहा.

(अ) आदिलशाहा भयंकर चिडला.

(आ) शिवरायांच्या सेवेमधील शिवा काशिद अमर झाला.

(इ) पावनखिंड इतिहासात अमर झाली.

## ५. कोण ते लिहा.

(अ) शूर पण क्रूर होता. ......................

(आ) घोडखिंडीत शर्थीची झुंज देणारे. ...........

(इ) वेढ्यातून निसटून जाणारे. ..................

## उपक्रम

शिवरायांच्या सेवेमधील स्वामिनिष्ठ सेवकांची शिक्षकांच्या मदतीने अधिक माहिती मिळवा.

CY7525

# ११. शायिस्ताखानाची फजिती


**शायिस्ताखानाची स्वारी :** विजापूरच्या आदिलशाहाने जंगजंग पछाडले, पण शिवरायांपुढे त्याचे काही चालले नाही. त्याच्या प्रत्येक सरदाराला शिवरायांनी चांगलाच हात दाखवला. शेवटी आदिलशाहा नरम झाला. त्याने शिवरायांशी तह केला आणि त्यांचे स्वतंत्र राज्य मान्य केले. यामुळे काही काळ दक्षिणेची बाजू सुरक्षित झाली.

मग शिवराय उत्तरेतील मुघलांकडे वळले. मुघलांच्या स्वाऱ्यांनी महाराष्ट्राची धूळधाण उडाली होती. त्या वेळी दिल्लीला औरंगजेब हा मुघल बादशाहा होता. त्याच्या मुलखावर शिवरायांनी स्वाऱ्या केल्या. त्यामुळे बादशाहा चिडला. त्याने आपला मामा शायिस्ताखान याला शिवरायांवर पाठवले. तो पुण्यावर चालून आला. त्याच्याबरोबर पाऊण लाख सैन्य होते. शेकडो हत्ती, उंट आणि तोफा होत्या. शिरवळ, शिवापूर, सासवड अशी गावे घेत घेत शायिस्ताखान आला. त्याने पुरंदर किल्ल्याला वेढा दिला. तो पुढेपुढेच येत होता, पण एकदा मात्र डोंगराच्या खिंडीत मराठ्यांनी त्याला गाठले. मराठे अतिशय चपळ, भीमथडी तट्टावर बसणारे! चटणी-भाकरी खावी, अंगावर घोंगडी टाकावी आणि वाऱ्याच्या वेगाने डोंगरदऱ्यांतून धावपळ करावी, यांत मराठे फार पटाईत. मराठ्यांच्या गनिमी काव्यामुळे शायिस्ताखानाचे सैन्य हैराण झाले. कंटाळून त्याने पुरंदरचा वेढा उठवला.

**फिरंगोजी नरसाळा :** मग शायिस्ताखान पुण्याकडे वळला. प्रथम त्याने चाकणचा किल्ला घेतला. चाकणच्या किल्ल्यात फिरंगोजी नरसाळ्याने मोठ्या मर्दुमकीने शायिस्ताखानाशी मुकाबला केला. दोन महिने फिरंगोजीने किल्ला लढवला, पण शायिस्ताखानाच्या तोफखान्यापुढे त्याचा टिकाव लागला नाही. फिरंगोजी नरसाळ्याच्या शौर्यावर शायिस्ताखान खूश झाला. त्याने त्याला बादशाही चाकरीचे आमिष दाखवले, पण फिरंगोजी बदलला नाही.

**लाल महालात शायिस्ताखान :** शायिस्ताखान पुण्यात आला. त्याने शिवरायांच्या लाल महालात मुक्काम ठोकला. त्याच्या फौजेने लाल महालाभोवती तळ दिला. एक वर्ष गेले, दुसरे गेले, पण खान काही लाल महालातून हलेना. उलट तो अधूनमधून आपली फौज भोवतालच्या मुलखात पाठवी. रयतेची गुरे ओढून आणी, शेतीची नासधूस करी. अशा रीतीने त्याने पुण्याच्या भोवतालचा मुलूख उद्ध्वस्त केला.

**धाडसी बेत :** शायिस्ताखानाची खोड मोडायचीच, असे शिवरायांनी ठरवले. खान लाल महाल बळकावून बसला होता, हे एका दृष्टीने शिवरायांना सोईचेच होते, कारण त्या वाड्यातील खोल्या, दालने, खिडक्या, दारे, वाटा, चोरवाटा यांची शिवरायांना सारी काही माहिती होती. शिवाय शिवरायांचे हुशार हेर खानाच्या गोटात शिरलेले होतेच. खुद्द शायिस्ताखानाच्या महालात मध्यरात्री शिरावे आणि त्याला उडवावे, असा बेत शिवरायांनी केला. किती धाडसी बेत होता हा ! महालात शिरायला मुंगीलाही वाव नव्हता. लाल महालाभोवती पाऊण लाख फौजेचा खडा पहारा होता. हत्यारबंद मराठ्यांना गावात



**शिवरायांचा शायिस्ताखानावर हल्ला**

यायला शायिस्ताखानाने मनाई केली होती, पण शिवरायांचा निर्धार एकदा झाला म्हणजे झाला.

शिवरायांनी दिवस निश्चित केला. तारीख ५ एप्रिल १६६३ ची रात्र. वाजतगाजत लग्नाची वरात चालली होती. पुढे चंद्रज्योती जळत होत्या. शेकडो स्त्री-पुरुष नटूनथटून चालले होते. कोणी पालख्यांत, कोणी मेण्यांत, तर कोणी पायी. शिवराय आपली माणसे घेऊन त्या वरातीत शिरले होते. वरात पुढे निघून गेली. सर्वत्र सामसूम झाली. शिवराय आणि त्यांची माणसे लाल महालाच्या भिंतीकडे सरकली. या वेळी शायिस्ताखान गाढ झोपला होता.

**शायिस्ताखानाची खोड मोडली :** वाड्याच्या भिंतीला भगदाड पाडून शिवराय आत शिरले. त्यांचा स्वत:चाच वाडा तो! त्यांना त्याचा कोनाकोपरा माहीत होता. खानाचे पहारेकरी पेंगत होते. शिवरायांच्या माणसांनी त्यांना बांधून टाकले. शिवराय आणखी आत शिरले. इतक्यात कोणीतरी तलवार घेऊन त्यांच्यावर धावून आला. शिवरायांनी त्याला ठार केले. त्यांना वाटले शायिस्ताखान असावा, पण तो त्याचा मुलगा होता. गडबड झाली. लोक जागे झाले.

शिवराय थेट खानाच्या झोपण्याच्या महालात गेले. त्यांनी समशेर उपसली. शायिस्ताखान घाबरला. 'सैतान! सैतान!' म्हणून ओरडत खिडकीवाटे पळू लागला. शिवराय त्याच्या मागोमाग धावले. शायिस्ताखान खिडकीवाटे बाहेर उडी टाकणार, तोच शिवरायांनी त्याच्यावर वार केला. खानाची तीन बोटे कापली गेली. प्राणावर आले ते बोटांवर निभावले. खान खिडकीतून उडी टाकून पळाला. 'शिवाजी आला, धावा, धावा! पकडा त्याला,' असे मुद्दाम फसवण्यासाठी म्हणत शिवराय आणि त्यांची माणसे ओरडत पळत सुटली. खानाची माणसेही घाबरून पळत होती. शिवराय आणि त्यांची माणसे सिंहगडाकडे निघून गेली. खानाची माणसे शिवरायांना रात्रभर शोधतच राहिली.

शायिस्ताखानाने तर हायच खाल्ली. 'आज बोटे तुटली, उद्या आपले शीर शिवाजी कापून नेईल', अशी भीती त्याला वाटू लागली. औरंगजेब बादशाहाला हा प्रकार समजताच त्याला भयंकर राग आला. तो शायिस्ताखानावर नाराज झाला. त्याने फर्मान काढून खानाची रवानगी बंगालमध्ये केली.

मुघल सत्तेला बसलेला हा पहिला तडाखा मोठा जबरदस्त होता. शिवराय फत्ते होऊन आले. तोफा उडाल्या. साऱ्या महाराष्ट्रात आनंदीआनंद झाला.

## स्वाध्याय

**१. रिकाम्या जागी कंसातील योग्य पर्याय लिहा.**

(अ) शायिस्ताखानाने ......... किल्ल्याला वेढा दिला.
(पुरंदर, पन्हाळा, शिवनेरी)

(आ) शायिस्ताखानाने पुण्यात......... मुक्काम ठोकला.
(शनिवारवाड्यात, लाल महालात, पर्वतीवर)

(इ) औरंगजेब बादशाहाने शायिस्ताखानाची रवानगी ........ केली.
(आसाममध्ये, कर्नाटकमध्ये, बंगालमध्ये)

**२. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) शायिस्ताखान कोणती गावे घेत पुण्याला आला ?

(आ) शायिस्ताखानाचे सैन्य हैराण का झाले ?

(इ) शायिस्ताखानाला कोणती भीती वाटू लागली ?

**३. कारणे लिहा.**

(अ) औरंगजेब बादशाहा शिवरायांवर चिडला.

(आ) शायिस्ताखान खिडकीवाटे पळू लागला.

**४. घटना कालानुक्रमे लावा.**

(अ) शिवराय आणि त्यांची माणसे सिंहगडाकडे निघून गेली.

(आ) शायिस्ताखानाने लाल महालात मुक्काम ठोकला.

(इ) शायिस्ताखानाने चाकणचा किल्ला घेतला.

(ई) शिवरायांनी शायिस्ताखानाची खोड मोडली.

**उपक्रम**

लाल महालास भेट देण्यासाठी सहलीचे आयोजन करा.

CYG22F

# १२. पुरंदरचा वेढा व तह

**सुरतेवर छापा :** या विजयानंतर शिवराय स्वस्थ बसले नाहीत. औरंगजेब बादशाहाच्या फौजा महाराष्ट्रात धुमाकूळ घालत होत्या, तेव्हा बादशाहावर जबर वचक बसवण्यासाठी शिवरायांनी सुरत शहरावर छापा घातला. कुठे पुणे व कुठे सुरत ? सुरत म्हणजे त्या वेळची मुघली मुलखातील मोठी व्यापारपेठ. खूप सधन. शिवरायांनी सुरतेवर छापा घालून लक्षावधी रुपयांची लूट मिळवली. सुरतेच्या लुटीत शिवरायांनी नीती सोडली नाही. चर्च अथवा मशिदी यांना हात लावला नाही. स्त्रियांना त्रास दिला नाही.

सुरतेवरील या आक्रमणामुळे बादशाहा भयंकर चिडला. त्याने मराठ्यांचे राज्य नष्ट करण्याचा निश्चय केला. मिर्झाराजे जयसिंग या आपल्या बलाढ्य सेनापतीला त्याने शिवरायांवर धाडले. त्याच्या सोबतीला दिलेरखान हा आपला विश्वासू सरदार दिला. अलोट खजिना आणि अफाट दारूगोळाही बरोबर दिला. जयसिंग आणि दिलेरखान प्रचंड फौजेसह दक्षिणेत येऊन पोहोचले. स्वराज्यावर फार मोठे संकट आले.

सुरतेच्या मोहिमेवरून शिवराय परततात, तोच सन १६६४ मध्ये त्यांना कर्नाटकातून एक दु:खद बातमी समजली. शहाजीराजे यांचे शिकारीच्या प्रसंगी अपघाती निधन झाले. शिवराय व जिजाऊ यांच्यावर दु:खाचा डोंगर कोसळला. मातोश्रींच्या गळा पडून शिवरायांनी या दु:खातून त्यांना सावरले.



पुरंदर किल्ला

**पुरंदरला मुघलांचा वेढा :** पुरंदर हा शिवरायांचा प्रचंड व बळकट किल्ला होता. हा किल्ला घेतल्याशिवाय शिवरायांचा बीमोड होऊ शकणार नाही, हे दिलेरखान जाणून होता. त्यामुळे दिलेरखानाने पुरंदरला वेढा दिला. त्याची फौज फार मोठी होती, पण पुरंदरचा किल्लेदार मुरारबाजी मोठा जिद्दीचा वीर होता. त्याच्या हाताखालचे शिपाई मोठे शूर गडी होते. हे सारे शूर शिपाई घेऊन मुरारबाजी लढाईला उभा राहिला.

दिलेरखानाच्या तोफा कडाडू लागल्या. तोफेचे लालभडक गोळे किल्ल्यावर कोसळू लागले, पण मुरारबाजी व त्याचे मावळे हटले नाहीत. ते अधिक जोराने झुंजू लागले. मुघलांनी तोफांचा भडिमार केला. माचीचा बुरूज ढासळला. मुघल माचीवर घुसले. दिलेरखानाने माची जिंकली. मराठ्यांनी वरच्या बालेकिल्ल्याचा आश्रय घेतला. ते लढतच राहिले. दिलेरखान आपल्या छावणीतून ही लढाई बघत होता.

मुरारबाजी रागाने लाल झाला होता. त्याने पाचशे मावळे निवडले. त्यांना घेऊन त्याने मुघलांवर हल्ला करायचा बेत केला. बालेकिल्ल्याचा दरवाजा उघडला. 'हर हर महदेव' अशी गर्जना करत मुरारबाजी आणि त्याचे मावळे मुघलांवर तुटून पडले. थोडा वेळ भयंकर लढाई झाली. मुघलांचे सैन्य अफाट होते, पण मराठ्यांनी त्या सैन्याचा धुव्वा उडवला. शेवटी मुघलांनी माघार घेतली. ते दिलेरखानाच्या छावणीकडे जीव घेऊन पळत सुटले.

मुरारबाजीने त्यांचा पाठलाग सुरू केला. मुरारबाजीचे सैन्य दिलेरखानाच्या छावणीत घुसले. छावणीत एकच गोंधळ माजला. धावाधाव, आरडाओरडा, किंकाळ्या यांचा हाहाकार उडाला. घाईघाईने दिलेरखान हत्तीवर अंबारीत बसला. त्याने समोर पाहिले, तो त्यास मुरारबाजी दिसला. मुरारबाजीची तलवार कोणाच्या छाताडात, कोणाच्या मस्तकात, तर कोणाच्या कंठात घुसत होती. मुरारबाजी कोणालाही आटोपत नव्हता. त्याचे शौर्य बघून दिलेरखान थक्क झाला.

**मुरारबाजीचा अतुल पराक्रम :** दिलेरखानाला बघून मुरारबाजी चवताळला. 'कापा, तोडा, मुडदे पाडा', असे ओरडून तो शत्रूवर धावला. त्याची समशेर जोराने फिरू लागली. जो आड आला, तो ठार झाला. या एकट्या वीराला मुघलांनी चोहोकडून घेरले. इतक्यात दिलेरखान अंबारीतून ओरडला, ''थांबा!'' मुघल थांबले. क्षणभर मागे सरले. खान मुरारबाजीला म्हणाला, ''मुरारबाजी, तुझ्यासारखा समशेरबहाद्दर मी आजवर पाहिला नाही. तू आमच्या बाजूला ये, कौल घे. बादशाहा तुला सरदार करतील. जहागीर देतील, बक्षीस देतील!'' मुरारबाजीने दिलेरखानाचे शब्द ऐकले. रागाने त्याचे डोळे लाल झाले. तो चवताळून म्हणाला, ''अरे, आम्ही शिवाजी महाराजांची माणसे ! तुझा कौल घेतो की काय ? आम्हांला काय कमी आहे ? तुझ्या बादशाहाची जहागीर हवी कोणाला ?'' मुरारबाजीने खानाच्या दिशेने झेप घेतली आणि तो तुफान कत्तल करत सुटला. दिलेरखानाने अंबारीतून बाण सोडला. तो बाण थेट मुरारबाजीच्या कंठात शिरला. तो जमिनीवर कोसळला. मावळ्यांनी त्याचा देह उचलला आणि बालेकिल्ला गाठला. किल्लेदार



**मुरारबाजी देशपांडे–दिलेरखान युद्धप्रसंग**

पडला म्हणून त्यांना खूप दु:ख झाले, पण 'एक मुरारबाजी पडला तरी काय झाले ? आम्ही तैसेच शूर आहो. हिंमत धरून लढतो', असे म्हणून ते न डगमगता पुन्हा निकराने लढू लागले.

ही बातमी शिवरायांना कळल्यावर ते फार दु:खी झाले. त्यांनी विचार केला, एकेक किल्ला वर्षवर्ष लढवता येईल, पण विनाकारण माणसे मरतील. शिवरायांना ते नको होते.

**पुरंदरचा तह :** करणार काय ? शक्ती चालेना, युक्ती उपयोगी पडेना, तेव्हा काही काळ माघार घेणेच योग्य; म्हणून मुघलांशी तह करायचा असे शिवरायांनी ठरवले. शिवराय स्वत: जयसिंगाकडे गेले. त्यांनी त्याच्याशी मुत्सद्देगिरीचे बोलणे केले. ते म्हणाले, ''मिर्झाराजे, आपण रजपूत आहात. आमचे दु:ख आपण जाणता. बादशाहाच्या स्वाऱ्यांनी महाराष्ट्र उद्ध्वस्त झाला आहे. लोकांचे हाल होत आहेत. लोक सुखी व्हावे, म्हणून आम्ही स्वराज्याचे काम हाती घेतले आहे ! आपणही हे काम हाती घ्या. मी आणि माझे मावळे आपल्या पाठीशी उभे राहू''. जयसिंग मोठा धूर्त होता. त्याने शिवरायांना तह करण्यास सांगितले. त्यांनी तह केला. या तहात शिवरायांनी तेवीस किल्ले व त्याखालचा चार लक्ष होनांचा मुलूख मुघलांस देण्याचे कबूल केले. हा तह १६६५ साली झाला.

पुरंदरचा तह झाला. याच वेळी, शिवरायांनी आग्र्यास जाऊन बादशाहाची भेट घ्यावी, असे जयसिंगाने सुचवले. त्यांना सुरक्षिततेची हमी दिली.



**शिवराय–मिर्झाराजे जयसिंग भेट**

जयसिंगाच्या सूचनेवर शिवरायांनी विचार केला. बादशाहा कपटी आहे, स्वत:च्या भावांशीसुद्धा त्याने दगलबाजी केली, हे शिवराय ओळखून होते. तरीपण या प्रसंगाला सावधगिरीने तोंड द्यावे, असे त्यांनी ठरवले. आपण बादशाहाची भेट घेण्यास आग्र्याला जाण्यास तयार आहोत, असे शिवरायांनी जयसिंगाला कळवले.

## स्वाध्याय

**१. रिकाम्या जागी कंसातील योग्य पर्याय लिहा.**

(अ) त्या वेळची मुघली मुलखातील मोठी व्यापारपेठ म्हणजे...... .

(पुणे, सुरत, दिल्ली)

(आ) पुरंदरचा किल्लेदार ......... मोठा जिद्दीचा वीर होता.

(बाजीप्रभू, तानाजी, मुरारबाजी)

**२. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) शिवरायांनी सुरत शहरावर छापा का घातला ?

(आ) दिलेरखानाने पुरंदरला वेढा का दिला ?

(इ) मुघलांशी तह करण्याचे शिवरायांनी का ठरवले ?

(ई) पुरंदरच्या तहात शिवरायांनी मुघलांना कोणता मुलूख देण्याचे कबूल केले ?

### ३. दोन–तीन वाक्यांत उत्तरे लिहा.

(अ) मुरारबाजीचे शौर्य पाहून दिलेरखान त्याला काय म्हणाला ?

(आ) मुरारबाजीने दिलेरखानास कोणते उत्तर दिले ?

### ४. पाठात आलेल्या नावांच्या अक्षरांवरून शब्द पूर्ण करा.

(अ) औ ..................

(आ) पु ..................

(इ) मु ..................

(ई) ज ..................

(उ) दि ..................


### उपक्रम

तुमच्या परिसरातील किल्ल्याला भेट द्या. त्या किल्ल्याविषयी शिक्षकांकडून माहिती मिळवा.

# १३. बादशाहाच्या हातावर तुरी दिल्या

जयसिंगाच्या शब्दावर विश्वास ठेवून शिवराय बादशाहाच्या भेटीस आग्र्याला जाण्यास निघाले. जाण्यापूर्वी शिवरायांनी स्वराज्याचा कारभार जिजामातेच्या हाती सोपवला आणि त्यांचा आशीर्वाद घेतला. बरोबर आपले पुत्र संभाजीराजे, निवडक सरदार, काही विश्वासू माणसे आणि बराच खजिना घेतला. मजल दरमजल करत ते आग्र्यास पोहोचले.

**दरबारातील बाणेदारपणा :** ठरल्याप्रमाणे शिवराय बादशाहाच्या दरबारास गेले. छोटे संभाजीराजे सोबत होते. त्या दिवशी औरंगजेब बादशाहाचा पन्नासावा वाढदिवस होता. बादशाहा दरबार संपवून सल्लामसलतीच्या महालात गेला. त्याच्या समोर निवडक सरदार मानाप्रमाणे आपापल्या रांगेत उभे होते. बादशाहाने शिवरायांना मागील रांगेत उभे केले. मराठ्यांना अनेक वेळा पाठ दाखवून पळालेला जसवंतसिंग राठोड शिवरायांच्या पुढील रांगेत होता. शिवरायांना वाटले, 'आपण महाराष्ट्राचे राजे, आपला मान पहिल्या रांगेत राहण्याचा,



बादशाहाच्या दरबारात–शिवराय

पण बादशाहाने आपल्याला मागील रांगेत उभे करावे म्हणजे काय?' त्यांचे डोळे रागाने लाल झाले. हा अपमान त्यांना सहन झाला नाही. रागारागाने शिवराय महालाबाहेर पडले. ते तडक आपल्या मुक्कामावर गेले. यापुढे बादशाहाचे तोंड पाहायचे नाही, असे त्यांनी ठरवले.

भेटीचा बेत असा बिनसला. घडलेल्या प्रसंगाची हकीकत सगळीकडे पसरली.

**बादशाहाची दगलबाजी :** औरंगजेबाने शिवरायांच्या मुक्कामाच्या ठिकाणाभोवती शिपायांचा पहारा बसवला. शिवराय आणि संभाजीराजे बादशाहाच्या कैदेत पडले. शिवरायांनी ओळखले, की बादशाहाने आपल्याशी दगलबाजी केली आहे. आता तो आपल्याला कधीच सोडणार नाही.

दिवसामागून दिवस जाऊ लागले. एक दिवस शिवरायांनी बादशाहाकडे अर्ज केला, 'मला महाराष्ट्रात जाऊ द्या.' पण बादशाहाने ते ऐकले नाही. त्यांनी खूप खटपट केली, पण बादशाहाने मानले नाही. शिवरायांनी मनाशी निर्धार केला, की काहीही करून बादशाहाच्या कैदेतून सुटून जायचेच. त्याची परवानगी घेऊन शिवरायांनी आपल्याबरोबर आणलेल्या माणसांची दक्षिणेत रवानगी केली. बादशाहाला वाटले, 'बरे झाले. शिवाजीचे बळ कमी झाले.' आता शिवरायांच्या बरोबर संभाजीराजे आणि हिरोजी फर्जंद व मदारी मेहतर हे सेवक, एवढेच जण राहिले.

पुढे एक दिवस शिवरायांनी आजारी पडल्याचे सोंग केले. सोंगच ते ! त्यांच्या पोटात भयंकर कळा येऊ लागल्या. हकीम, वैद्य आले. औषधपाणी सुरू झाले. आजार बरा व्हावा म्हणून शिवरायांनी साधू व मौलवी यांना मिठाईचे पेटारे पाठवण्यास सुरुवात केली.

**पेटाऱ्यातून पसार झाले :** पहारेकरी मिठाईचे पेटारे उघडून पाहत, पण पुढेपुढे ते कंटाळले व पेटारे उघडून पाहीनासे झाले. रोजरोज काय पाहायचे, असे त्यांना वाटले. एके दिवशी सायंकाळी शिवरायांनी हिरोजीला आपल्या जागी झोपवले, मदारीस त्याचे पाय चेपत बसवले. शिवराय व संभाजीराजे एकेका पेटाऱ्यात बसले. पेटारे निघाले. पुढे ठरलेल्या ठिकाणी ते सुखरूप पोहोचले. तेथे शिवरायांचे स्वामिभक्त सेवक घोडे घेऊन तयार होते. इकडे हिरोजी आणि मदारी 'महाराजांचे औषध आणायला जातो' असे सांगून तेथून निसटले. महाराजांना कैदेतून सोडविण्याच्या कामी या दोघांनी जीवावर उदार होऊन मोलाचे योगदान दिले.

दुसऱ्या दिवशी ही बातमी बादशाहाला कळली. आपल्या तावडीतून शिवाजी निसटला! बादशाहा रागाने भडकला. त्याचे सारे सरदार हादरले. शिवाजीचा जारीने तपास लावण्यासाठी बादशाहाने सगळीकडे हेर पाठवले, पण व्यर्थ ! बादशाहाच्या कैदेतून मराठ्यांचा सिंह निसटला तो कायमचा ! वेषांतर करून शत्रूला झुकांडी देत देत शिवराय आपल्या मुलखाकडे निघाले. त्यांनी संभाजीला मथुरेत एका सुरक्षित ठिकाणी ठेवले आणि ते पुढे निघाले. शिवराय राजगडास सुखरूप आलेले पाहून जिजामातेला धन्य वाटले.



**शिवाजी महाराजांची आग्र्याहून सुटका**

पुढे दोन महिन्यांनी संभाजीराजे सुखरूप राजगडास येऊन पोहोचले. अशा प्रकारे मोठ्या युक्तीने बादशाहाच्या हातावर तुरी देऊन शिवरायांनी आपली सुटका करून घेतली. ही घटना सन १६६६ मध्ये घडली.

## स्वाध्याय

### १. रिकाम्या जागी कंसातील योग्य पर्याय लिहा.

(अ) शिवराय बादशाहाच्या दरबारास गेले, त्या दिवशी औरंगजेब बादशाहाचा ....... वाढदिवस होता.
(पन्नासावा, चाळिसावा, साठावा)

(आ) आग्र्याहून येताना संभाजीराजांना .......... एका सुरक्षित ठिकाणी ठेवले.
(झाशीत, मथुरेत, दिल्लीत)

### २. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.

(अ) आग्र्याला जाण्यापूर्वी शिवरायांनी स्वराज्याचा कारभार कोणाच्या हाती सोपवला ?

(आ) आग्र्याच्या कैदेत शिवरायांच्या बरोबर कोण कोण राहिले ?

(इ) आजार बरा व्हावा म्हणून शिवरायांनी काय केले ?

### ३. दोन-तीन वाक्यांत उत्तरे लिहा.

(अ) शिवराय औरंगजेबाच्या दरबारातून रागारागाने बाहेर का पडले ?

(आ) शिवरायांनी आपली सुटका करून घेण्यासाठी कोणती युक्ती केली ?

### उपक्रम

शिवराय आग्र्याच्या कैदेतून सुटून आल्याचे प्रसंगचित्र तयार करा.

CYYT5Q

# १४. गड आला, पण सिंह गेला

**मासाहेबांची इच्छा :** शिवरायांनी जयसिंगास दिलेले तेवीस किल्ले अजून मुघलांकडे होते. कोंढाणा हा त्यांतलाच एक किल्ला. एक दिवस जिजामाता शिवरायांना म्हणाल्या, ''शिवबा, कोंढाण्यासारखा बळकट किल्ला मुघलांच्या हाती असणे बरे नाही. तो परत घे.'' पुण्याजवळील कोंढाणा स्वराज्यात असावा म्हणून शिवरायही तळमळत होते. कोंढाण्यावरील मुघलांचा ताबा ही बाब जिजामाता आणि शिवराय यांच्या मनात सलत होती. शिवरायांनी कोंढाणा घ्यायचा बेत केला, पण कोंढाणा जिंकणे अतिशय अवघड होते. शिवराय विचार करू लागले, या कामगिरीसाठी निवडावे कुणाला ? कोंढाणा सर करण्याची कामगिरी फार कठीण होती.

**तानाजी मालुसरे :** तानाजी आरंभापासून शिवरायांचा साथीदार होता. कोकणात महाडजवळ उमरठे गाव आहे, तिथला तो राहणारा. शिवरायांच्या कामात तानाजीला कुचराई, दिरंगाई माहीतच नव्हती. शिवाय महाराज जी कामगिरी सांगतील ती हाती घ्यायला तानाजी केव्हाही तयार ! मोठा हिंमतवान गडी ! तो अंगाने धिप्पाड होता. ताकदीने भारी होता. बुद्धीने चलाख होता. शिवरायांवर त्याची अलोट भक्ती होती.




तानाजीची प्रतिज्ञा

**आधी लग्न कोंढाण्याचे :** तानाजी आपल्या मुलाच्या लग्नाच्या गडबडीत होता. त्याचा एकुलता एक मुलगा रायबा. तानाजीच्या घरी रायबाच्या लग्नाची तयारी जोरात चालली होती. लग्न चार दिवसांवर येऊन ठेपले होते.

तानाजीला वाटले, 'महाराज आणि मासाहेब यांना लग्नाला बोलवावे.' तो शेलारमामाला बरोबर घेऊन रायबाच्या लग्नाचे आमंत्रण देण्यासाठी शिवरायांकडे आला. शेलारमामाने शिवरायांना लग्नाचे आमंत्रण दिले. शिवराय म्हणाले, ''शेलारमामा, तुम्ही रायबाचे लग्न उरकून घ्या. आम्ही स्वत: काही लग्नाला येऊ शकणार नाही, कारण आम्ही जातीने कोंढाण्याच्या कामगिरीवर जाणार आहोत.''

शिवरायांचे हे शब्द ऐकताच तानाजी म्हणाला, ''महाराज, तानाजी जिवंत असताना असल्या जिवावरच्या कामगिरीवर आपण जाणार? मग आम्ही कशाला? ते काही नाही. आधी लग्न कोंढाण्याचे, मग रायबाचे. कोंढाण्याच्या कामगिरीवर मीच जाणार. मला आशीर्वाद द्या.''

**तानाजीचा बेत :** तानाजी कोंढाण्याच्या स्वारीवर निघाला. कोंढाणा किल्ल्यावर जयसिंगाने नेमलेला उदेभान हा रजपूत किल्लेदार होता. तो मोठा कडक होता. गडाला दोन दरवाजे होते.



**तानाजीची कोंढाण्यावर चढाई**

दोन्ही ठिकाणी उदेभानाने पक्का बंदोबस्त ठेवला होता, तेव्हा गडावर जायचे कसे ? तानाजीने गडाभोवती टेहळणी केली. पश्चिमेला उंचच उंच कडा होता. त्या बाजूला पहारा नव्हता. तानाजीने कडा चढून जायचा बेत केला. तानाजी आपल्या धाकट्या भावाला म्हणाला, ''सूर्याजी, तू पाचशे गडी घेऊन कल्याण दरवाजा गाठ. मी तीनशे मावळे घेऊन कडा चढून गडावर येतो. गड चढताच आम्ही कल्याण दरवाजा उघडतो. मग या तुम्ही आत, घुसा एकदम, धुव्वा उडवू शत्रूचा. चला.'' सूर्याजी आणि तानाजी दोघे दोन वाटांनी निघाले.

**कड्यावरून गडावर :** रात्रीची वेळ होती, तानाजी व त्याचे मावळे कड्याच्या पायथ्याला काळोखात उभे होते. रातकिडे किरकिरत होते. तानाजीचे पाच-सहा तरुण मावळे कडा चढायला पुढे झाले. कडा केवढा उंच ! पण ते कपारीस धरून, कोठे फटीत बोटे घालून मोठ्या हिमतीने कडा चढून वर गेले. वर जाताच त्यांनी दोराचे टोक एका झाडाला घट्ट बांधले. मग काय ? तानाजी आणि त्याचे मावळे दोरावरून भराभर वानरासारखे कडा चढून गडावर गेले.

**तानाजीचा पराक्रम :** इकडे सूर्याजीने आपल्या मावळ्यांसह कल्याण दरवाजा गाठला व तो उघडण्याची ते वाट पाहत राहिले. लढाईला सुरुवात झाली. उदेभानला खबर लागली. नगारा वाजला. उदेभानाचे सैन्य मावळ्यांवर चाल करून आले. हातघाईची लढाई सुरू झाली. तलवारीला तलवारी भिडल्या. सपासप वार होऊ लागले. ढाली खणाणू लागल्या. मशालींचा नाच सुरू झाला. मावळ्यांनी कल्याण दरवाजा उघडला. तानाजी सिंहासारखा लढत होता. उदेभानाने त्याच्यावर झेप घेतली. दोघांची झुंज सुरू झाली. दोघेही शूर वीर ! कोणीही हटेना. इतक्यात तानाजीची ढाल तुटली. त्याने हाताला शेला गुंडाळला. शेल्यावर वार झेलत तो लढू लागला. शेवटी दोघेही एकमेकांच्या वारांनी जबर जखमी झाले आणि धारातीर्थी कोसळले.

**गड आला पण सिंह गेला ! :** तानाजी पडला, हे पाहून मावळ्यांचा धीर खचला. ते पळू लागले. इतक्यात सूर्याजी व त्याच्या बरोबरचे मावळे कल्याण दरवाजातून आत येऊन पोहोचले. आपला भाऊ पडलेला पाहून सूर्याजीला दु:ख झाले, पण ती वेळ दु:ख करण्याची नव्हती, लढण्याची होती. सूर्याजीने कड्यावरचा दोर कापून टाकला. पळणाऱ्या मावळ्यांना तो आडवा गेला आणि म्हणाला, ''अरे, तुमचा बाप इथे मरून पडला आहे. तुम्ही असे भागूबाईसारखे काय पळता ? मागे फिरा. मी कड्यावरचा दोर कापून टाकला आहे. कड्यावरून उड्या टाकून मरा, नाहीतर शत्रूवर तुटून पडा.''

मावळे मागे फिरले. घनघोर लढाई झाली. मावळ्यांनी गड सर केला, पण गड सर करताना तानाजीसारखा शूर मोहरा धारातीर्थी पडला. जिजामातेस व शिवरायांना ही बातमी कळली. त्यांना खूप दु:ख झाले. गड ताब्यात आला, पण सिंहासारखा शूर तानाजी गेला. शिवराय खूप हळहळले आणि म्हणाले, ''गड आला, पण सिंह गेला !''

कोंढाण्याचे सिंहगड हे नाव सार्थ झाले. ही घटना सन १६७० मध्ये घडली. पुढे उमरठे गावी जाऊन शिवरायांनी रायबाचे लग्न केले.

**१. अचूक पर्यायाचे वर्तुळ रंगवा.**

(अ) तानाजी हा कोकणातील या गावचा राहाणार होता.

(१) महाड ○ (२) चिपळूण ○

(३) उमरठे ○ (४) रत्नागिरी ○

(आ) जयसिंगाने नेमलेला उदेभान या किल्ल्याचा किल्लेदार होता.

(१) पुरंदर ○ (२) कोंढाणा ○

(३) रायगड ○ (४) प्रतापगड ○

(इ) तानाजीच्या भावाचे नाव हे होते.

(१) रायबा ○ (२) सूर्याजी ○

(३) मुरारबाजी ○ (४) फिरंगोजी ○

**२. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) कोंढाणा किल्ला कोणाच्या ताब्यात होता ?

(आ) कोंढाणा किल्ल्यासंबंधी जिजामाता शिवरायांना काय म्हणाल्या ?

(इ) 'आधी लग्न कोंढाण्याचे, मग रायबाचे' असे कोण म्हणाले ?

**३. दोन–तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) शेलारमामाने शिवरायांना रायबाच्या लग्नाचे आमंत्रण दिले, त्या वेळी शिवराय काय म्हणाले ?

(आ) सिंहगडावर सूर्याजी मावळ्यांना काय म्हणाला ?

**उपक्रम**

तुमच्या परिसरातील ऐतिहासिक वास्तूंची यादी करा.

C2BP7D

# १५. एक अपूर्व सोहळा

**राज्याभिषेक का केला ? :** रायरेश्वराच्या मंदिरात शिवरायांनी स्वराज्याची प्रतिज्ञा केली. स्वराज्यस्थापनेच्या कार्यात त्यांच्यावर कितीतरी संकटे आली, पण त्यांतून शिवराय मोठ्या शौर्याने आणि चातुर्याने पार पडले. बाजीप्रभू, मुरारबाजी, तानाजी इत्यादींनी स्वराज्यासाठी लढता लढता आपले प्राण वेचले. शेवटी स्वराज्य उभे राहिले. शत्रूवर वचक बसला.

या स्वराज्याला सर्व राजेरजवाड्यांनी मान्यता द्यावी, म्हणून शिवरायांनी राज्याभिषेकाची योजना आखली. शेकडो वर्षांनंतर सर्व धर्मांना समानतेने वागवणारा, प्रजेला न्याय व सुख देणारा राजा महाराष्ट्रात निर्माण झाला होता. स्वराज्य निर्माण झाले आहे हे जगाला कळायला हवे, म्हणून शिवरायांनी राज्याभिषेक करून घेण्याचे ठरवले. हे त्यांनी स्वत:च्या सुखासाठी किंवा वैभवासाठी केले नाही, तर हे केले स्वराज्य भक्कम करण्यासाठी.


**स्वराज्याची राजधानी :** शिवरायांनी राजधानीसाठी रायगडाची निवड केली. रायगड हा मजबूत किल्ला होता. रायगडावरून स्वराज्यावर देखरेख करणे सोपे होते. शत्रूवर नजर ठेवणे सोईचे होते.

चिपळूणला जाऊन शिवरायांनी आपल्या सैन्याची पाहणी केली. प्रतापगडाच्या भवानीदेवीचे दर्शन घेतले. तिला भक्तिभावाने सोन्याचे छत्र अर्पण केले.

**समारंभाची तयारी :** नंतर शिवरायांनी सोन्याचे सिंहासन तयार करवून घेतले. त्याला मौल्यवान रत्ने जडवली. त्यावर शुभ्र छत्र बसवले. राजेरजवाडे, विद्‌वान ब्राह्मण व हाताखालचे सरदार, कामदार यांना आमंत्रणे गेली. राज्याभिषेकाचे पौरोहित्य करण्यासाठी काशीहून गागाभट्ट आले. गागाभट्टांचे घराणे मूळ पैठणचे, पण काशीमध्ये स्थायिक झालेले. ते थोर पंडित होते. काशीक्षेत्रात त्यांना मोठा मान होता. सर्वत्र त्यांची कीर्ती पसरली होती.

शिवरायांनी राज्याभिषेकाची तयारी यथासांग केली. सप्तगंगा आणि समुद्र यांचे जल आणण्यासाठी माणसे गेली. रायगडावर सुमारे पन्नास हजार माणसे जमली. त्यांच्यासाठी जिकडेतिकडे तंबू, डेरे, राहुट्या यांची गर्दी झाली.

**राज्याभिषेकाचा सोहळा :** राज्याभिषेकाचा दिवस उजाडला. महामंगल दिवस होता तो. वाद्ये वाजू लागली. गवई गाऊ लागले. सगळीकडे आनंदीआनंद झाला. शिवराय सोन्याच्या चौरंगावर बसले. त्यांच्यावर छत्रचामरे धरण्यात आली. तूप, दही, मध यांचे कलश पुरोहितांच्या हातांत होते. गागाभट्ट यांच्या हातांत सोन्याची घागर होती. तिच्यात गंगा, सिंधू, यमुना, गोदावरी, कृष्णा, नर्मदा व कावेरी या सात नद्यांचे आणि समुद्राचे पाणी भरलेले होते. गागाभट्टांनी ती सोन्याची घागर शिवरायांच्या डोक्यावर धरली व ते मंत्र म्हणू लागले. घागरीच्या शंभर छिद्रांतून शिवरायांवर जलाभिषेक झाला. मग शिवराय उठले आणि जिजामातेच्या पाया पडले. मासाहेबांनी शिवरायांना पोटाशी धरले. त्यांच्या



सोहळा शिवराज्याभिषेकाचा

डोळ्यांतून आनंदाश्रू वाहू लागले. त्यांनी केलेल्या तीस वर्षांच्या कष्टांचे चीज झाले. शिवबाच्या जन्माआधीपासून त्या माउलीने मनी धरलेले स्वप्न आज साकार झाले होते. आईचा आनंद अश्रूंवाटे बाहेर पडला. शिवरायही गहिवरले. धन्य मासाहेब! धन्य शिवराय !

मासाहेबांच्या भेटीनंतर महाराज सिंहासनावर बसले. त्यांच्याजवळ महाराणी सोयराबाई व युवराज संभाजीराजे बसले. अष्टप्रधान त्यांच्या दोन्ही बाजूंना उभे राहिले. गागाभट्टांनी सोन्यामोत्यांच्या झालरीचे छत्र महाराजांच्या डोक्यावर धरले व ते मोठ्याने म्हणाले, ''क्षत्रियकुलावतंस सिंहासनाधीश्वर श्रीशिवछत्रपती यांचा विजय असो.'' सर्वांनी जयजयकार केला. गडागडांवर तोफा झाल्या. सर्व महाराष्ट्रभर शिवरायांचा जयजयकार झाला. अशा प्रकारे सन १६७४ मध्ये शिवरायांचा राज्याभिषेक झाला. त्या सालापासून महाराजांनी 'राज्याभिषेक' हा शक सुरू केला. शिवाजी महाराज 'शककर्ते राजे' झाले. त्यांनी आपली स्वतंत्र नाणी पाडली. निरनिराळ्या देशांचे वकील या समारंभास हजर होते. इंग्रजांनी ऑक्झिंडेन नावाचा आपला वकील नजराणा घेऊन पाठवला होता. हा सोहळा पाहण्यासाठी दूरदूरचे प्रजाजनही जमा झाले होते. शिवरायांच्या राज्याभिषेकाची हकीकत सर्व जगाला समजली. शिवरायांची कीर्ती सर्वत्र पसरली.

## स्वाध्याय

### १. रिकाम्या जागी कंसातील योग्य पर्याय लिहा.

(अ) शिवरायांनी राजधानीसाठी ....... निवड केली.
(सिंहगडाची, रायगडाची, पन्हाळगडाची)

(आ) शिवरायांचा राज्याभिषेक सन .......... मध्ये झाला.
(१६७४, १६७५, १६४७)

### २. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.

(अ) सोन्याच्या घागरीत कोणकोणत्या नद्यांचे पाणी भरलेले होते ?

(आ) शिवरायांनी राज्याभिषेकापासून कोणता शक सुरू केला ?

### ३. दोन-तीन वाक्यांत उत्तरे लिहा.

(अ) शिवरायांनी राज्याभिषेक करून घेण्याचे का ठरवले ?

(आ) शिवरायांनी राजधानीसाठी रायगडाची निवड का केली ?

(इ) मासाहेबांच्या डोळ्यांतून आनंदाश्रू का वाहू लागले ?

### उपक्रम

(अ) राज्याभिषेकप्रसंगी शिवरायांनी पाडलेल्या नाण्यांविषयी शिक्षकांकडून अधिक माहिती मिळवा.

(आ) विविध प्रकारच्या टपाल तिकिटांचा संग्रह करा. त्याचे मित्रांच्या मदतीने वर्गात प्रदर्शन भरवा.

CZHK91

# १६. दक्षिणेतील मोहीम


**मोहिमेचा बेत :** राज्याभिषेकाचा सोहळा पार पडला, पण हा आनंद फार काळ टिकू शकला नाही. राज्याभिषेकानंतर अल्पावधीत १७ जून १६७४ रोजी मासाहेब मृत्यू पावल्या. शिवरायांचा मोठा आधार गेला. स्वराज्यातील सर्व प्रजेचा आधार शिवराय होते; परंतु शिवरायांचा आधार मासाहेब होत्या. त्या त्यांच्या जीवनातील खऱ्या मार्गदर्शक आणि गुरू होत्या. आईच्या मृत्यूमुळे त्यांना अतिशय दु:ख झाले; परंतु दु:ख करत बसणे त्यांना शक्य नव्हते. त्यांना स्वराज्याचा गाडा हाकायचा होता.

शिवरायांनी कर्नाटक प्रांतावर स्वारी करण्याचा निश्चय केला. त्यांना आता आदिलशाहीची मुळीच भीती नव्हती, कारण आदिलशाही मोडकळीस आली होती; परंतु उत्तरेचा मुघल बादशाहा औरंगजेब हा मात्र मराठ्यांचे राज्य नष्ट करण्यासाठी टपून बसला होता. तो स्वराज्याचा घास केव्हा घेईल, याचा नेम नव्हता. मुघलांचे संकट स्वराज्यावर आले तर दक्षिणेतही एखादे मजबूत ठाणे असावे, असा विचार शिवरायांच्या मनात आला, म्हणून त्यांनी दक्षिण आपल्या ताब्यात घेण्याचे ठरवले. या मोहिमेसाठी शिवरायांनी गोवळकोंड्याच्या कुतुबशाहाची मदत मागितली. त्याने मोठ्या खुशीने शिवरायांना मदत देण्याचे कबूल केले.

या मोहिमेच्या मागे शिवरायांचा आणखी एक हेतू होता. त्यांचे सावत्र भाऊ व्यंकोजीराजे हे दक्षिणेतील तंजावरची जहागीर सांभाळून होते. वडिलांची कर्नाटकातील जहागीरही त्यांच्याकडे होती. त्यातील काहीही वाटा व्यंकोजीराजांनी शिवरायांना दिला नव्हता. एवढेच नव्हे, तर स्वराज्याबद्दल त्यांना फारसा आदर नव्हता. ते शिवरायांशी फटकून वागत असत. त्यांची भेट घेऊन स्वराज्याच्या कार्यासाठी त्यांची मदत मिळाली तर पाहावी, असा हेतू शिवरायांच्या मनात होता.

**गोवळकोंड्याला भेट :** कर्नाटकात जाण्यासाठी शिवराय निघाले. गोवळकोंड्याचा अबुलहसन कुतुबशाहा याने त्यांना भेटीचे आमंत्रण दिले होते, तेव्हा प्रथम कुतुबशाहाच्या राजधानीला भेट देऊन मग दक्षिण दिग्विजयासाठी पुढे जायचे, अशी योजना त्यांनी आखली.

गोवळकोंडा हीच कुतुबशाहाची राजधानी होती. कुतुबशाहाने महाराजांच्या स्वागतासाठी मोठी तयारी केली. भेटीसाठी खास तंबू उभारला. शिवराय राजधानीत येऊन दाखल झाले. त्यांचे दर्शन घेण्यासाठी रस्तोरस्ती लोक दुतर्फा उभे होते. त्यांच्या पराक्रमाच्या बातम्या देशात चहूकडे पसरल्या होत्या. अफजलखानाचा वध, शायिस्ताखानाची फटफजिती आणि आग्र्याहून सुटका या रोमहर्षक प्रसंगांची हकीकत देशभर पसरली होती. त्यामुळे तेथे महाराजांचे प्रचंड स्वागत झाले. घराघरांतून लोक महाराजांवर फुलांचा वर्षाव करत होते. लोकांचे स्वागत



**शिवरायांची गोवळकोंड्याची ऐतिहासिक भेट**

स्वीकारून महाराज कुतुबशाहाच्या दरबारात आले. कुतुबशाहा त्यांना सामोरा गेला. त्याने महाराजांना खास तयार केलेल्या सिंहासनावर आपल्या बरोबरीने बसवले. त्याने महाराजांच्या सत्कारात कशाचीही कमतरता राहू दिली नाही. स्वागतसत्कार स्वीकारल्यावर शिवराय कर्नाटकाच्या मोहिमेवर निघाले.

**जिंजी जिंकली :** शिवराय पूर्वकिनाऱ्यावर आले. चेन्नईच्या दक्षिणेस जिंजीचा किल्ला आहे. हा रायगडाप्रमाणेच प्रचंड आणि मजबूत आहे. त्याला वेढा घालून महाराजांनी तो किल्ला जिंकला. दक्षिणेत स्वराज्याचे एक मजबूत ठाणे तयार झाले. नंतर त्यांनी वेलूरच्या किल्ल्याला वेढा दिला. कित्येक महिने वेढा देऊनही किल्ला ताब्यात येईना. तेव्हा वेलूरजवळच्या डोंगरावरून शिवरायांनी त्या किल्ल्यावर तोफांचा मारा केला आणि किल्ला सर केला. त्यांनी कर्नाटकात एकूण वीस लक्ष उत्पन्नाचा प्रदेश आणि कित्येक छोटेमोठे किल्ले जिंकले.

**व्यंकोजीराजांची भेट :** महाराजांनी आपले सावत्र भाऊ व्यंकोजीराजे यांना भेटीसाठी बोलावले. नाखुशीनेच ते आले. महाराजांनी त्यांचा योग्य सत्कार केला. त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. स्वराज्याच्या कार्यात व्यंकोजीराजांनी सहकार्य करावे, अशी त्यांनी त्यांना गळ घातली. काही दिवस व्यंकोजीराजे




**शिवराय – व्यंकोजीराजे भेट**

महाराजांबरोबर राहिले; परंतु एका रात्री महाराजांना काही न कळवता ते तंजावरला निघून गेले आणि उलट त्यांच्या फौजेवरच त्यांनी हल्ला केला, तेव्हा महाराजांच्या फौजेने त्यांचा समाचार घेतला. व्यंकोजीराजांचा पराभव झाला. आपल्या भावाच्या अशा वागणुकीमुळे महाराजांना फार वाईट वाटले. त्यांनी व्यंकोजीराजांना समजुतीची पत्रे पाठवली. जिंजीच्या दक्षिणेकडील काही प्रदेश त्यांना दिला. त्यांची पत्नी दीपाबाई हिलाही महाराजांनी चोळीबांगडीसाठी कर्नाटकातील थोडा प्रदेश दिला. महाराजांनी व्यंकोजीराजांना पत्रात लिहिले, 'परक्या शत्रूंचा भरवसा धरू नये. पुरुषार्थ गाजवावा.'

कर्नाटकातील विजय मिळवून महाराज रायगडावर परतले. या मोहिमेची दगदग जाणवत असतानाच महाराजांना जंजिऱ्याच्या सिद्दीविरुद्ध आरमारी मोहीम काढावी लागली. या वेळी महाराजांचे वय पन्नास वर्षांचे होते. तीस-पस्तीस वर्षे त्यांनी सतत कष्ट केले होते. त्यांना कधीही विश्रांती मिळाली नाही.

**रयतेचा वाली गेला :** तारीख ३ एप्रिल १६८०. सर्वांना दु:खसागरात लोटून शिवरायांनी जगाचा कायमचा निरोप घेतला. रयतेचा वाली गेला! आपल्या हयातीत महाराजांनी केवढ्या घडामोडी केल्या. जबरदस्त शत्रूंना नमवून महाराजांनी हिंदवी स्वराज्य निर्माण केले. अखिल भारतात महाराजांच्या कार्याला तोड नव्हती. महाराज थोर राष्ट्रपुरुष होते.




The following foot notes are applicable : (1) © Government of India, Copyright : 2014. (2) The responsibility for the correctness of internal details rests with the publisher. (3) The territorial waters of India extend into the sea to a distance of twelve nautical miles measured from the appropriate base line. (4) The administrative headquarters of Chandigarh, Haryana and Punjab are at Chandigarh. (5) The interstate boundaries amongst Arunachal Pradesh, Assam and Meghalaya shown on this map are as interpreted from the "North-Eastern Areas (Reorganisation) Act. 1971," but have yet to be verified. (6) The external boundaries and coastlines of India agree with the Record/Master Copy certified by Survey of India. (7) The state boundaries between Uttarakhand & Uttar Pradesh, Bihar & Jharkhand and Chattisgarh & Madhya Pradesh have not been verified by the Governments concerned. (8) The spellings of names in this map, have been taken from various sources.

**१. रिकाम्या जागी कंसातील योग्य पर्याय लिहा.**

(अ) व्यंकोजीराजे हे दक्षिणेतील ....... जहागीर सांभाळून होते.
(वेलूरची, तंजावरची, बंगळूरची)

(आ) कुतुबशाहाची ....... ही राजधानी होती.
(दिल्ली, जिंजी, गोवळकोंडा)

**२. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) शिवरायांचा व्यंकोजीराजांची भेट घेण्यामागे कोणता हेतू होता ?

(आ) शिवरायांनी व्यंकोजीराजांना कोणती गळ घातली ?

(इ) शिवरायांनी व्यंकोजीराजांना पत्रात काय लिहिले ?

**३. कारणे लिहा.**

(अ) शिवरायांनी दक्षिण आपल्या ताब्यात घेण्याचे ठरवले.

(आ) शिवरायांनी व्यंकोजीराजांना समजुतीची पत्रे पाठवली.

**उपक्रम**

शिवराय व व्यंकोजीराजे यांच्या भेटीचे व संवादाचे नाट्यीकरण करा.

CZRGAN



शिवाजी महाराजांची समाधी–रायगड

# १७. गडकोटांचे आणि आरमाराचे व्यवस्थापन

शिवरायांनी अनेक शत्रूंवर मात करून स्वराज्याची स्थापना केली. युद्‌ध असो अथवा राज्यकारभार, शिवरायांचे व्यवस्थापन कौशल्य सर्व क्षेत्रांत पहायला मिळते. या पाठात आपण शिवरायांच्या व्यवस्थापन कौशल्याविषयी माहिती घेणार आहोत.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

- व्यवस्थापन कौशल्य म्हणजे काय ?

व्यवस्थापन कौशल्य म्हणजे निश्चित ध्येय साध्य करण्यासाठी हाती घेतलेले कार्य शिस्तबद्‌ध पद्‌धतीने करणे होय.

शिवरायांचे व्यवस्थापन कौशल्य जसे त्यांनी आयुष्यभर केलेल्या लढायांमध्ये नेहमी दिसून येते, तसे त्यांच्या एकूण राज्यकारभारातही ते पाहायला मिळते. त्याची काही उदाहरणे पुढीलप्रमाणे.

### गडकोटांची उभारणी

गडकोट-किल्ल्यांच्या साहाय्याने शिवरायांनी स्वराज्याचे रक्षण केले. 'संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग' या नेमक्या आणि मोजक्या शब्दांत 'आज्ञापत्र' या शिवकालीन ग्रंथामध्ये दुर्गांचे म्हणजेच गडकोट-किल्ल्यांचे महत्त्व सांगितले आहे. शिवराय तरुणपणी सह्याद्रीच्या पर्वतरांगांमधून फिरले होते. सह्याद्रीच्या अंगा-खांद्यावर उभे असणारे गड-दुर्ग त्यांनी असंख्य वेळा न्याहाळले होते. स्वराज्याच्या संरक्षणासाठी गडकोटांचे महत्त्व त्यांना उमगले होते.

शिवरायांनी वनदुर्ग, गिरिदुर्ग आणि जलदुर्ग या तिन्ही प्रकारचे किल्ले बांधले. जलदुर्गांना 'जंजिरा' असेही म्हणतात. त्यांनी हिरोजी इंदुलकर आणि अर्जोजी यादव अशा तज्ज्ञांकरवी राजगड, प्रतापगड, सिंधुदुर्ग इत्यादी अनेक नवीन किल्ले बांधले. त्याचप्रमाणे रायगड किल्ल्याची नव्याने उभारणी केली. इतकेच नव्हे, तर विजयदुर्ग, तोरणा, रांगणा इत्यादी काही जुन्या किल्ल्यांची दुरुस्ती केली. शिवरायांकडे सुमारे ३०० किल्ले होते.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

- शिवाजी महाराजांचे धाकटे पुत्र छत्रपती राजाराम महाराज यांच्या आज्ञेवरून रामचंद्रपंत अमात्य यांनी 'आज्ञापत्र' हा ग्रंथ लिहिला असल्याचे मानले जाते. या ग्रंथात शिवछत्रपतींच्या राजनीतीचे स्पष्ट प्रतिबिंब उमटले आहे.

**करून पहा.**

- दिवाळीच्या सुट्टीत मित्रांच्या मदतीने एखाद्या किल्ल्याची प्रतिकृती तयार करा.
  - किल्ला तयार करण्यासाठी साहित्याची यादी तयार करा.
  - किल्ल्यासाठी जागेची निवड करा.
  - किल्ल्यावर पाण्याची, घरांची व्यवस्था कशी असावी याचा आराखडा तयार करा.

**सांगा पाहू !**

- तुमच्या परिसरात असलेल्या किल्ल्याचे/लेण्याचे नाव सांगा.
- किल्ल्यावर कोणत्या वस्तू/वास्तू आहेत ?
- किल्ला कोणत्या प्रकारचा आहे ?



गडाची उभारणी

## गडांचे व्यवस्थापन

गडकोटांच्या संरक्षणाची निश्चित अशी व्यवस्था महाराजांनी केली होती.

प्रत्येक गडकिल्ल्यांवर किल्लेदार, सबनीस आणि कारखानीस हे अधिकारी नेमलेले असत. किल्लेदाराच्या हाताखाली सबनीस आणि कारखानीस काम करत.

या अधिकाऱ्यांची कामे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

### किल्लेदार (हवालदार)

- किल्ल्याचे संरक्षण व कारभार करणे.
- सबनीस, कारखानीस यांना आज्ञा देणे.
- सरकारी पत्रे, हुकूम व आदेशाचे पालन करणे.

### सबनीस

- गडावरील जमाखर्चाचा हिशोब ठेवणे.
- गडावरील आणि गडाखालील प्रजेकडून कराची वसुली करणे.
- पत्रव्यवहार सांभाळणे.

### कारखानीस

- गडावर राहणाऱ्या लोकांना धान्याचा व वस्तूंचा पुरवठा करणे.
- युद्धाच्या वेळी तोफांना, बंदुकांना लागणाऱ्या दारूगोळ्याची व्यवस्था करणे.
- गड आणि गडावर असणाऱ्या इमारतींची देखभाल आणि दुरुस्ती करणे.

### तोफा–दारूगोळा

शिवरायांच्या काळात शत्रूपासून गड–किल्ल्यांचे संरक्षण करण्यासाठी लहान–मोठ्या तोफांचा वापर केला जात असे. या तोफा किल्ल्यांच्या तटांवर आणि बुरुजांवर ठेवलेल्या असत. पुरंदर, भीमगड यांसारख्या काही गडांवर तोफा तयार करण्याचे कारखानेही होते. लोखंड, पितळ, तांबे इत्यादी धातूंपासून तोफा तयार केल्या जात. पावसाळ्याच्या दिवसांत गडांवरील तोफा गंजू नयेत, म्हणून त्यांना मेणाचा लेप लावला जात असे. तोफांमध्ये शत्रूवर मारा करण्यासाठी लोखंडी, दगडी व कुलपी गोळे (ज्यामध्ये शिशाच्या गोळ्या असत.) यांचा वापर करत. या तोफा उडवण्यासाठी स्फोटक दारू वापरली जात असे.

**चर्चा करा.**

- गडावरील तोफा गंजू नयेत म्हणून त्यांना मेणाचा लेप लावला जात असे.

**सांगा पाहू !**

- शिवाजी महाराजांच्या आरमारातील जहाजांचे प्रकार सांगा. उदा. गुराब, गलबत, पाल, मचवा, नाव, होडी.
- स्वतंत्र भारताच्या आरमारातील जहाजांची नावे सांगा.

### आरमार

आरमार म्हणजे युद्धनौकांचा समूह होय. इंग्रज, पोर्तुगीज, सिद्दी, डच यांच्याकडे प्रबळ असे आरमारी दल होते. त्यांच्यापैकी काही लोक समुद्र



आरमाराची पाहणी करताना शिवराय

किनाऱ्यांवर असणाऱ्या गावांची लूटमार करत. तेथील लोकांचा छळ करत. शिवरायांनी या सागरी शत्रूंचा कायमचा बंदोबस्त करण्यासाठी स्वतंत्र आरमार निर्माण केले.

शिवरायांनी लहान-मोठी जहाजे-नावा तयार करण्याचे कारखाने उभारले. समुद्रातील जुने किल्ले जिंकून ताब्यात घेतले. सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग यांसारखे जलदुर्ग त्यांनी दुरुस्त केले. शिवरायांनी मालवणजवळ कुरटे या बेटावर सिंधुदुर्ग हा नवीन जलदुर्ग बांधला. तसेच मुंबईजवळ खांदेरीचा किल्ला बांधला.

स्वराज्याच्या आरमारात कोळी, भंडारी, आगरी यांसारख्या विविध दर्यावर्दी जाती-धर्मांचे सैनिक होते. दौलतखान, मायनाक भंडारी, लाय पाटील, दर्यासारंग, तुकोजी आंग्रे यांसारखे नावाजलेले आरमारी योद्धे याच काळात प्रसिद्धीस आले.

मराठ्यांच्या आरमारामुळे इंग्रज, पोर्तुगीज, सिद्दी आणि डच अशा सागरावरील शत्रूंना त्यांचा दरारा वाटू लागला. त्यामुळे शत्रूंचा स्वराज्याला होणारा त्रास कमी झाला. शिवरायांनी स्वतंत्र आरमाराची उभारणी करून त्याच्या बळावर आपली सागरी हद्द निश्चित करून किनारपट्टीलगतच्या भागावर स्वामित्व प्रस्थापित केले. आपला समुद्रकिनारा सुरक्षित केला. मध्ययुगीन काळातील भारतात शिवरायांनी उभे केलेले हे पहिले स्वकीय आरमार होय. त्यामुळे शिवछत्रपतींचा 'भारतीय आरमाराचे जनक' म्हणून उचित असा गौरव केला जातो.

**शिवरायांचे हेर खाते :** शिवरायांच्या लष्करी व्यवस्थेत गुप्त हेर खाते होते. बहिर्जी नाईक त्यांच्या हेर खात्याचा प्रमुख होता. महाराजांच्या सुरतेवरील मोहिमेसारख्या मोहिमा यशस्वी होण्याला त्याने आणलेल्या अचूक माहितीची मोठी मदत झाली. शिवरायांचे हेर गुप्तपणे शत्रूच्या गोटात शिरून गोटातील खडान्‌खडा माहिती काढून आणत. कोणतीही चढाई करण्यापूर्वी शिवराय हेरांकडून बातम्या मिळवत आणि मगच चढाईचा बेत आखत.

**गनिमी कावा :** शिवाजी महाराजांच्या युद्धनीतीत गनिमी काव्याच्या तंत्राला विशेष महत्त्व होते. गनिमी काव्याच्या युद्ध तंत्रात आपल्या सोईच्या ठिकाणी व अनुकूल वेळेस शत्रूवर अचानक आणि अनपेक्षितपणे हल्ला करून, शत्रू त्यातून सावरतो न सावरतो तोपर्यंत सैन्य सुरक्षित स्थळी पोहोचते. या तंत्राचा अवलंब करताना महाराजांना सह्याद्री पर्वतरांगांतील घनदाट जंगल, डोंगरी किल्ले आणि प्रजेचा पाठिंबा यांची मदत झाली.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

● शिवरायांचे सैन्य शिस्तबद्ध होते. त्यांचे सैनिक स्त्रियांचा आदर करत. त्यामुळे स्त्रियांचे रक्षणकर्ते म्हणून शिवरायांची कीर्ती सर्वत्र पसरली होती. सैनिकांनी दारू पिऊ नये, रयतेला त्रास देऊ नये, रयतेची लूट करू नये अशी सैनिकांना त्यांची सक्त ताकीद होती.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

● शिवरायांचे काही सहकारी-कान्होजी जेधे, वीर बाजी पासलकर, फिरंगोजी नरसाळा, प्रतापराव गुजर, सिधोजी निंबाळकर आणि सिद्दी हिलाल.

१. **सांगा पाहू !**

(अ) दुर्गांचे म्हणजेच गडकोट किल्ल्यांचे महत्त्व सांगणारा ग्रंथ.................

(आ) जलदुर्गांना असेही म्हणत.................

२. **तुम्हांला काय वाटते ते सांगा.**

(अ) शिवछत्रपतींचा 'भारतीय अरमाराचे जनक' म्हणून उचित असा गौरव केला जातो.

(आ) शिवरायांचे व्यवस्थापन कोणकोणत्या क्षेत्रांत पहायला मिळते ?

३. **किल्ल्यावरील पुढील अधिकाऱ्यांची दोन कामे लिहा.**

(अ) किल्लेदार – १. ......... २. .........

(आ) सबनीस– १. ......... २. .........

(इ) कारखानीस– १. ......... २. .........

४. **महाराष्ट्राच्या नकाशा आराखड्यात पुढील ठिकाणे दाखवा.**

(अ) सिंधुदुर्ग किल्ला (आ) विजयदुर्ग

(इ) मुंबई (ई) प्रतापगड

५. **छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यवस्थापन कौशल्यातील कोणती बाब तुम्हांला सर्वाधिक आवडली ? या बाबीचा तुमच्या दैनंदिन जीवनात कसा उपयोग कराल ?**

**उपक्रम**

(अ) 'शिवरायांच्या मुलाखतीचे आयोजन' ही मुलाखत नाटिका वर्गात सादर करा.

(आ) भारतीय नौदलातील युद्धनौकांविषयी माहिती मिळवा.

(इ) विविध प्रकारच्या किल्ल्यांना भेटी द्या व किल्ल्यांच्या विविध भागांची नावे जाणून घ्या.

# १८. लोककल्याणकारी स्वराज्याचे व्यवस्थापन

**सांगा पाहू !**

- शिवरायांनी कोणकोणत्या सत्तांशी संघर्ष केला ?

शिवरायांनी आदिलशाही, मुघल, पोर्तुगीज आणि जंजिरेकर सिद्दी या अन्यायकारी सत्तांशी दीर्घकाळ लढा दिला. त्यामुळे स्वतंत्र अशा हिंदवी स्वराज्याची निर्मिती झाली.

राज्यकारभाराचे काम व्यवस्थित चालावे म्हणून शिवरायांनी राज्यकारभाराची आठ खात्यांत विभागणी केली, हेच शिवरायांचे अष्टप्रधान मंडळ होय. प्रत्येक खात्याचा एक प्रमुख नेमला. त्यातूनच महाराजांचे अष्टप्रधान मंडळ साकार झाले. अष्टप्रधान मंडळाच्या माध्यमातून चालवलेले शिवरायांचे स्वराज्य हे खऱ्या अर्थाने लोककल्याणकारी राज्य होते. या अष्टप्रधानांच्या व इतरही महत्त्वाच्या अधिकाऱ्यांच्या नेमणुका, त्यांची पात्रता व गुणवत्ता पाहून महाराज स्वतः करत. त्यांच्या कारभारावर महाराजांची देखरेख असे.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

लोककल्याणकारी राज्यात प्रजेच्या अन्न, वस्त्र आणि निवारा या जीवनावश्यक गरजा पूर्ण होतात. स्त्रियांचा सन्मान केला जातो. सामान्य जनतेची, शेतकऱ्यांची फसवणूक होत नाही. कोणावरही अन्याय होत नाही. प्रजेला जलद न्याय मिळतो. शेती आणि उद्योगांचा विकास होतो. लोककला बहरू लागतात. प्रजा सुखा-समाधानाने राहते.

शिवछत्रपतींनी निर्माण केलेल्या स्वराज्यात त्यांची प्रजा सुखासमाधानाने राहू लागली. त्यामुळे महाराष्ट्रातील लोकांच्या ठिकाणी प्रखर आत्मविश्वास, स्वाभिमान आणि देशप्रेम दिसू लागले.

## अष्टप्रधान मंडळ

| | प्रधानाचे नाव | पद | काम |
|---|---|---|---|
| १. | मोरो त्रिंबक पिंगळे | प्रधान | राज्यकारभार चालवणे. |
| २. | रामचंद्र नीळकंठ मुजुमदार | अमात्य | राज्याचा जमाखर्च पाहणे. |
| ३. | हंबीरराव मोहिते | सेनापती | सैन्याचे नेतृत्व करणे. |
| ४. | मोरेश्वर पंडितराव | पंडितराव | धर्माची कामे पाहणे. |
| ५. | निराजी रावजी | न्यायाधीश | न्यायदान करणे. |
| ६. | अण्णाजी दत्तो | सचिव | सरकारी आज्ञापत्रे पाठवणे. |
| ७. | दत्ताजी त्रिंबक वाकनीस | मंत्री | पत्रव्यवहार सांभाळणे. |
| ८. | रामचंद्र त्रिंबक डबीर | सुमंत | परराज्यांशी संबंध ठेवणे. |



शिवराय शेतकऱ्यांना बैलजोड्या व इतर जीवनावश्यक साहित्य देताना

**करून पहा.**


- पाठ्यपुस्तकातील 'आज्ञापत्रातील पर्यावरण रक्षण' हा भाग मोठ्या अक्षरांत लिहून त्याचा तक्ता तयार करा, त्याचे वर्गात सामूहिक वाचन करा.

## पर्यावरणाचे संरक्षण

त्या त्या प्रदेशांवर निसर्गाने निर्माण केलेली भूमी, हवा, पाऊस, नद्या, समुद्र, ओढे, जंगले, लहान-मोठे प्राणी, पक्षी, सूर्यप्रकाश, चंद्रप्रकाश इत्यादी सर्व घटकांमधूनच मानवाच्या आजूबाजूस जो परिसर तयार होतो, त्यालाच 'नैसर्गिक पर्यावरण' असे म्हटले जाते. या पर्यावरणाचा आवश्यक त्या प्रमाणात उपयोग करून घेणे मानवाच्या हिताचे असते.

पर्यावरणातील या विविध घटकांचा नाश होणार नाही, याची शिवरायांनी दक्षता घेतलेली दिसून येते.

आपल्या राज्यातील जंगले लोकांकडून नष्ट होणार नाहीत, याकडे शिवरायांनी अधिक लक्ष दिले. उदा. आरमारासाठी लहान-मोठ्या नावा, जहाजे, वल्हे, सोट इत्यादी तयार करावे लागतात. त्यासाठी लाकूड लागते. म्हणून फक्त सागवानाचीच झाडे तोडावीत. अधिक सागवान पाहिजे असेल तर ते परक्या मुलखातून खरेदी करावे, परंतु कोणत्याही परिस्थितीत आंबे, फणस इत्यादी झाडे तोडू नयेत. असली झाडे वर्षा दोन वर्षांत तयार होत नाहीत. प्रजेने ही झाडे आपल्या मुलांसारखी जतन करून वाढवलेली असतात. ती तोडून प्रजेला दुःख देऊ नये. अगदीच एखादे झाड जीर्ण असेल, तर त्या झाडाच्या मालकाला रोख पैसे देऊन त्याचे



पर्यावरणाचे संरक्षण

समाधान करून मगच ते तोडावे. अशा प्रकारचे अनेक हुकूम शिवरायांनी दिले होते, असे आज्ञापत्रावरून समजून येते.

**हे नेहमी लक्षात ठेवा.**

पर्यावरण रक्षणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी आणि पर्यावरणाचा ऱ्हास रोखण्यासाठी ५ जून हा दिवस दरवर्षी 'जागतिक पर्यावरण दिन' म्हणून साजरा केला जातो.

## जल व्यवस्थापन

शिवरायांनी स्वराज्यातील गावोगावी छोटे-मोठे बंधारे बांधून लोकांना पिण्यासाठी पाणी उपलब्ध करून दिले. तसेच या बंधाऱ्यांना पाट काढून शेतीसाठीही पाणी उपलब्ध करून दिले. त्यामुळे स्वराज्याचे उत्पन्न वाढले. स्वराज्यातील रयतेला दुष्काळाची कधीही तीव्रता जाणवली नाही. शिवरायांच्या काळात गडांवर वस्ती करून राहणाऱ्या प्रजेची संख्या मोठी असे. तेथे पाण्याची व्यवस्था करण्यासंबंधी शिवराय काळजी घेत असत. गड बांधण्यापूर्वी त्या जागेवर पुरेसे पाणी आहे का याची पाहणी केली जात असे. अशा एखाद्या जागी पाणी नसेल, तर तेथे पावसाळ्यापूर्वीच तळी आणि टाक्या बांधून पावसाचे पाणी त्यांमध्ये साठवले जाई.

हे साठवलेले पाणी जपून वापरले जात असे. अशा जलव्यवस्थेमुळे गडांवरील लोकांना आणि स्वराज्यातील प्रजेला दुष्काळातही पाण्याची टंचाई जाणवत नसे.



शिवरायांनी पाटबंधारे बांधून शेती व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली

**सांगा पाहू !**

- पाण्याचा वापर काटकसरीने का करावा ?
- तुमच्या गावात/परिसरात कोणते धरण, तळे आहे ?
- जल व्यवस्थापन म्हणजे काय ?
- जल व्यवस्थापनाबाबत शासनाच्या कोणत्या योजना आहेत ?

**माहीत आहे का तुम्हांला ?**

- राज्याला कायमस्वरूपी दुष्काळापासून मुक्त करण्यासाठी शासनाने 'जलयुक्त शिवार' ही योजना सुरू केली आहे.

## दुष्काळ निवारण

दुष्काळग्रस्त काळात शिवराय शेतकऱ्यांना विविध सवलती देत असत. प्रजेला सारा माफ करत असत. त्यामुळे स्वराज्यातील दुष्काळाची दाहकता कमी होत असे. एखाद्या वर्षी स्वराज्यात दुष्काळ पडल्यास शिवराय सरकारी कोठारात साठवलेले धान्य रयतेला मोफत वाटून देत असत. तसेच दुष्काळाच्या वर्षी शिवराय वेगवेगळ्या किल्ल्यांवर दुरूस्तीची कामे सुरू करत. त्याचप्रमाणे धरणे, कालवे, बंधारे यांचीही कामे सुरू करत. या कामांमुळे शेतकऱ्यांबरोबरच कारागिरांना म्हणजेच बलुतेदारांना रोजगार मिळत असे. रोजगार मिळाल्यामुळे स्वराज्यातील रयतेला दुष्काळाची तीव्रता कधीच जाणवली नाही.

शेतकरी समृद्ध झाल्यामुळे काल ज्याच्या पायात जोडा नव्हता, त्याने जोडा घेतला. अंगावर वस्त्र नव्हते, त्याने वस्त्र घेतले. त्यामुळे विणकरांना काम मिळाले. राहायला ज्यांना घर नव्हते, त्यांची

घर बांधण्याची परिस्थिती निर्माण झाली. त्यामुळे घर बांधणाऱ्या गवंड्यांना, सुतारांना, लोहारांना व वीट बनवणाऱ्या कुंभारांना काम मिळाले. अशा प्रकारे स्वराज्यात शेतकऱ्यांबरोबर कारागीर व बलुतेदार सुखी व समृद्ध झाले.



**सांगा पाहू !**

- तुमच्या गावातील/परिसरातील बाजारपेठेचे नाव सांगा.
- बाजारपेठेला ते नाव का पडले असेल, त्याची माहिती सांगा .

## सागरी व्यापार आणि इतर व्यापारपेठा

स्वराज्याचे संरक्षण चांगल्या प्रकारे करता यावे म्हणून स्वराज्याला लागून असणाऱ्या समुद्रावर आपली हुकमत असली पाहिजे, या हेतूने शिवरायांनी आपले स्वतंत्र आरमार उभे केले. तितकेच करून ते थांबले नाहीत, तर स्वराज्यातील व्यापार वाढावा म्हणून त्यांनी मालाची वाहतूक करणारी खास जहाजे बांधून घेतली. राजापूरसारखी व्यापारी बंदरे विकसित केली. त्याचप्रमाणे रायगडावर खास बाजारपेठ वसवली. पुण्याशेजारी खेड शिवापूर ही वेगळी व्यापारी पेठ सुरू केली. मोठ्या गावात आणि रस्त्यावरील गावात व्यापार पेठा निर्माण केल्या. वीरमाता जिजाबाईंच्या हुकुमाप्रमाणे पुण्याजवळील पाषाण गावात एक नवीन पेठ तयार करण्यात आली होती. तिचा उल्लेख 'जिजापूर' म्हणून केला जात असे.

स्वराज्यातील व्यापार वाढावा म्हणून शिवरायांनी बाहेरील प्रदेशांतून येणाऱ्या वस्तूंवर जास्त कर बसवला. पोर्तुगीज हद्दीत येणाऱ्या मिठावर त्यांनी अधिक कर बसवला. त्यामुळे त्या मिठाची किंमत वाढली. याउलट, स्वराज्यात तयार होणाऱ्या मिठावरील कर त्यांनी कमी केले. त्यामुळे लोकांना स्वराज्यातील मीठ स्वस्त मिळू लागले. अर्थातच स्वराज्यातील मिठाचा व्यापार वाढला. त्यामुळे स्थानिक व्यापाराला चालना मिळाली.

स्वराज्यातील व्यापार-उद्योगांची वाढ होण्यासाठी शिवराय प्रयत्न करत होते. आपल्या प्रजेची व्यापाऱ्यांकडून कोणत्याही प्रकारची फसवणूक होता कामा नये, याकडे ते जातीने लक्ष, देत. कोकणामध्ये नारळ, सुपारीच्या व्यापारांत लोकांची फसवणूक होत आहे हे समजल्यावर शिवरायांनी तेथील सुभेदाराला ताकीद दिली होती.

## स्त्रियांचा सन्मान

युद्धाच्या काळात शत्रूपक्षाच्या स्त्रिया किंवा मुले यांना कोणत्याही प्रकारची इजा करता कामा नये, उलट त्यांना अतिशय मानाने वागणूक देण्याचे हुकूम महाराजांनी दिले होते. त्यांनी स्वत: अनेकदा आपल्या वर्तनातून स्त्रियांना मानाने कसे वागवावे याचे आदर्श घालून दिलेले आढळतात.

कर्नाटकातील बेलवडी येथील गढी जिंकण्यासाठी मराठी सैन्य गेले होते. तेथील गढीच्या रक्षणासाठी मल्लम्मा देसाई या शूर महिलेने मोठा संघर्ष केला. तिच्या पराक्रमाची बातमी शिवरायांना समजली. तेव्हा त्यांनी मल्लम्माला आपली धाकटी बहीण मानून तिची गढी व गावे सन्मानपूर्वक तिला परत केली, तसेच तिला 'सावित्री' हा किताब दिला.

## स्वच्छतेविषयी दक्षता

घरे आणि सार्वजनिक ठिकाणे अधिकाधिक स्वच्छ कशी ठेवता येतील, यासंबंधीही



बेलवडीच्या मल्लम्मा देसाईचा सन्मान करताना शिवराय

शिवरायांच्या काळात उपाययोजना केली असल्याचे समजून येते. घराभोवती निरगुडीच्या झाडाचे कुंपण घालून घरामध्ये उंदीर, विंचू, किडा, मुंगी यांसारखे प्राणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी. त्याचप्रमाणे धूर करून आरोग्याला धोकादायक असणारे जंतू नष्ट करावेत, अशाही आज्ञा शिवरायांनी दिलेल्या पहायला मिळतात.

गडावरील बाजारपेठेत, रस्त्यांवर केरकचरा राहणार नाही, याची ताकीद देण्यात आलेली दिसते. इतकेही करून जर जागोजाग कचरा पडला असेल, तर तो गडाखाली फेकू नये. तो कचरा त्याच जागेवर जाळून टाकावा आणि त्यापासून होणारी राख परड्यातील भाजीपाल्यासाठी खत म्हणून वापरावी, अशा विविध सूचना केलेल्या आढळतात.

शिवरायांनी गडांची उभारणी, तोफा-दारूगोळा, आरमार, पर्यावरणाचे संरक्षण, जल व्यवस्थापन, सागरी व्यापार आणि व्यापार पेठा, स्वच्छतेविषयी दक्षता यासंबंधी जे व्यवस्थापन केले होते ते आजही मार्गदर्शक ठरणारे आहे.

## हिंदवी स्वराज्य

हिंदवी स्वराज्य हे शिवरायांचे स्वप्न होते. हिंदवी म्हणजे हिंदुस्थानात राहणारे; मग ते कोणत्याही धर्माचे असोत, कोणत्याही जातीचे असोत. त्यांचे राज्य ते हिंदवी स्वराज्य.

## उदार धार्मिक धोरण

शिवरायांचे धार्मिक धोरण उदार होते. मोहिमेवर असताना शिवरायांनी मशिदींना उपद्रव दिला नाही. कुरआन शरीफची एखादी प्रत हाती आल्यास ते ती प्रत सन्मानपूर्वक मुसलमानांकडे सोपवून देत. कोणी मुसलमान म्हणून ते त्याचा

द्वेष करत नसत. कोणी धर्म बदलला, पण पुन्हा त्याला स्वत:च्या धर्मात परत यावे असे वाटले, तर ते त्याला दूर लोटत नसत. बजाजी नाईक निंबाळकर हा शिवरायांचा मेहुणा होता. तो विजापूरच्या आदिलशहाच्या चाकरीत होता. आदिलशहाने त्याला स्वत:च्या धर्मात घेतले. बजाजी विजापुरात राहू लागला. त्याला काही कमी नव्हते, पण आपला धर्म बदलला याबद्दल त्याचे मन त्याला खाई. त्याला वाईट वाटे. त्यामुळे त्याने स्वधर्मात परत यायचे ठरवले, तेव्हा शिवरायांनी त्याला स्वधर्मात घेतले. नेतोजी पालकर याची हकीकतही अशीच आहे. नेतोजी पालकर याचा धर्म बदलला, पण नंतर त्याला स्वधर्मात येण्याची इच्छा झाली, तेव्हा शिवरायांनी त्यालाही स्वधर्मात घेतले.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

- शिवराय साधु-सज्जनांना फार मान देत. त्यांना मंदिरे प्रिय होती. त्यांनी मशिदींचेही रक्षण केले. त्यांना भगवद्‌गीता पूज्य होती. त्यांनी कुरआन शरीफचाही मान राखला. ख्रिस्ती लोकांच्या प्रार्थनामंदिरांनाही ते जपत. शिवराय विद्‌वानांचा आदर करत. परमानंद, गागाभट्ट, धुंडीराज, भूषण इत्यादी विद्‌वानांचा त्यांनी सत्कार केला. तसेच संत तुकाराम, समर्थ रामदास, बाबा याकूत, मौनीबाबा यांचाही त्यांनी बहुमान केला.



शिवरायांचे आठवावे रूप

**शिवरायांचे आठवावे रूप :** काळ्याकुट्ट अंधारात आपली दिशा ठरवून वाट काढायची, संकटे आली असता डगमगून न जाता त्यांवर मात करून पुढे जायचे, बलाढ्य शत्रूंशी आपल्या तुटपुंज्या बळाने झुंज देत आपले सामर्थ्य वाढवत जायचे, सहकाऱ्यांना उत्साह देत व शत्रूंना सतत चुकवत यश मिळवायचे – हे सर्व गुण शिवरायांमध्ये होते. आदर्श पुत्र, सावध नेता, कुशल संघटक, लोककल्याणकारी प्रशासक, हिकमती लढवय्या, दुर्जनांचा कर्दनकाळ, सज्जनांचा कैवारी आणि एका नव्या युगाचा निर्माता, असे शिवरायांच्या व्यक्तिमत्त्वाचे कितीतरी तेजस्वी पैलू आहेत. हे सारे पाहिले, की पुन्हापुन्हा वाटते–

‘शिवरायांचे आठवावे रूप ।
शिवरायांचा आठवावा प्रताप ।
शिवरायांचा आठवावा साक्षेप भूमंडळी ।।’

## स्वाध्याय

**१. सांगा पाहू !**

(अ) स्वतंत्र अशा हिंदवी स्वराज्याची निर्मिती झाली.

(आ) स्वराज्यातील रयतेला दुष्काळाची कधीही तीव्रता जाणवली नाही.

(इ) शिवरायांनी मल्लम्मा देसाई हिला दिलेला किताब.

**२. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा व तक्ता पूर्ण करा.**

| | प्रधानाचे नाव | पद | काम |
|---|---|---|---|
| १. | मोरो त्रिंबक पिंगळे | ------ | राज्यकारभार चालवणे. |
| २. | ------------ | अमात्य | राज्याचा जमाखर्च पाहणे. |
| ३. | हंबीरराव मोहिते | सेनापती | ------------ |
| ४. | मोरेश्वर पंडितराव | ------ | धर्माची कामे पाहणे. |
| ५. | ------------ | न्यायाधीश | ------------ |
| ६. | अण्णाजी दत्तो | ------ | ------------ |
| ७. | ------------ | ------ | पत्रव्यवहार सांभाळणे. |
| ८. | रामचंद्र त्रिंबक डबीर | सुमंत | ------------ |

**३. चर्चा करा.**

पर्यावरणातील विविध घटकांचा नाश होणार नाही याची दक्षता शिवरायांनी कशाप्रकारे घेतलेली दिसून येते. तुम्ही पर्यावरण रक्षणासाठी काय काय करू शकाल ?

**४. वाचा व तुमच्या शब्दांत माहिती सांगा.**

‘जल व्यवस्थापन’ या विषयीची माहिती वाचा व या विषयावर तुमच्या शब्दांत माहिती सांगा.

**उपक्रम**

(अ) तुमच्या वर्गातर्फे शाळेच्या आवारात बाजार भरवा. विविध वस्तू व त्यांच्या किंमतींची यादी तयार करा. त्यासाठी परिसरातील बाजारपेठेस भेट द्या.

(आ) तुमच्या शाळेच्या परिसरात तुम्ही कोणती झाडे लावली आहेत, त्यांचे जतन तुम्ही कसे करता ते सांगा.

0CEKSV


# ‘आज्ञापत्रातील’ पर्यावरण रक्षण

रामचंद्रपंत अमात्यांनी ‘आज्ञापत्र’ लिहिले. यात शिवाजी महाराजांच्या धोरणांचे प्रतिबिंब आढळते. खालील उताऱ्यातून महाराजांचा पर्यावरणासंबंधीचा दृष्टिकोन स्पष्ट होतो.

‘‘आरमारास तख्ते, सोट, डोलाच्याकाठ्या आदिकरून थोर लाकूड असावे लागते आपले राज्यात अरण्यात सागवानादि वृक्ष आहेत, त्यांचे जे अनुकूल पडेल ते हुजूर लेहून हुजूरचे परवानगीने तोडून न्यावे. याविरहित जे लागेल ते परमुलकीहून खरेदी करून आणवीत जावे. स्वराज्यातील आंबे, फणस आदिकरून हेही लाकडे आरमारचे प्रयोजनाची, परंतु त्यांस हात लाऊ न द्यावा. काये म्हणोन की, ही झाडे वर्षा दोन वर्षांनी होतात यैसे नाही. रयतेने ही झाडे लाऊन लेकरांसारखी बहुत काल जतन करून वाढविली. ती झाडे तोडिल्यावरी त्याचे दुःखास पारावार काये? एकास दुःख देऊन जे कार्य करीन म्हणेल ते कार्य करणारासहित स्वल्पकालेच बुडोन नाहीसेच होते; किंबहुना धन्याचेच पदरी प्रजापीडणाचा दोष पडतो. या वृक्षांच्या अभावे हानीही होते. याकरिता हे गोष्ट सर्वथा होऊ न द्यावी. कदाचित एखादे झाड जे बहुत जीर्ण होऊन कामातून गेले असेल तरी त्याचे धन्यास राजी करून द्रव्य देऊन त्याच्या संतोषे तोडून न्यावे...’’




किल्ले राजगड



जिंजी किल्ल्याचा बालेकिल्ला

जिंजीचा किल्ला सध्याच्या तमिळनाडू राज्यात आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी दक्षिण दिग्विजयाच्या मोहिमेवर असताना तो जिंकून घेतला. हा किल्ला मूळचाच दुर्गम होता. तरी देखील महाराजांनी त्याचे आधीचे तट पाडले आणि नवे तट व बुरूज बांधून तो अधिक मजबूत बनवला. किल्ले दुर्गम कसे बनवावेत, याचे शिक्षण शहाजीराजांनी त्यांना लहानपणीच दिले होते. शिवाजी महाराजांनी त्या ज्ञानाचा उपयोग या प्रसंगी केला, असे दिसते. पुढे राजाराम महाराजांनी या किल्ल्यावर आपली राजधानी स्थापन केली. ते त्या किल्ल्यावर असताना मुघलांनी त्याला वेढा दिला. परंतु राजाराम महाराजांनी त्या वेढ्यात अडकूनही सुमारे सात वर्षेपर्यंत किल्ला लढवला. शिवाजी महाराजांनी दूरदृष्टी ठेवून हा किल्ला अधिक मजबूत केलेला असल्यामुळेच राजाराम महाराज इतका काळ या किल्ल्यावर सुरक्षित राहू शकले.



भवानीदेवी–प्रतापगड


किशोर
कथा, कविता, कादंबरीका, एकांकिका,
दीर्घकथा, गंमतगाणी, ललित, छंद, चरित्र,
विज्ञान, देश-देशांतर, लोककथा
लोकप्रिय व अभिरुचिसंपन्न किशोर
मासिकातील चाळीस वर्षांतील
निवडक साहित्यांवर आधारित
'निवडक किशोर'चे १४ खंड
किंमत प्रत्येकी
₹१६३/-
(30% सूट)
वरील खंड पाठ्यपुस्तक मंडळाच्या सर्व भांडारांत विक्रीसाठी
उपलब्ध आहेत. १४ खंडांची एकूम किंमत ₹ १६००/-
किशोर
वरील खंडांच्या खरेदीसाठी मंडळाच्या पुढील विभागीय भांडारांशी संपर्क साधा.
पुणे (०२०- २५६५९४६५), मुंबई (गोरेगाव) (०२२-२८७७१८४२), औरंगाबाद (०२४०- २३३२१७१),
नागपूर (०७१२-२५२३०७८/ २५४७७१६), नाशिक (०२५३- २३९१५११), लातूर (०२३८२- २२०९३०),
कोल्हापूर (०२३०- २४६८५७६), अमरावती (०७२१-२५३०९६५), पनवेल (०२२- २७४६२६४५)



शत्रूची ठाणी उठवून आपली ठाणी बसवावी, म्हणून शिवाजीमहाराजांचे परगणा मुरगूडचे (जि. कोल्हापूर) देसाई रुद्राप्पा नाईक यांना दिनांक ११ डिसेंबर १६७६ रोजी पाठवलेले पत्र. हे पत्र मोडी लिपीत आहे.

**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.**

परिसर अभ्यास भाग – २ इ. ४ थी (मराठी माध्यम)

₹ ३६.००